म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा·वा·
दा. क्र. ६९८

IRBK-0106989

IRBK-0106989

गोपीनाथ गणेश तळवलकर

आजकालच्या

# थोर विभूति

म. ग्रं. सं. ट.
बा. क्र. ६८८९
अनुक्रम २८८९
IRBK-0106989

ातवी आवृत्ति : १९५८
आनंद कार्यालय, पुणें.

किंमत सव्वा रुपाया

पहिली आवृत्ति १९३५
दुसरी आवृत्ति १९४६
तिसरी आवृत्ति १९४८
चवथी आवृत्ति १९५२
पांचवी आवृत्ति १९५४
सहावी आवृत्ति १९५६
सातवी आवृत्ति १९५८

प्रकाशक
य. गो. जोशी, बी. ए.
व्यवस्थापक, आनंद कार्यालय
१०१५ सदाशिव, पुणें २.

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए.
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणें २.

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

# सातव्या आवृत्तीची प्रस्तावना

वर्तमानकाळीं उद्यांचा इतिहास बनत असतां त्याच्या घडणीस थोर विभूति आपल्या अवतार-कार्यानें साह्यकारीच होत असतात. विद्यमान् विभूतींच्या कर्तृत्वाची ओळख झाली तरच मुलांना आजच्या महत्त्वाच्या घडामोडी कळतील. या दृष्टीनें चालू युगांतील विभूतींचा परिचय करून देणारी एक लेखमाला १९३२ सालीं 'आनदा'च्या पुरवणींत सुरू केली. त्यावेळीं ज्याचें कार्य विशेष प्रामुख्यानें जगाच्या नजरेसमोर येई त्याची थोडक्यांत ओळख एका लेखांत करून दिली जाई. अशीं कांहीं चरित्रें प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांचें पुस्तक काढावें अशी पुष्कळांनीं सूचना केली, आणि १९३५ सालीं ही लेखमाला प्रथम पुस्तकरूपानें निघाली.

आज त्या पुस्तकाची सातवी आवृत्ति प्रसिद्ध करण्याचा सुयोग येत आहे. प्रथम पुस्तक निघालें त्यावेळीं या विभूति भूतलावर आपापल्या क्षेत्रांत देहरूपानें चमकत होत्या. परंतु सर्वभक्षक काळानें त्यांतील कांहीं आज हिरावून नेल्या आहेत. तेवढ्यापुरता त्या त्या प्रकरणांत भूतकाल करावा लागला. त्याचप्रमाणें सुदैवानें ज्यांचें कार्य सारखें वाढत आहे त्यांच्या ताज्या कर्तृत्वाची नोंद केलेली आढळेल. ज्यांचें कर्तृत्व जग आज विसरल्यासारखें आहे व विध्वंसक कार्यच ज्यांनीं जास्त केलें आहे त्यांना वगळून आधुनिक इतिहासाचें नेतृत्व व विरचन करणाऱ्या नव्या विभूतींचा यांत समावेश केला आहे. अशा रीतीनें हें पुस्तक शक्य तितकें अद्ययावत् केलें आहे. चरित्र व शब्दचित्र या दोन वाङ्मयप्रकारांचा यांत समन्वय केला आहे. थोर विभूतींच्या कर्तृत्वाबरोबर त्यांचें व्यक्तित्वहि विद्यार्थ्यांना कळावें, हाच हेतु या समन्वयाच्या मुळाशीं आहे. कुठें तरी मर्यादा घालावी लागते म्हणून चरित्रांची संख्या इतकीच राहिली. पण चालू काळ म्हणून जो आपण म्हणतों त्याच्या आगेंमागें असणाऱ्या आणखी कांहीं असामान्य विभूतींचीं चरित्रेंहि यांत यावयास पाहिजेत, याची प्रस्तुत लेखकास जाणीव आहे. योग आल्यास या पुस्तकांत तशी भर पडेल असें आश्वासन देऊन ठेवतों.

या आवृत्तीचेंहि स्वागत मागील आवृत्तीप्रमाणें केलें जाईल अशी नम्र आशा आहे.

१४ नोव्हेंबर १९५८, बालदिन
आनंद कार्यालय, पुणें २

सर्वांचा नम्र
**गोपीनाथ तळवलकर**

****

# अ नु क्र म


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ गांधीजी | ५ |
| २ पं. जवाहरलाल नेहरू | १५ |
| ३ रवीन्द्रनाथ | २४ |
| ४ जगदीशचंद्र बोस | २९ |
| ५ चंद्रशेखर व्यंकटरामन् | ३३ |
| ६ सुभाषचंद्र | ३६ |
| ७ लोकमान्य टिळक | ४३ |
| ८ विनोबा | ४८ |
| ९ ॲनी बेझंट | ५२ |
| १० अँड्र्यूज | ५७ |
| ११ केमालपाशा | ६० |
| १२ टोयोहिको कागावा | ६४ |
| १३ जॉर्ज बर्नार्ड शॉ | ६७ |
| १४ रॉबर्ट बेडन पॉवेल | ७१ |
| १५ इमान डी व्हॅलेरा | ७५ |
| १६ रोमां रोलां | ७९ |
| १७ अल्बर्ट इन्स्टिन् | ८३ |
| १८ व्हॉन हिंडेनबुर्ग | ८८ |
| १९ रूझवेल्ट | ९२ |
| २० चार्चिल | ९६ |
| २१ आयसेनहोअर | १०० |

अनुक्रम ९८५९
विभाग ग्रा. वा.
क्रमांक १०८१
नों. दि. ३/१३/

आजकालच्या जगांतील

# थोर विभूति

## गांधीजी : १

“ गांधींच्या पवित्र शिरकमलाचें चुंबन घ्या. मग त्यायोगें तुमचे ओठ जळाले तरी पर्वा नाहीं. गांधी हे सत्याचें मुख आणि सौंदर्याचे नेत्र आहेत. जगांतले संत व महर्षि गांधींच्याभोंवतीं जमा झाले आहेत. ” हा उतारा हिंदुस्थानांतील एकाद्या कॉंग्रेसपक्षीय नियतकालिकांतील नाहीं अथवा एकाद्या कट्टर गांधीभक्तानें केलेल्या भाषणांतीलहि नाहीं. ‘ नेहजा-तुलल् इराक ’ नांवाच्या इराक देशांतील एका तद्देशीय वृत्तपत्राचा हा अग्रलेख आहे ! सुधारलेल्याच नव्हे तर अर्धवट सुसंस्कृत देशांत देखील महात्माजींच्याबद्दल कसा आदरभाव वसत आहे ह या उताऱ्यावरून दिसून येईल.



जगभर प्रवास करणाऱ्या एका हिंदी मुशाफरानें आपले अनुभव प्रसिद्ध केले आहेत. त्यांत तो म्हणतो कीं, “ स्वीडन—नॉर्वे-पासून तों आफ्रिकेंतील आणि जावासुमात्रांतील रानटी लोकांपर्यंत मी जाऊन पोंचलों आहें. जगाच्या उलाढालींबद्दल ज्यांना कांहींच कदर वाटत नाहीं अशा कित्येक रानटी टोळ्याहि मीं पाहिल्या. पण त्या सर्व ठिकाणीं म. गांधींच्याबद्दलचा आदर व त्यांच्या जीवित-कार्याविषयीं वाटणारें कुतूहल दिसून आलें. ” पॅरिसमध्यें

मिठाच्या भांड्यावर गांधीजींचा मुखवटा वापरण्यांत येऊं लागला. 'मिकी माऊस' या अमेरिकन व्यंगाचित्रांत गांधीजींचें चरित्र रंगविण्यांत आलें, इतकेंच नव्हे तर कित्येक श्रीमंत आङ्ग्ल युवतींनीं गांधीजींची आठवण म्हणून खादीची फीत आपल्या बहुमोल कपड्यावर लावण्याची पद्धत पाडली. हिंदुस्थानांत नव्हे तर जगांतहि इतक्या दिगंत कीर्तीचा प्रभावशाली पुरुष क्वचितच झाला असेल.

गांधीजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजीं झाला. मृत्युसमयीं त्यांचें वय ७९ वर्षांचें होतें. एवढ्या अवधींतील त्यांच्या कार्याचें चित्र जितकें विशाल तितकेंच आकर्षक आहे. हें चित्र रंगविण्याकरितां कालाचा बराच मोठा पट त्यांनीं व्यापिला आहे. शुचि आणि श्रीमंत पितरांच्या घराण्यांत जन्म घेऊन पोरबंदर व राजकोट येथें हायस्कूलचें आणि नंतर भावनगर येथें कॉलेजचें शिक्षण घेईपर्यंत महात्मा मोहनदास यांच्या चरित्रांत कांहीं विशेष घडलेलें नाहीं. तथापि एक दोन साध्याच गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एकदां मोहनदासांनीं कांहीं चमचमीत खाद्य पदार्थ विकत घेण्याकरितां वडील माणसांना नकळत अंगावरील एक सोन्याचा जिन्नस विकला. पण ही गोष्ट त्यांच्या मनाला इतकी लागली कीं, तो खाद्य पदार्थ त्यांच्या घशाखालीं उतरेना. अखेर त्यांनीं मोठ्या माणसांना आपला अपराध अश्रुपूर्ण नेत्रांनीं निवेदन केला! तसेंच त्यांना कांहीं वाईट सोबत्यांच्या संगतीनें मांसाहाराची संवय जडली होती. अर्थात हें काम वडील माणसांच्या चोरून चाले. बाहेर यथेच्छ ताव मारल्यानें घरीं जेवतांना मोहनदासांनीं घासभर खाऊन उठावें. आईनें कारण विचारल्यास भूक नाहीं म्हणून सांगावें. पण सतत खोटें बोलण्यानें मोहनदासांच्या मनाला वेदना होऊं लागल्या आणि अखेर त्यांनीं मांसाहाराची संवय सोडून दिली. या दोन उदाहरणांवरून मोहनदासांवर विवेकशक्तीच्या निष्ठेची पकड किती जबर होती हें

दिसून येईल. याच निष्ठेच्या जोरावर 'सत्याचे प्रयोग' करीत त्यांनीं महत्पद मिळविलें आहे.

१८८८ सालीं महात्माजी बॅरिस्टर होण्यास विलायतेस गेले. तेथून यशस्वी होऊन आल्यानंतर कधीं राजकोट तर कधीं मुंबई अशा दोन ठिकाणीं ते वकिली करीत. पुढें एका मेमन व्यापाऱ्याचा खटला निघाला. तो प्रिटोरिया ( आफ्रिका ) येथें चालावयाचा होता. या मेमन व्यापाऱ्यानें त्या खटल्यासाठीं गांधींनाच वकील दिलें. या आपल्या कृत्यानें हिंदुस्थानच्या इतिहासाला वळण देणाऱ्या महापुरुषाला आपण केवढी मोठी संधि देत आहोंत हें त्या बिचाऱ्या मेमन व्यापाऱ्याच्या ध्यानींहि नसेल !

कारण आफ्रिकेमध्यें पाय ठेवल्यापासून 'हिंदी' म्हणून म. गांधींचा युरोपियन् लोकांकडून जेथें तेथें अपमान होई आणि त्यांची बीजरूपानें असलेली देशभक्ति व न्यायप्रियता फुलविली जाई. लौकरच ते आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या जीवनाशीं समरस झाले आणि त्यांनीं डोईपट्टी, मताधिकारबंदी इ० जुलमी कायद्यांविरुद्ध तेथील हिंदी लोकांच्या वतीनें झगडण्यांत पुढाकार घेतला. या चळवळींत गांधीजींनीं अलोट क्लेश सोसले. इंग्लंडांत पार्लमेंटपर्यंत गाऱ्हाणीं नेलीं. हिंदुस्थानभर दौरा काढून आफ्रिकेंतील हिंदी लोकांचे हाल निवेदन केले आणि गुरूंचा—कै० गोखल्यांचा—आशीर्वाद घेऊन वसाहतसरकारशीं सामना दिला. यावेळीं चिडलेल्या गोऱ्या लोकांनीं त्यांच्यावर प्राणघातक हल्ले करण्यासहि कमी केलें नाहीं ! अखेर आफ्रिकेंतील लढ्यांत गांधीजींचा बहुतांशीं विजय झाला.

गांधीजींची खरी तपश्चर्या आफ्रिकेंतच सुरू झाली. वकिली सांभाळून फावल्या वेळांत ते धर्मग्रंथ वाचीत. पीडित मानवजातीच्या उद्धारार्थ झटणाऱ्या मॅझिनी, टॉलस्टॉय, थोरो, रस्किन् इ० चे ग्रंथहि

ते मननपूर्वक अभ्यासीत. या सर्वांचा परिणाम त्यांच्या संस्कारक्षम मनावर झाला आणि अहिंसा, सत्य, समता या त्रयींवर उभारलेलें त्यांचें तत्त्वज्ञान तयार झालें. जीं थोर तत्त्वें पुस्तकांत शिकावयाचीं तींच प्रत्यक्ष कार्यांत आणावयाचीं, नव्हे अगदीं कायावाचामनें-करून तीं आचरणांत उतरावयाचीं हा त्यांचा बाणा असे. लौकरच गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा बोलबाला झाला आणि त्यांचे एक गुरु महर्षि टॉलस्टॉय यांनीं त्यांना पत्र पाठवून कळविलें कीं, " आफ्रिकेंत आपण चालविलेली चळवळ ही जगांत अत्यंत उपयुक्त व अभूतपूर्व आहे. ख्रिस्ती राष्ट्रेंच नव्हे तर इतरहि राष्ट्रें तींत भाग घेतल्यावांचून रहाणार नाहींत."

आफ्रिकेंतील आपली कामगिरी संपवून म. गांधी हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर १९१४ सालीं आले. तेव्हांपासून गेलीं ३२ वर्षे ते हिंदी राजकारणाच्या अगदीं आघाडीवर होते. २० मे १९०५ या दिवशीं अहमदाबाद येथें त्यांनीं सत्याग्रहाश्रम स्थापला आणि तेथें ते राहूं लागले. त्यावेळीं ते कट्टे असहकारवादी झालेले नव्हते. बोअर युद्धांत त्यांनीं स्वतः स्वयंसेवकांचीं पथकें उभारून सरकारतर्फे काम केलें आणि सरकारनेंहि त्यांना 'केसर–इ–हिंद' पदक अर्पण करून त्यांचा गौरव केला. १९१७ सालीं चंपारण्यांत त्यांनीं जो सत्याग्रह केला त्यावेळींहि ते पुरतेपणीं असहयोगी झालेले नव्हते. महायुद्धांत देखील सरकारला मदत करण्याकडेच त्यांची प्रवृत्ति होती. परंतु रौलेट कायद्याच्या जन्माचीं चिन्हें दिसूं लागल्यापासून त्यांचें मन फिरलें आणि १९१९ सालीं जालियनवाला बागेंत जनरल डायर नांवाच्या अधिकाऱ्यानें जी लोकांची अमानुष कत्तल केली तिच्यामुळें तर गांधीजींची शांत व सहकारी वृत्ति बंडखोर व असहकारितावादी बनली. पुढें १९२० पासून त्यांनीं सरकारशीं उघड उघड संग्रामच चालविला. त्याच वर्षी कै. लोकमान्य टिळक

मृत्यु पावले आणि हिंदुस्थानचें पुढारीपण म. गांधींकडे आलें. गांधीजींनीं शाळा, कोर्ट व कायदेकौन्सिलें यांवर बहिष्कार पुकारला आणि सत्याग्रहाचा झेंडा उभारला.

ही पहिली असहकारितेची चळवळ २–४ वर्षे चालली. पुढें हिंदुस्थानची वृत्ति अद्यापि अहिंसामय सत्याग्रह करण्याइतकी उन्नत झालेली नाहीं म्हणून गांधीजींनीं सत्याग्रहाचें अस्त्र परत घेतलें. लौकरच त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. या अवधींत कै. दास, कै. मोतीलाल इ० मातबर पुढाऱ्यांनीं कॉंग्रेसमध्यें कौन्सिलप्रवेशाची भूमिका तयार करून ठेविली होती. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें गांधीजींची सुटका मुदतीपूर्वीं झाली आणि गांधीजींनीं कौन्सिलप्रवेशाला आपली संमति नाइलाजानें दिली. तथापि ते मात्र प्रायः संन्यस्त वृत्तीनेंच वागत.

पुनः १९३० सालीं गांधीजींनीं मिठाचा कायदेभंग करून देशांतच नव्हे तर जगांत एक तऱ्हेची खळबळ करून टाकली. हजारो लोकांनीं त्या चळवळींत भाग घेतला. कित्येकांनीं सर्वस्वाचें हवन केलें. हिंदी राष्ट्रप्रेमाची गंगा इतकी तुडुंब भरून फोफावत पूर्वीं कधींच वाहिली नाहीं ! त्यावेळी अधीर, उत्साहित व प्रफुल्ल अंतःकरणानें ज्यांनीं तो लढा पाहिला ते धन्य होत ! चळवळींत गांधीजींना आपल्या थोर सहकाऱ्यांबरोबर व असंख्य अनुयायांबरोबर कारागृहवास घडला. पण लौकरच सरकार व कॉंग्रेस यांची तडजोड होऊन गांधीजींना सन्मानपूर्वक मंडलाकार परिषदेकरितां विलायतेस नेण्यांत आलें.

त्यानंतर गांधीजींचें स्वदेशीं आगमन, पुनः पुढाऱ्यांचा कारावास, गांधीजींचे लहानमोठे उपवास, पुणें परिषद्, अस्पृश्यतानिवारणासाठीं त्यांनीं काढलेला अलौकिक दौरा, रांची येथें कौन्सिलवादी पक्षाची स्थापना, गांधीजींची कायदेभंगतहकुबी, कॉंग्रेस मंत्रीमंडळाची स्थापना इ० प्रसंग चित्रपटांसारखे, एकमेकांपुढें सरकत गेलेले दिसतात.

१९३७ झालीं काँग्रेस मंत्रिमंडळें स्थापन झालीं तेव्हां हिंदुस्थानांतल्या ७–८ प्रांतांवर गांधीजींना आपलें नैतिकच नव्हे तर राजकीय प्रभुत्वहि स्थापणें शक्य झालें. ७–८ मंत्रिमंडळें त्यांच्या चरणाशीं आपला करभार घेऊन लीनतेनें उभीं होतीं. यावेळीं शिक्षण, ग्रामोद्योग, दारूबंदी, अस्पृश्यतानिवारण इ० आपल्या आवडत्या ध्येयांना मूर्तस्वरूप देण्याचा गांधीजींनीं मंत्रीमंडळाच्या साह्यानें प्रचंड प्रयत्न केला. पुढें १९३९ सालीं युद्ध सुरू झाल्यानें कॉं. मंत्रिमंडळांनीं अधिकारसंन्यास केला आणि त्यायोगें हें काम अर्धवट राहिलें हें खरें. पण एक उत्कृष्ट उपक्रम भावि कालासाठीं करण्यांत आला हें निर्विवाद होय.

पण या शांततेच्या कालापेक्षांहि युद्धाच्या विश्वव्यापी संकटांतच गांधीजींच्या विभूतिमत्त्वाचें पूर्ण दर्शन जगाला झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. जर्मनीच्या हिंसावादी हुकूमशाहीबद्दल त्यांना प्रेम वाटत होतें असें मुळींच नाहीं. पण या हुकूमशाहीविरुद्ध हिंसेच्या साधनांनींच विजय मिळवूं पहाल तर जर्मन हुकूमशाही नष्ट होईल पण तिचें अवतारकार्य तसेंच राहील, असा गंभीर इषारा गांधीजींनीं दिला आणि हिंसात्मक युद्धाला तात्त्विक विरोध करण्यासाठीं वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम आरंभली. अनेक लहानमोठे देशभक्त यांत सामील झाले. ही मोहीम प्रत्यक्ष युद्धकार्याला अडथळा करण्यासाठीं नव्हती तर हिंसात्मक युद्धाला विरोध हें या चळवळीचें मुख्य सूत्र होतें.

१९४१ च्या डिसेंबरांत जपाननें दोस्तांच्या विरुद्ध युद्धांत उडी घेतली आणि त्यामुळें ब्रिटिश सरकार फारच हवालदील झालें! १९४२ च्या मार्च महिन्यांत सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांनीं येथें येऊन एक समेटाचा प्रयत्न करून पाहिला. पण या प्रयत्नांत सद्धेतूपेक्षां मुत्सद्देगिरीच अधिक प्रबळ होती. सत्ता देण्याचा देखावा करून गांधीजी व काँग्रेस यांचें सहकार्य मिळविण्याचा ब्रिटिश राजनीतीचा तो एक डाव होता. अर्थात राष्ट्रीय नेते या डावाला बळी पडले नाहींत.

विभाग : क्रमांक ९०८ ३९१

गांधीजींच्या अंगची क्रांतिकारकता यानंतर झगझगीतपणें जगाला दिसली. देशाच्या दाराशीं शत्रूचीं सैन्यदळें धडकणार अशी स्थिति होती. प्रस्थापित राजसत्ता परचक्राचे निवारणासाठीं अनेक आघाड्यां-वर पांगली गेली होती. देशांत अराजकता माजेल ही भीति होती. अशा वेळीं निग्रहपूर्वक ‘ हिंद छोडो ’ ( Quit India ) असा आदेश गांधीजींनीं इंग्रजांना दिला. ‘ देशांत अंदाधुंदी, यादवी माजली तरी चालेल पण तुम्ही येथून निघा. आमचें दैन्य, अधःपात, दुःस्थिति या सर्वांचें मूळ तुम्हीं आहां ’ असें इंग्रजांना गांधीजींनीं बजावलें. इतकेंच नव्हे, तर हिंदी स्वातंत्र्य हें जागतिक हिताच्या दृष्टीनेंहि इतकें महत्त्वाचें आहे कीं, अमेरिकेसारख्या स्वातंत्र्यवादी राष्ट्रांनीं इंग्रजांवर दडपण आणून त्यांच्याकडून हिंदुस्थानला स्वातंत्र्य देवविलें पाहिजे असा प्रभावी प्रचार त्यांनीं केला. हिंदुस्थानांतल्या कोट्यवधि लोकांच्या मनांत जी स्वातंत्र्य-भावना धगधगत होती, तिला ‘ हिंद छोडो ’ या शब्दांनीं व्यक्त रूप मिळालें. ८ ऑगस्ट १९४२ रोजीं मुंबई येथें भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकींत ‘ हिंद छोडो ’ हा ठराव पास झाला, आणि त्याची अंमलबजावणी करण्याकरितां गांधीजींनीं ‘ करेंगे या मरेंगे ’ असा दिव्य संदेश जनतेला दिला. पण त्याच रात्रीं गांधीजी व प्रमुख काँग्रेस नेते यांना सरकारनें पकडून अज्ञात स्थळीं स्थानबद्ध करून ठेविलें ! देशांत साहजिकच यायोगें प्रचंड प्रक्षोभ माजला. स्वातंत्र्यासाठीं संग्राम करण्यास जनता सिद्ध होती कांहीं क्रांति-कारक युवक नेते भूमिगत होऊन क्रांतीचें नेतृत्व घेत होते. कांहीं काळ प्रस्थापित सरकार उलथून टाकण्याचे निकराचे प्रयत्न झाले. पण सरकारनें ‘ सिंहासारखी हिंसा ’ करून ते हाणून पाडले. तथापि महाराष्ट्र, बिहार इ० ठिकाणीं ‘ प्रतिसरकारें ’ व ‘ ग्रामराज्यें ’ स्थापण्याचे उपक्रम जागृत जनतेनें फार मोठ्या प्रमाणांत यशस्वी करून दाखविले.

सरकारनें गांधीजींना जगापासून पूर्णपणें दूर केलें होतें. जगांत तर असा प्रचार चालला होता कीं, जपानच्या हुकूमशाहीकडे गांधीजींचें मन झुकलेलें आहे. हिंदुस्थानांत चाललेल्या हिंसात्मक चळवळीची जबाबदारीहि गांधीजींवर टाकण्याचें कारस्थान रंगत होतें. अशा वेळीं तुरुंगाच्या भिंतीआड २१ दिवसांचें उपोषण सुरू करून गांधीजींनीं सरकारच्या कुटिल नीतीला तोंड दिलें. जगाशीं तेवढ्या काळांत संबंध येऊन गांधीजींनीं आपलें शुद्ध स्वातंत्र्यप्रेम व अहिंसाव्रत जगाच्या निदर्शनास आणिलें.

दुसरे वर्षीं गांधीजींच्या धर्मपत्नी पूज्य कस्तुरबा स्वर्गवासी झाल्या ! गांधीजींना तापानें पछाडल्यामुळें सरकारनें त्यांची मुक्तता केली. तुरुंगांत महादेवभाईसारखे निष्ठावंत भक्त, कस्तुरबासारख्या अलौकिक धर्मपत्नी दिवंगत झालेल्या आणि बाहेर चळवळ थंडावलेली. अशा स्थितींतहि गांधीजी खचून गेले नाहींत. त्यांनीं लढाऊ कार्यक्रम बाजूला ठेवून नवा विधायक डाव मांडला. जगाचें लोकमन आपणांस अनुकूल करून घेऊन राजकीय कोंडी फोडण्याचा मोठा खटाटोप पुनश्च करण्याच्या ते उद्योगाला लागले. त्यांच्या आशावादाला तोड नाहीं. जमिनीला पाठ लागली कीं भीमाचें बळ हजार पटींनीं वाढे म्हणतात. तसेंच गांधीजींचें होतें. एक चळवळ अपेशी झाली तर अधिक नेटानें ते नवें काम हातीं घेत.

गांधीजी हें एक कोडें होतें. हिंदु लोकांना ते मुसलमानांचे कैवारी वाटत, समाजसत्तावादी लोक त्यांना भांडवलवाल्यांचे पाठीराखे म्हणत, निव्वळ राजकारणी लोकांना त्यांची अस्पृश्यतानिवारणाची चळवळ राजकारणाशीं संलग्न केलेली आवडत नसे, सनातनी लोक धर्मविध्वंसक म्हणून त्यांच्यावर उठले होते, क्रांतिकारकांना त्यांच्या अहिंसावादाची शिसारी येई, त्यांची कॉंग्रेसमध्यें चाललेली विभूति-पूजा हा सर्वच पक्षांच्या नापसंतीचा विषय होता; इंग्रज सरकारला

त्यांच्याविषयीं आपलेपणा न वाटावा हें साहजिकच होतें. स्वजनांतील पंथोपपंथ आणि परकीय सरकार हीं सर्वच त्यांच्यावर नाखूष होतीं.

तथापि हिंदी लोकांच्या उद्धारासाठीं त्यांनीं जो प्रचंड खटाटोप केला तो जगाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमूद केला जाईल. कै. लोकमान्यांनीं स्वराज्याचा मंत्र हिंदुस्थानला दिला आणि गांधीजींनीं आपल्या अतुल प्रतापानें स्वराज्याच्या मार्गावर जनतेला पुढें पुढें जाण्यास शिकविलें. हजारों लोकांचे संघ स्थापून आखिल भारतीय चळवळ चालवावयाची हिंमत त्यांनीं राष्ट्रांत उत्पन्न केली. यज्ञ किंवा त्याग ही हिंदु तत्त्वज्ञानांतली श्रेष्ठ शक्ति त्यांच्या रूपानें अवतरल्याचा भास कविसम्राट् रवीन्द्रनाथांना झाला हें उचित होतें. कारण गांधीजींच्या स्फूर्तीनेंच नेहरू, दास, पटेल, राजेंद्रबाबू, राजाजी इ० लोकाग्रणी व इतर अगणित स्त्रीपुरुष देशासाठीं सर्वस्वाचा होम करण्यास निघाले. दलितवर्गाच्या उद्धाराची खटपट तर येशू ख्रिस्तानंतर गांधीजीं-इतकी अनन्य कारुण्यभावानें जगांत कोणीहि केली नाहीं. थोडक्यांत म्हणजे गांधीजींमुळें हिंदी राष्ट्राच्या वाणींत व रहाणींत प्रसाद व साधेपणा आला, त्याची इभ्रत जगांत वाढली, मोठमोठ्या सामुदायिक चळवळी पेलण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त झालें आणि विषमता व पारतंत्र्य यांची जाणिव त्याला होऊन बंधविमोचनाकरितां हवा तो त्याग करण्यास तें राष्ट्र सिद्ध झालें.

गांधीजींच्या खाजगी जीवनांत डोकावून पाहिलें तर भक्तीनें शिर नम्र होईल. ते अत्यंत काटकसरीनें राहात. दररोज येणाऱ्या अनेक पत्रांतले कोरे कागद उत्तर पाठविण्याकरितां जपून ठेवण्याची ते दक्षता बाळगीत. ठराविक मुदतीच्या अगोदर जर हातरुमाल हरवला तर ती मुदत होईपर्यंत ते दुसरा घेणार नाहींत. हिंदुस्थानभर पसरलेल्या आपल्या हजारों निष्ठावंत अनुयायांचा त्यांना विसर पडत नसे. कोणी कितीहि टाकून बोललें तरी त्यांचे तोंडून अपशब्द जात नसे. पत्राचीं

उत्तरें अगदीं वेळच्या वेळीं पाठविण्याविषयीं त्यांचा कटाक्ष असे. येशू-प्रमाणेंच लहान मुलें त्यांना फार आवडत. प्रार्थना, वाचन, लेखन, निदिध्यास, मौन इ० सर्व गोष्टी अत्यंत समचित्तानें पार पाडण्यांत त्यांचा हातखंडा असे. त्यांचें वाचन अगाध नव्हतें. पण उत्कृष्ट व निवडक ग्रंथांचें त्यांनीं पठन केलें होतें. गुजराथी व इंग्रजी भाषांवर त्यांचें असामान्य प्रभुत्व होतें. आपल्या आध्यात्मिक भूमिकेचा त्यांना क्षणमात्रहि विसर पडत नसे. महात्माजींच्या सार्वजनिक जीवनाबद्दल त्यांना नांवें ठेवणारे पुष्कळ असतील; पण त्यांच्या निष्कलंक व उदात्त वैयक्तिक जीवनाविषयीं बोलतांना 'महात्मा' ही त्यांची उपाधि 'सर्वेषामविरोधेन' मान्य होईल हें निःसंशय.

१५ ऑगस्ट ,१९४७ रोजीं ब्रिटिशांनीं या देशावर दीडदोनशें वर्षें करीत असलेलें राज्य स्वखुषीनें सोडून दिलें. परंतु तें करतांना गांधी-जींच्या मनाविरुद्ध गोष्ट घडली. आणि ती म्हणजे अखंड भारताचे तुकडे पडले. पाकिस्तान आणि हिंदी संघराज्य असे दोन प्रदेश होऊन संघराज्यावर आपले पुढारी हुकमत गाजवूं लागले. ज्या ध्येयासाठीं गांधीजी आमरण झगडले तें ध्येय १५ ऑगस्टला साध्य झालें.

पण असा हा गरिबांचा कैवारी, दलितांचा उद्धारक, अनाथांचा नाथ हिंदुस्थानला मिळालेलें स्वातंत्र्य सहा महिन्यांच्यावर पाहूं शकला नाहीं.

कारण ३० जानेवारी १९४८ रोजीं एका माथेफिरूच्या गोळीला बळी पडून गांधीजींनीं आपली इहलोकची यात्रा संपविली. गांधीजी आपल्यांतून गेले असले तरी त्यांची बंधुत्वाची शिकवण मात्र आपण कधीं विसरतां कामा नये.

****

# पं. जवाहरलाल नेहरू : २

शुचि आणि श्रीमत् अशा घरीं जन्म, इंग्लंडच्या स्वातंत्र्यभूमींत उच्च व पद्धतशीर शिक्षण, प्रेमळ व सामर्थ्यवान् पित्याचें छत्र, नैसर्गिक गुणसंपदाहि चांगल्या प्रकारची, एका अलौकिक महात्म्याची अखंड कृपा-दृष्टि—खरोखर पंडित जवाहरलाल नेहरूं-सारखें असें अष्टपैलू भाग्य फारच थोडयांना लाभतें. एकादा अवतार जन्म घेण्याचे वेळीं सर्व अनुकूल परिस्थिति कोणी अज्ञात शक्तीनें उत्पन्न करून ठेवावी, त्याप्रमाणें पंडितजींच्या संस्काराचे बाबतींत दक्षता बाळगलेली दिसते. पण या भाग्यांत त्यांची जीवनशक्ति गुरफटली गेली नाहीं.



संपन्नतेच्या पायावर उभारलेलें त्यांच्या त्यागाचें व पराक्रमाचें मंदिर एवढें भव्य आहे कीं, ‘म. गांधींच्या खालोखाल श्रेष्ठ हिंदी राजकारणी पुरुष’ म्हणून जवाहरलालची कीर्ति साऱ्या सुधारलेल्या जगांत पसरली आहे.

नेहरू हे उच्च काश्मिरी ब्राह्मण असून पूर्वी राजकौल या नांवानें काश्मिरांत प्रसिद्ध होते. परंतु त्यांचा एक पूर्वज फरुक्सियर बादशहाचे वेळीं दिल्लीस आला. हा संस्कृत आणि फारशी भाषांत फार व्युत्पन्न होता. बादशहानें राजकौल यास काल्व्याचे कांठीं असलेली एक जहागीर बक्षीस दिली. नहर म्हणजे कालवा, यावरून ‘नेहरू’ असें अभिधान या कुटुंबास मिळालें. नेहरूकुटुंबाचा अभिजातपणा व रुबाब अखंड चालत राहिला. दिल्लीचे कोतवाल गंगाधरलाल यांची तसबीर पाहिली म्हणजे एकाद्या प्रतापशाली मोंगल बादशहाची

आठवण होते. त्यांचे चिरंजीव पंडित मोतीलाल. यांची भव्याकृति हिंदी जनतेच्या स्मरणपटलावर ताजीच आहे. या उच्च व सुसंस्कृत घराण्यांत १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं हिंदरत्न जवाहरलाल नेहरू जन्मास आले.

जवाहरलालना पाठीवर भावंड उशीरां झालें आणि इतर तरुण मुलें त्यांच्यापेक्षां वरींच मोठीं होतीं. त्यामुळें त्यांचें बाल्य कांहींसें एकलकोंडे-पणांतच गेलें. समोर वडिलांचें पहाडासारखें थोर व्यक्तित्व जागतें होतें आणि शिक्षणाची व संगोपनाची काळजी कसोशीनें घेतली जात होती. थिऑसफीचें सांस्कृतिक आणि धार्मिक शिक्षणहि जवाहरलालना लहान-पणापासून मिळालें; आणि या चलाख, पाणीदार, अभ्यासू मुलाची पूर्वतयारी होतांच १५ व्या वर्षी त्यास उच्च शिक्षणाकरितां इंग्लंडांत पाठविण्यांत आलें.

हॅरो आणि केंब्रिज येथील शाळांत पं. जवाहरलाल यांचें पुढील सर्व शिक्षण झालें. सुटीकरितां ते क्वचितच हिंदुस्थानांत येत. बी. ए. व नंतर बॅरिस्टर होईपर्यंत ते इंग्लंडचेच रहिवासी झाले होते. ज्या वयांत माणसाच्या मनाची बांधणी चालू असते त्या वयांत जवाहरलाल हे इंग्लंडच्या सांस्कृतिक केंद्रांत शिक्षण घेत होते. अर्थात् इंग्लिश संस्कृतींतील उत्कृष्ट गुणांची पेरणी त्यांच्या मनोभूमिकेंत झाली. “ मला इंग्लिश माणसांचा मुळींच द्वेष नाहीं. कारण माझ्या मनोधर्मात इंग्लंडशीं जुळतें असें पुष्कळच आहे. ” हे त्यांचे उद्गार परमार्थानें खरे आहेत.

केंब्रिज येथें जवाहरलाल असतांना किचलू, सुलेमान, शेरवानी सेनगुप्त इ० आज प्रख्यात झालेली वरीच मंडळी तेथें होती. बहुधा सर्व हिंदी तरुणांचीं मनें टिळकांच्या जहाल तत्त्वज्ञानानें भारावलेलीं होतीं आणि टिळक–अरविंदांच्या तेजस्वी उद्गाराकडे कान लावून सर्वजण बसलेले असावयाचे. कायदेपंडिताची पदवी संपादन करून १९१२ सालीं पंडितजी मातृभूमीस परतले.

असहकारितेचा उदय होईपर्यंत जवारलालजींचें राजकारण धिमें होतें. होमरूल लीगचे जॉईंट सेक्रेटरी म्हणून सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांचेबरोबर ते काम करीत. वेझंट बाईंच्या झेंड्याखालीं त्यांनीं काम केलें. मॉटफर्ड सुधारणा आल्यानंतर जी असहकारितेची चळवळ म. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं सुरू झाली तींत प्रथम धडाडीनें असा राजकारणांत त्यांनीं प्रवेश केला आणि नंतर आज दोन तपें या क्षेत्रांत उदंड झटून व खडतर हालअपेष्टा सोसून आज ते देशाचे कंठमणि झाले आहेत.

गांधीजींचें अहिंसात्मक तत्त्वज्ञान आणि राजकारणाकडे पाहण्याची आध्यात्मिक दृष्टि पंडितजींना मानवण्यासारखी नव्हती. कारण पंडितजींचा भर पहिल्यापासून शास्त्रीय दृष्टिकोनावर आणि तर्कशुद्ध विचारावर होता. १९२६ मध्यें युरोपांत जाऊन आल्यानंतर ते पक्के समाजवादी बनले आणि 'जगांतील दुःखें व विषमता नष्ट करण्यास मार्क्सप्रणित समाजवाद हा एकच उपाय आहे' असा त्यांना दृढ विश्वास उत्पन्न झाला. तथापि काँग्रेस आणि गांधीजी यांपासून वेगळें होण्याचें त्यांच्या मनांतहि आलें नाहीं. गांधीजींच्या तत्त्वप्रणालींत भरपूर संदिग्धता असेल. परंतु राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा गांधीजींनीं शेतकरीमजुरांच्या झोंपडीपर्यंत पोंचविला. यामुळें पंडितजींना त्यांच्याविषयीं गाढ कृतज्ञता वाटते; म्हणून पंडितजींनीं आजवर गांधीजींचें नेतृत्व निष्ठेनें पाळलें आणि शेवटपर्यन्त त्यांना कौल लावूनच पंडितजी आपला राजकीय कार्यक्रम चालवीत.

काँग्रेसच्या दोनहि चळवळींत पं. जवाहरलाल आघाडीवर होते. सुमारें १० काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून त्यांनीं काम केलें. आणि मद्रास येथें (१९२७) पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास करून घेतला. काँग्रेस आपल्या जहाल मार्गापासून नेमस्त मार्गाकडे न जावी म्हणून त्यांनीं अहर्निश खटपट केली. जगांतील दलित राष्ट्रांची परिषद

ब्रुसेल्स येथें भरली असतांना पं. जवाहरलाल यांनीं हिंदी राष्ट्रातर्फे प्रतिनिधि म्हणून हजर राहून चांगली कामगिरी केली. १९२९ सालीं लाहोर येथें भरलेल्या कॉंग्रेसचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें. तेव्हांपासून पूर्ण स्वातंत्र्य व समाजवाद यांचा प्रचार त्यांनीं चालविला आहे. लाहोर कॉंग्रेसपूर्वी देशभर उत्पन्न झालेल्या युवक-संघाच्या चळवळीचे प्रणेते व स्फूर्तिनिधान पं. जवाहरलाल हेच होते; आणि मजूर कॉंग्रेसचें नेतृत्वहि एकवेळ त्यांच्याकडे आलें होतें. लखनौ व फैजपूर येथें (१९३५–३६) कॉंग्रेसनें लागोपाठ दोन वेळां अध्यक्षपदाचा मुकुट त्यांच्या डोक्यावर चढवून एका नव्या युगाला आरंभ केला. कै. सौ. कमलादेवींच्या निधनाची खिन्न छाया मनावर दाट पसरली असतांनाच राष्ट्राचीं सूत्रें पंडितजींकडे आलीं. पण त्यांनीं आपलें कार्य चोख बजाविलें आहे. 'स्वतःसाठीं संचय करण्याची वृत्ति जाऊन समाजासाठीं झटण्याची सहकारी वृत्ति निर्माण झाली पाहिजे' यासाठीं पंडितजींनीं आपल्या तत्त्वज्ञानाचा लेखन–भाषणद्वारां प्रचंड प्रचार केला. 'नागरिक–स्वातंत्र्य हक्क संरक्षणा'ची त्यांची योजना अपूर्व असून वजनदार लोकांचा तिला पाठिंबा मिळाला. राष्ट्रीय संयोजन समितीचे ते अध्यक्ष होते, आणि हिंदुस्थानच्या आद्योगिक उत्कर्षाचा आराखडा मोठ्या प्रयत्नेंकरून या समितीकडून त्यांनीं तयार करविला. आज देशापुढें ज्या अनेक प्रमुख आर्थिक योजना आहेत त्यांच्या रचनेस या समितीच्या कार्याचा पाया म्हणून उपयोग झाला हें सर्वश्रुत आहेच.

गेल्या दहाबारा वर्षांत पंडितजींच्या कार्याला तुफान भरती येऊन तिचा प्रभाव सर्व क्षेत्रांत पसरलेला दिसतो. फैजपूर कॉंग्रेसचे अगोदर व नंतर कॉंग्रेसनें सनदशीर राजकारणाचा मार्ग चोखाळावा याच्या-विरुद्ध पंडितजी होते. परंतु कॉंग्रेसनें त्यांच्या विरुद्ध कौल दिला आणि पंडितजींचें लोकसत्तावादी मन इतकें उदार व शिस्तप्रिय कीं, कॉंग्रेसच्या

आदेशानुसार लगेच निवडणुकी जिंकण्यासाठीं आसेतुहिमाचल ५० हजार मैलांचा दौरा तीनचार महिन्यांचे अवधींत पंडितजींनीं केला. आजच्या जगांत उपलब्ध असलेलें एकहि वाहन स्थळ—जळ—अंतराळांतील या विराट संचारांत त्यांनीं वापरण्याचें ठेवलें नाहीं ! सुमारें एक कोटी लोकांना स्वातंत्र्याचा संदेश ऐकविला. त्यांच्या दर्शनासाठीं येणाऱ्या लोकांची संख्या तर याहून कितीतरी पटींनीं अधिक होती ! या दौऱ्यांत पंथ, जाति, प्रांत इ० नीं विभागलेल्या विशाल भारतवर्षांतली अंतस्थ एकतानता आपणाला स्पष्ट दिसून आली, असें त्यांनीं आपल्या नव्या ग्रंथांत लिहिलें आहे.

नुकतेंच संपलेलें महायुद्ध सुरू होण्याचे अगोदर कांहीं दिवस पंडितजी युरोपांत होते. ब्रिटिश साम्राज्यशाहीचे भेकड मुत्सद्दी अरेरावी हिटलरची मनधरणी करण्यांत गुंतले होते. गरीब बिचाऱ्या झेकोस्लोव्हाकियाचा बळी देऊन जर्मनीचा बकासुर संतुष्ट करण्याचें चेंबर्लेनचें कारस्थान चालू होतें. पं. नेहरू यांनीं याचा निषेध करून सांगितलें कीं, ‘ साम्राज्यशाही स्वार्थासाठीं हुकूमशाहीची ही आराधना ब्रिटिश मुत्सद्दी करीत आहेत खरें; पण जागृत असलेली लोकसत्ताप्रेमी जनता इंग्लंडला नाझी विरोधी संग्रामांत खेचल्यावांचून राहणार नाहीं. ’ पं. नेहरूंचे हे उद्गार द्रष्टेपणाचे ठरले. कारण लौकरच चेंबर्लेन पदभ्रष्ट होऊन इंग्लंडनें युद्धांत उडी घेतली. स्पेनमध्यें नाझी—फॅसिस्टांनीं गुंडगिरी करून तेथील लोकसत्तेचा विध्वंस चालविला होता. अग्निवर्षाव चालू असतां तेथें जाऊन पं. नेहरूंनीं आपली लोकसत्तेवरील भक्ति प्रकट केली. आणि स्वदेशाकडे परतल्यावर चीनमध्यें अशाच रणधुमाळींत जाऊन चिनी लोकसत्तावाद्यांना धीर दिला. इतकेंच नव्हे तर नंतर हिंदुस्थानांत एक शुश्रूषापथक तयार करून स्वातंत्र्यवादी चिनी लढवय्यांच्या सेवेसाठीं तें चीनला रवाना केलें. लोकसत्ता व नाझी—फॅसिस्ट विरोध आंतर्राष्ट्रीय भूमिकेवरून करण्याचें

उदात्त शिक्षण पं. नेहरूंनीं प्रथम आपल्या देशाला दिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण दैवगति मात्र अशी कीं, हुकूमशाहीचा हा खंदा वैरी हुकूमशाहीविरुद्ध युद्ध चाललें असतां (१९४२) लोकसत्तेचे कैवारी म्हणविणारांनीं तुरुंगाच्या भिंतीआड अज्ञात स्थळीं कोंडून ठेविला होता ! !

या युद्धानें जगाचा सारा नूर बदलून जाईल असें भविष्य पं. नेहरूंनीं युद्धाचे आरंभींच केलें होतें. युद्धाचे बाबतींत कोणतें धोरण स्वीकारावें याचा खल करून कॉंग्रेसनें १४०० शब्दांचा एक ठराव प्रसिद्ध केला. हा मसुदा पं. नेहरूंनीं तयार केला होता. हुकूमशाहीचा नाश होणें जरूर आहे आणि त्याकरितां दोस्तांनीं आरंभलेलें युद्ध हें न्याय्य आहे हें खरें असलें तरी हिंदुस्थानला पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज त्याला या युद्धांत प्रभावी भाग घेतां यावयाचा नाहीं; साम्राज्यशाही ही हुकूमशाहीची जुळी बहीण आहे; लोकसत्तेला या दोन्हींचें वावडें आहे; अशा मुद्यांवर हा तेजस्वी ठराव आधारलेला होता. या ठरावाची जगभर वाहवा झाली.

१९४२ सालीं क्रिप्स-वाटाघाटींत नेहरूंनीं थोर मुत्सद्देगिरी दाखवून तडजोडीचा मोठा प्रयत्न करून पाहिला. पण खरें सत्तादान करण्याची ब्रिटिश सरकारची तयारीच नव्हती. मग पंडितजी व इतर राष्ट्रीय नेते यांचें औदार्य फुकट गेलें यांत नवल तें कोणतें? पुढें ऑगस्टची धामधूम सुरू झाली आणि पं. नेहरू आपल्या श्रेष्ठ सहकाऱ्यांबरोबर अहमदनगरच्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्यांत स्थानबद्ध होऊन पडले. १९४५ च्या जूनमध्यें त्यांची मुक्तता झाली.

आज पंडितजी नवभारताचे जवळ जवळ अद्वितीय नेते आहेत. तुरुंगांतून बाहेर पडतांच, ऑगस्टमध्यें झालेल्या प्रक्षोभाची सारी जबाबदारी त्यांनीं धीटपणें आपल्या शिरावर घेतली ! जनता हर्षभरित झाली ! भूमिगत व काराबद्ध क्रांतिकारकांच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे

राहिले! शेंकडों कार्यकर्त्यांनीं व अगणित लोकांनीं सोसलेल्या हाल-अपेष्टा व यातना सार्थकीं लागल्यासारखें झालें. देशांत नवें चैतन्य खेळूं लागलें. नंतर सुभाषबाबूंच्या आझाद–हिंद सेनेचा प्रश्न हिरीरीनें लढवून आणि त्यांत शंभर टक्के यश मिळवून देशांत पसरलेली उदासीनता पंडितजींनीं निपटून काढली!

या लोकोत्तर कार्याचे अंशतः उतराई होण्यासाठीं राष्ट्रानें पुनः राष्ट्राध्यक्षाचा मुकुट त्यांचे मस्तकावर ठेविला. पण नंतर राजकारणाचीं चक्रें फारच जोरानें फिरूं लागलीं. २ सप्टेंबर १९४६ रोजीं नेहरूंच्या नेतृत्वाखालीं हंगामी मंत्रीमंडळाची स्थापना झाली आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजीं हिंदुस्थान स्वतंत्र होऊन पंतप्रधानकी पं. नेहरूंकडे आली. हा कांटेरी मुकुट होता. कत्तली झाल्या, निर्वासितांचा प्रश्न भेडसावूं लागला. वर्गविग्रहानें उग्र स्वरूप धारण केलें, अन्नधान्याची टंचाई होतीच, पक्षसंघटना ठिसूळ झाली! हे व असे गहन प्रश्न देशांत आग भडकवीत असतां पंडितजींचें एकमेव आशास्थान गांधीजी मारले गेले! पण पं. जवाहरलालांनीं या साऱ्या आपत्तींना यशस्वी रीतीनें तोंड दिलें आहे. आपल्या साऱ्या शक्ति पणाला लावून ते राष्ट्र-नौका मोठ्या धीरानें हांकत आहेत. देशांत इतक्या भयंकर घडामोडी होऊन व अस्वस्थता माजूनहि हिंद सरकार देशीं विदेशीं लोकप्रियच राहिलें आहे याला पं. नेहरूंचें अलौकिक नेतृत्व व व्यक्तित्व कारणीभूत झालें हें म्हणण्यांत कांहींच अतिशयोक्ति नाहीं.

राजकारणांतील चंचल लोकप्रियता आणि क्षणभंगुर वावटळें सोडलीं तरीदेखील पं. जवाहरलाल यांच्या सुसंस्कृत व त्यागी जीवनाचा ठसा इतिहासावर कायमचा राहील यांत शंका नाहीं. त्यांची अभिरुचि उच्च दर्जाची, विचार पल्लेदार, ज्ञान अनेकांगी, आणि दृष्टि विशाल आहे. 'Glimpses of World History', 'Recent essays and

addresses', 'Letters to Indira', 'Discovery of India' इ. त्यांचे ग्रंथ ज्ञान, सुबोधता आणि भाषासौंदर्य या सर्वच गुणांत बिनमोल ठरतात. कोणतेहि विचार रेखाटतांना व्यापक आंतर्राष्ट्रीय वृत्तीच्या भूमिकेवरून ते बोलूंलिहूं लागतात. अंतर्मुख होण्याचें सामर्थ्यहि त्यांच्यांत विलक्षण आहे. सध्यां जगभर गाजत असलेलें त्यांचें आत्मचरित्र अनेक दृष्टींनीं मननीय ठरलें आहे, तें याचमुळें. "मी माझ्या पूर्व संस्कारांतून सुटूं शकत नाहीं. उलट मीं संपादन केलेलें ज्ञानहि माझ्यावर प्रभुत्व गाजवूं पहात आहे." या द्वंद्वांत सांपडलेल्या आपल्या मनाचें चित्रण आणि हिंदुस्थानचें अर्वाचीन राजकारण व त्याचें सूत्रचालकत्व यांविषयीं मूलग्राही चर्चा नेहरू यांनीं केली आहे.

जवाहरलाल हे अगदीं कर्तव्यनिष्ठुर म्हणजे 'प्युरिटन' गृहस्थ आहेत. एका सुविख्यात इंग्रजी लेखकानें 'प्युरिटन' म्हणजे 'ज्यांच्या मनाला सुटीच नसते असा मनुष्य' असें वर्णन केलें आहे. ही व्याख्या पंडित नेहरूंना योग्य लागू पडते. आपल्या कार्यासाठीं अहर्निश काम करीत राहणें याविषयीं त्यांचा लौकिक आहे. बुद्धाप्रमाणें ऐन तारुण्यांतच त्यांनीं ऐश्वर्यांतून उठून कर्तव्यक्षेत्राचा रस्ता धरला. त्यांत अनेक चळवळी, पांच सात वर्षांचा तुरुंगवास, थोर पित्याचा व प्रेमळ पत्नीचा अंत, पत्नीची अनेक वर्षें नादुरुस्त प्रकृति—या प्रचंड हेलकाव्यांत त्या मनाला ऐषआरामाची स्वस्थता कोठली मिळायला? शिवाय त्यांचें कर्तव्यकठोर मन कमालीचें भावनाप्रधान आहे. जेलमध्यें पाळलेलें कुत्र्याचें पोर आजारी असतांना रात्रीं ८–१० वेळां उठून जवाहरलाल त्याची शुश्रूषा करीत. उतावळेपणानें कडक भाषा व दुरुत्तरें ते करितात, पण चूक पटवून दिली तर आपले शब्द मागें घेण्याचा दिलदारपणाहि त्यांचे अंगीं आहे. शिवाजी महाराजांवरील चुकीचीं विधानें परत घेतांना त्यांनीं दाखविलेला प्रांजलपणा महाराष्ट्र

कधीं विसरणें शक्य आहे काय? त्यांचा शूरपणा अलौकिक आहे. एकदां २०–२५ फुटांवर गोळीबार चालला असतां ते निर्भयपणें बोलत होते, आणि छातीवर लाठ्यांचे तडाखे बसत असतां अनुयायांनीं उचलून नेईपर्यंत खंबीरपणें ते उभे राहिले. हिंदुमहासभेवर त्यांनीं जात्यंधपणाचा दोषारोप केला तेव्हां टीकाकार म्हणाले, 'मुसलमानांना हेंच बोलून पहा बरें.' पण नंतर सर महंमद इक्बल, ने. ना. आगाखान यांच्यावर पं. नेहरूंनीं आपलें टीकास्त्र धीटपणें चालविलें तेव्हां हेच टीकाकार मनांत वरमले असतील! ऐश्वर्यांत संगोपन होऊनहि पंडितजींच्या संवयी अगदीं साध्या आहेत.

—आणि त्यांचें आकर्षक व्यक्तित्व! दंवानें भिजलेल्या ताज्या मोगऱ्याच्या फुलासारखा वर्ण, भव्य कपाळ, तेजस्वी डोळे, हुकमत गाजविणारा रुबाब, अत्यंत मधुर हास्य, आणि एकंदर व्यक्तित्वाभोंवतीं दैवी संपदेचीं वलयें. विलायतेंतील कट्टया साम्राज्यविरोधी पत्रांनाहि ह्या आकर्षक हिंदी पुढाऱ्याचें शरीरसौष्ठव वर्णन करण्याचा मोह आवरला नाहीं! 'वक्तृत्व' हा गुण रूढ अर्थानें जवाहरलालजींपाशीं नाहीं; कारण भाषा प्रवाही नाहीं आणि मध्येंच, "मैं समझता—मैं सम-झता" असें अडखळणें. पण तरीहि लाखों लोकांच्या अंतःकरणाला त्यांचे बोल जाऊन भिडतात. याचें कारण त्यांतला सच्चेपणा आणि कळकळ. आज हिंदुस्थानांत अनेक लहान मोठे राष्ट्रवादी पुढारी आहेत, तरी पं. जवाहरलाल यांचें स्थान अगदीं स्वतंत्र व अनन्य आहे. 'युद्धांत पहिला, शांततेच्या काळीं पहिला, आणि जनतेच्या हृदयांत पहिला' हें वॉशिंग्टनबद्दलचें वर्णन पंडितजींना मोठ्या प्रमाणांत लागूं पडतें.

१९४७ च्या १५ ऑगस्ट रोजीं हिंदुस्थान स्वातंत्र्य मिळाल्यावर पं. जवाहरलाल भारताचे पहिले पंतप्रधान झाले. १९५२ मध्यें निवडणुकी होऊन पंडितजी पुनः पंतप्रधान झाले आहेत. कॉंग्रेसचेहि तेच

अध्यक्ष आहेत. आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत त्यांच्या कर्तृत्वास मोठा वाव आहे.

****

# रवीन्द्रनाथ : ३

म. गांधींच्या खालोखाल जगतावर कोणा हिंदी माणसाचें नांव आदरपूर्वक उच्चारलें जात असेल तर तें रवींद्रनाथांचें. काव्य आणि तत्त्वज्ञान, ऐश्वर्य आणि तपश्चर्या, देश-प्रीति आणि विश्वबंधुत्व यांचा सुंदर मिलाफ रवींद्रनाथांच्या ठिकाणीं आढळे. बर्फाप्रमाणें शुभ्र जटाभार, त्यावर काळी मखमली टोपी, अंगांत रेशमी कफनी, तेजःपुंज पण प्रेमळ मुद्रा अशा वर्णनाची रवींद्रनाथांची मूर्ति पाहिली म्हणजे वशिष्ठवामदेवासारखा एकादा प्राचीन मुनिवर्य पुनः पृथ्वीवर अवतरला आहे कीं काय असें वाटे.



त्यांना सत्तरावें वर्ष पुरें झालें त्या महोत्सवाचे प्रसंगीं त्यांना एक मौल्यवान् ग्रंथ समर्पण करण्यांत आला. त्यांत जगांतील प्रख्यात लोकांचे रवींद्रांना आलेले शुभसंदेश व रवींद्रांच्या स्तुतिपर आलेले लेख यांचा संग्रह केला होता. त्यावरून या रससिद्ध कवीश्वराबद्दल जगाला केवढा आदर वाटतो तें कळून येईल.

रवींद्रनाथांचा जन्म ता. ६ मे १८६१ रोजीं कलकत्ता येथें झाला. टागोर घराणें म्हणजे लक्ष्मी आणि सरस्वती यांचें माहेरघर. टागोरांच्या

प्रासादांत वैभवाचा लखलखाट दिसायचा, त्याचप्रमाणें वेदघोषहि ऐकूं यावयाचा. रविबाबूंचे वडील देवेंद्रनाथ टागोर ह्यांना बंगाल्यांत ' महर्षि ' म्हणत. ते मोठे तत्त्वज्ञ असून आयुष्याचा उत्तरभाग त्यांनीं परमेश्वराच्या चिंतनांत व तीर्थयात्रेंत घालविला. त्यांचे वडील ( रविबाबूंचे आजोबा ) द्वारकानाथ टागोर यांनीं उदंड पैसा मिळवला आणि तसाच दानधर्महि केला. विद्या आणि कला यांची उपासना तर टागोर घराण्यांत नित्याचीच होती. अशा संपन्न व धार्मिक घराण्यांत रविबाबू उच्च संस्कार व प्रतिभा घेऊन जन्मास आले.

लहानपणीं शाळेचें जोखड रविबाबूंना नकोसें वाटे. सृष्टिसौंदर्य पहात आणि चिंतन करीत एकटेंच हिंडत रहावें अशी त्यांची वृत्ति असे. उत्तम वाङ्मय वाचावें आणि कविता लिहाव्या हा त्यांचा अगदीं लहानपणापासून क्रम असे. पुढें बॅरिस्टर होण्याकरितां त्यांना विलायतेस पाठविण्यांत आलें. पण वकिलीच्या रुक्ष अभ्यासांत त्यांचें काव्यमय मन रमेना. लॉर्ड मोर्ले, डॉ. स्कॉट इ० प्रख्यात युरोपियन् विद्वानांच्या जवळ त्यांनीं वाङ्मयाचा अभ्यास केला. बॅरिस्टरीचीं पुस्तकें कपाटांत तशींच पडून राहिलीं. तेव्हां रवीन्द्रनाथांना परत बोलण्यांत आलें. बॅरिस्टरीची परीक्षा देण्याऐवजीं तेवढ्या काळांत ' संध्यागीत ' व ' प्रभातसंगीत ' हीं दोन उत्कृष्ट काव्यें रवीन्द्रनाथांनीं रचलीं होतीं.

यानंतर रवीन्द्रनाथांची वाङ्मयसेवा अव्याहत सुरू झाली. वंग-भंगाची चळवळ सोडली तर खळबळ उडविणारी अशी विशेष गोष्ट त्यांच्या जीवनांत घडली नाहीं. पहिल्याप्रथम अद्भुततेवर त्यांचा भर होता. मुलांच्या सृष्टींत त्यांची प्रतिभा रमूं लागली. शृंगारिक काव्यें त्यांनीं लिहिलीं. पण मनाची खळबळ अखेर शांत होऊन ' गीतांजली ' सारखें अप्रातिम भक्तिकाव्य त्यांच्या लेखणींतून उतरलें.

१९१२ सालीं म्हणजे आपल्या आयुष्याला पन्नास वर्षें पुरीं झाल्यानंतर प्रकृतीसाठीं रवीन्द्रनाथ विलायतेस जाण्यास निघाले.

करमणुकीखातर बोटीवर त्यांनीं आपल्या ‘ गीतांजली ’ तील वंगाली गीतांचीं भाषांतरें इंग्रजींत केलीं. सुदैवानें प्रख्यात आयरिश कवि यीट्स यांच्या वाचनांत तीं आलीं आणि त्यांना इतका हर्ष झाला कीं, ‘ हीं गीतें तुम्ही प्रसिद्ध करा. ’ असा त्यांनीं रवीन्द्रनाथांना आग्रह केला. रवीन्द्रनाथांची ‘ गीतांजली ’ इंग्लंडमध्यें प्रसिद्ध होतांच पाश्चात्य राष्ट्रांत एकच लाट उसळली. हिंदुस्थानांतलें उच्च तत्वज्ञान मधुर काव्याच्या रूपानें पाश्चात्यांना वाचायला मिळालें. खरोखरच केवढा श्रेष्ठ कवि निर्माण झाला आहे, असें जो तो म्हणूं लागला. १९१३ सालीं स्वीडनमधील ‘ नोबेल प्राइझ ’ हें जगत्प्रसिद्ध वक्षीस रवीन्द्रनाथांना मिळालें, तेव्हां हिंदुस्थानला केवढा तरी हर्ष झाला असेल बरें ! यानंतर मानपत्रें व पदव्या यांचा रवीन्द्रनाथांवर वर्षाव झाला. रवीन्द्रनाथांनीं आपल्याबरोबर देशाचीहि कीर्ति त्रिखंड केली.

यानंतर रवीन्द्रनाथांचें बहुतेक कार्य सार्वजनिक आहे. १९०१ सालीं स्थापलेली आपली चिमुकली शाळा वाढवून रवीन्द्रांनीं तिचें ‘ शांतिनिकेतन ’ आश्रमांत रूपांतर केलें. नवीन इंग्रजी शिक्षण कृत्रिम आहे, मानवी हृदयाची कळी पूर्णपणें विकास पावण्यास त्यांत अवसर नाहीं असें रवीन्द्रनाथांचें मत होतें. सृष्टीमध्यें परमेश्वर भरून राहिला आहे, म्हणून लहानपणापासून सृष्टीशीं मनुष्याचें तादात्म्य झालें पाहिजे, तरच त्या ईश्वरी तत्त्वाचा साक्षात्कार त्याला होईल. म्हणून रवीन्द्रनाथांनीं आपल्या शाळेतील शिक्षणपद्धति व जीवनक्रम प्राचीन गुरुकुलाच्या पद्धतीवर आंखला. कलकत्त्यापासून २०० मैलांवर वोलपूर नजीक हा नमुनेदार शांत आश्रम आहे. या आश्रमांतूनच ‘विश्वभारती’ या विद्यापीठाची कल्पना रवीन्द्रांनीं काढली. विश्वभारतीचें विद्यापीठ येथें १९२१ सालीं स्थापलें गेलें. ( १ ) सत्याचा शोध, ( २ ) सर्व संस्कृतींत उत्तमोत्तम तत्त्वांचें एकीकरण आणि ( ३ ) विश्वबंधुत्व हें ‘ विश्वभारती ’ चें ध्येय ठेवण्यांत आलें. प्रस्तुत विद्यालयाची कल्पना

जगांतील मोठमोठ्या लोकांना पटली आहे. ‘ शांतिनिकेतन ’ व ‘ विश्वभारती ’ या आपल्या दोन संस्थांना द्रव्यसाह्य मिळविण्याकरितां रवीन्द्रांनीं पृथ्वीपर्यटन केलें, शेकडों व्याख्यानें दिलीं, आपल्या दोन संस्था नांवारूपाला आणिल्या. हेंच त्यांचें प्रधान जीवनकार्य होय.

वंगभंगाच्या चळवळींत रवीन्द्रनाथ स्फूर्तिदाते होते. जालियनवाला बागेच्या हृदयद्रावक प्रकारानंतर सरकारचा निषेध करण्याकरितां त्यांनीं आपली ‘ सर ’ ही पदवी परत केली.

एकदां अमेरिकेच्या बंदरांत उतरतांना रवीन्द्रनाथांना कुणी सामान्य अधिकाऱ्यांनीं अटकाव करून ‘ या देशांतल्या संचारांत तुमच्या उपजीविकेचें साधन काय आहे ? ’ असा अपमानास्पद प्रश्न टाकला. त्या अधिकाऱ्याला हा एक मामुली हिंदी माणूस आहे असें वाटलें ! पुढें लगेच त्याची चूक दुरुस्त करण्यांत आली; त्यानें व मोठ्या अधिकाऱ्यांनींहि रवीन्द्रांची माफी मागितली. पण आपल्या स्वतःच्या वैयक्तिक थोरवीला जगांत कितीहि मान असला तरी हिंदी मनुष्य म्हणून आपल्या देशबांधवांना कसें वागवितात हें रवीन्द्रांना कळलें, आणि अमेरिकेच्या भूमीला स्पर्शहि न करतां ते परत फिरले. याप्रसंगीं त्यांचा जाज्वल्य देशाभिमान व सामान्य हिंदी जनतेच्या जीवनांत स्वतःचें विसर्जन करण्याची वृत्ति दिसून आली. १९४१ सालीं मृत्युशय्येवर असतांना, रॅथबोन नांवाच्या एका इंग्रज बाईनें हिंदी लोकांबद्दल निरर्गल प्रलाप काढल्याचें त्यांनीं वाचलें ! मृत्यूची दाट छाया पडली असतांहि रॅथबोनच्या प्रलापांना एक बाणेदार उत्तर लिहून त्यांनीं प्रसिद्धीस दिलें. जपानी साम्राज्यशाही आक्रमणाविरुद्ध कडक इषारा देण्यास ते चुकले नाहींत. आपला देश, आपली संस्कृति, आपलें स्वातंत्र्य यांविषयीं रसरशीत श्रद्धा त्यांच्या जराजर्जर देहांत अखेरपर्यंत धगधगत होती.

देशभक्त, तत्त्वज्ञानी, विश्वबंधुत्वाचे पुरस्कर्ते आणि शिक्षणशास्त्रज्ञ

म्हणून तर रवीन्द्रनाथ जगद्विख्यात आहेतच; पण जगाच्या इतिहासांत त्यांना जें अढळपद मिळालें आहे तें त्यांच्या उच्च वाङ्मयामुळें. भक्तिगीतें, खंडकाव्यें, स्फुट कवनें, नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा, टीकालेख इ० विविध वाङ्मयाच्या क्षेत्रांत त्यांची लेखणी अत्यंत यशस्वी झाली आहे. व्हिक्टर ह्यूगो ह्या नामांकित फ्रेंच वाङ्मयसेवकाखेरीज रवीन्द्रनाथांइतका चतुरस्र लेखक जगांत क्वचितच झाला असेल, असें मोठमोठे टीकाकार म्हणतात. त्यांच्या वाङ्मयांत उच्च सौंदर्यप्रीति तर आढळतेच; पण ईश्वरी प्रेम आणि उदात्त तत्त्वें यांचा ओलावा त्यांत भरपूर असल्यामुळें तें लोकादरास पात्र झालें आहे.

"रवीन्द्रनाथांनीं आमच्या देशभक्तीला आंतरराष्ट्रीय वळण लाविलें आणि आपली कला, संगीत, व शब्दमोहिनी यांच्या सामर्थ्यानें तिला उन्नत केलें." असें पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'टागोर सुवर्ण ग्रंथांत' म्हटलें आहे; तें अयथार्थ आहे असें कोण म्हणेल? विश्वाचें प्रेम रवीन्द्रनाथांच्या हृदयांत ओसंडत असलें तरी पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या आपल्या प्रिय हिंदभूचा विसर यांना कधींच पडला नाहीं. रवीन्द्रनाथ म्हणतात—

**"जेथें चित्त निर्भय आहे आणि शिर उन्नत आहे,**
**जेथें ज्ञान स्वतंत्र आहे,**
**जेथें संकुचित अशा भिंतींनीं जगाचे शेकडों तुकडे पाडलेले नाहींत,**
**जेथें शब्दाचा उगम सत्यापासून होतो,**
**जेथें श्रमाला पूर्णतेचें फळ येतें,**
**जेथें ज्ञानाचा शुद्ध निर्झर रूढीच्या रुक्ष वाळवंटांत लुप्त झाला नाहीं,**
**जेथें विचार आणि कार्य यांच्यांत विस्तृत विहार करण्यास मनाला वाव आहे,**
**त्या स्वातंत्र्याच्या स्वर्गांत, हे परमात्मन्, माझा देश जागृत होवो."**

****

# जगदीशचंद्र बोस : ४

" जगांत जागोजाग आढळणारीं निसर्गाचीं ज्ञानभांडारें मीं पाहिलीं, त्यावेळीं मला निराळीच दृष्टि प्राप्त झाली. सृष्टीवरील प्राण्यांचे समुदाय,



प्रकाशाचीं आंदोलनें, अंतराळांत तरंगणारे लाखो ग्रहतारे इ. चें सूक्ष्म अवलोकन करूं लागतांच, तीन हजार वर्षांपूर्वीं माझ्या आर्यपूर्वजनांनीं प्रथम उच्चारिलेला ' एकत्वा ' चा संदेश माझ्या मनाला पटला. या अनंत सृष्टीच्या अखंड बदलत असलेल्या स्वरूपांत व घडामोडींत जे ' एकत्त्व ' पाहूं शकतात त्यांनाच सर्वश्रेष्ठ सत्याचा साक्षात्कार होतो. इतरांना नाहीं." १० मे १९०२ या दिवशीं रॉयल इन्स्टिटयूटपुढें व्याख्यान देत असतां डॉ. सर जगदीशचंद्र यांनीं हे उद्गार काढले. हे उद्गार त्यांच्या ध्येयाची ओळख करून देतील. जगदीशचंद्रांच्या शास्त्रीय संशोधनाचा हेतु निव्वळ व्यापाराची भरभराट अथवा सुखसोयींची वाढ व्हावी असा नाहीं. ते एका अंतिम सत्याचा शोध घेत आपलें संशोधन करीत होते. त्यांना तत्त्वज्ञानी शास्त्रज्ञ म्हणतात तें यामुळेंच.

जगदीशबाबूंचा जन्म बंगालमध्यें विक्रमपूर गांवीं सन १८५० मध्यें झाला. त्यांचे वडील सब्डिव्हिजनल ऑफिसर होते. गांवांत इंग्रजी शाळा असून जगदीशचंद्राला एका बंगाली पाठशाळेंत घालण्यांत आलें. येथें प्रथम जुन्या पद्धतीनेंच त्यांना शिक्षण मिळालें. नंतर ते इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. हायस्कुलांतील इंग्रजी शिक्षण संपवून त्यांनीं कलकत्ता येथील सेंट झेवियर कॉलेजमध्यें प्रवेश केला आणि त्यांतून त्यांनीं बी. ए. ची पदवी संपादन केली.

जगदीशबाबूंचे वडील अत्यंत हौशी होते. मुलगा हुशार आहे तेव्हां त्यानें खूप शिकून विद्वान् व्हावें असें त्यांना वाटे आणि आपल्या संसारांत काटकसर करूनहि ते मुलाच्या विद्याभ्यासास मदत करीत. इतकी ओढगस्त असतांना देखील जगदीशचंद्रांना विलायतेस वैद्यकीचें शिक्षण घेण्याकरितां पाठविण्यांत आलें. परंतु तेथें गेल्यावर वैद्यकीचा अभ्यास आपणाला झेपेल असें जगदीशचंद्रांना वाटेना. कारण त्यांची तब्येत फार नाजुक असल्यानें औषधांचा दर्प व डोळ्यांसमोर दररोज शस्त्रक्रियेचे प्रयोग यांचा त्यांना त्रास होई. तेव्हां तो मार्ग सोडून ते केंब्रिजला गेले. १८७१ त त्यांना निसर्गशास्त्राची शिष्यवृत्ति मिळाली. केंब्रिज आणि लंडन येथील विद्यालयांच्या पदव्या त्यांनीं लवकर संपादन केल्या आणि ते हिंदुस्थानकडे परत फिरले.

परदेशी पदव्या संपादन करून त्यांनीं कलकत्त्यांत पाऊल ठेविलें, त्यावेळीं त्यांचें वय अवघें २५ वर्षांचें होतें. इंग्लंडांतल्या एकदोघां गृहस्थांनीं तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांचेकडे शिफारस करून जगदीशबाबूंसारख्या हुषार तरुणास मोठ्या पगाराची जागा देण्याची विनंति केली. त्यांत प्रथम थोडे अडथळे आले; पण अखेर कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें प्रोफेसरचे जागीं सरकारनें त्यांची नेमणूक केली. यावेळची एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, प्रे० कॉलेजचे प्रिन्सिपॉल रॅने यांनीं जगदीशबाबूंच्या नेमणुकीविरुद्ध मोठा गहजब केला. 'हिंदी लोकांना भौतिकशास्त्राचें पद्धतशीर शिक्षण घेण्याचें ज्ञान नसतें. त्यामुळें त्यांना या शास्त्राचे अध्यापक नेमणें योग्य नाहीं' असें प्रिन्सिपॉल मजकुरांनीं वरिष्ठ सरकारास कळविलें. पण आपण नालायक म्हणून गणलेल्या हिंदी लोकांपैकींच हा प्रतिभाशाली तरुण जगांतील अलौकिक शास्त्रज्ञांच्या पंक्तींत जाऊन बसणार आहे हें त्या बिचाऱ्या प्रिन्सिपॉलला काय ठाऊक ?

प्रोफेसरची जागा मिळाल्यापासून अध्यापन आणि संशोधन

त्यांत जगदीशबाबू निमग्न झाले. १८९६ सालीं त्यांनीं आपला एक संशोधनात्मक निबंध लंडनला पाठविला. तो रॉयल सोसायटीनें आपल्या मासिकांत प्रसिद्ध केला. रॉयल सोसायटी ही एक जगद्विख्यात शास्त्रीय संस्था असून तिच्या मासिकांत एखाद्या शोधकाचा निबंध प्रसिद्ध होणें हा त्याचा मोठाच बहुमान समजला जातो. जगदीशबाबूंच्या निबंधावर लॉर्ड केल्व्हिन, कोर्न्यूप्रभृति प्रसिद्ध इंग्लिश व फ्रेंच शास्त्रज्ञ प्रसन्न झाले व त्यांनीं गौरवपर पत्रें जगदीशबाबूंना पाठविलीं. ' या गौरवामुळें मला पुढें संशोधन करण्यास व आपल्या देशाचें नांव उजळण्यास संधि मिळाली ' असें जगदीशचंद्र म्हणतात.

जगदीशबाबूंचे पहिले शोध विजेसंबंधींचे होते. बिनतारी तारायंत्राचें श्रेय मार्कोनीकडे जात असलें तरी जगदीशचंद्रांनीं हिंदुस्थानांत मार्कोनीच्या आधीं स्वतंत्र रीतीनें बिनतारी तारायंत्राचा प्रयोग यशस्वी करून दाखविला, ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. जड पदार्थांतून विजेचे प्रवाह सोडणें, प्रकाशाचे साह्यावांचून एका काळ्या पेटींतील वस्तूचें छायाचित्रण घेणें असे कितीतरी चमत्कार त्यांनीं करून दाखविले. ' परमाणूंचा दाब ' हा त्यांचा नंतरचा महत्त्वाचा शोध होय. या शोधानें पाश्चात्य राष्ट्रांतले विद्वान् त्यांना विशेषच ओळखूं लागले. रॉयल सोसायटीचे अध्यक्ष लॉर्ड लीस्टर यांनीं स्टेट सेक्रेटरीकडे एक विनंतिपत्र पाठविलें आणि जगदीशचंद्रांसारख्या प्रतिभाशाली संशोधकास योग्य वाव देण्याकरितां कलकत्त्यास एक संशोधक विद्यालय सरकारनें स्थापावें अशी सूचना केली.

तथापि विज्ञानसृष्टींत क्रांति करणारा जगदीशचंद्रांचा शोध म्हणजे वनस्पतींच्या व्यापारासंबंधींचा होय. बाह्यतः निर्जीव दिसणाऱ्या वस्तूंनाहि जीव असतो, इतकेंच काय पण त्यांना विकारहि असूं शकतात, असा सिद्धांत जगदीशबाबूंनीं प्रस्थापित केला आहे. अत्यंत सूक्ष्म व अभिनव यंत्रांच्या साह्यानें त्यांनीं वृक्षलतांचा जीवनव्यापार व हर्षशोकादि विकार

दाखवून दिले आहेत. आयुर्वेद आणि शेतकी या शास्त्रांत तर जगदीश-बाबूंचा शोध मोठी उलटापालट करीलच; पण " सर्वांभूतीं आत्मा " पाहणाऱ्या प्राचीन आर्यतत्त्वज्ञानाला या शोधानें मोठीच वळकटी येणार आहे. आपल्या संशोधनांत निव्वळ भौतिक दृष्टीपेक्षां अधिक उच्च असा जो हेतु जगदीशचंद्रांनीं बाळगल्याचें वर सांगितलें, त्याचें रहस्य तरी हेंच होय.

या शोधामुळें जगदीशचंद्र ही शास्त्रीय युगांतील एक महान् शक्ति ठरतील. लॉर्ड ब्रंटन, प्रो. कॉवेंथरीड इ० विद्वानांनीं जगदीशबाबूंच्या शोधावर भाष्यें लिहिलीं. हिंदुस्थान सरकारनें ' सर ' ही बहुमानाची पदवी देऊन जगदीशबाबूंचा सन्मान केला. जगदीशबाबूंनीं जगभर व्याख्यानांचा दौरा काढून आपला सिद्धांत ठिकठिकाणीं विशद केला.

शोधाइतकेंच चिरस्थायि स्वरूपाचें जगदीशचंद्रांचें कार्य म्हणजे ' बोस इन्स्टिटयूट ' हें होय. प्राचीनकाळीं नालंद, तक्षशिला इ० महाविद्यालयें हिंदुस्थानांत होतीं आणि देशोदेशींचे विद्यार्थी येथें येऊन ज्ञानसंपादन करीत; त्याच धर्तीवर ज्ञानसंतर्पण करणारीं विद्यालयें नवीन हिंदुस्थानांत निघालीं पाहिजेत. याच हेतूनें जगदीशबाबूंनीं आपलें इन्स्टिटयूट ( विज्ञानमंदिर ) १९१६ त स्थापन केलें. तेव्हांपासून १९३७ मध्यें स्वर्गस्थ होईपर्यंत जगदीशबाबूंनीं या विज्ञानमंदिराला चिरस्थायी करण्यासाठीं अविरत यत्न केले. ठिकठिकाणीं हिंडून त्यांनीं फंड गोळा केला आणि विज्ञानमंदिराला चांगलें स्वरूप आणिलें. आपलें ध्येय सांगतांना सर जगदीशचंद्र म्हणाले, " या विद्यामंदिरांत सत्य-शोधनासाठीं निःस्वार्थी व बुद्धिमान विद्यार्थी येतील. संन्यस्त राहून ते सत्याचा शोध करतील. धर्म आणि विज्ञान यांचा झगडा पाश्चात्यांप्रमाणें येथें राहणार नाहीं. साऱ्या संशोधनाचें ध्येय अंतिम सत्याचा शोध लावणें हेंच राहील." जगदीशबाबूंची ही भविष्यवाणी खरी ठरो हीच कोणीहि झालें तरी प्रार्थना करणार !

****

अनुक्रम
विभाग
क्रमांक

# चंद्रशेखर व्यंकटरामन्

ता. १५ नोव्हेंबर १९३० हा दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांत फार महत्त्वाचा गणला जाईल. कारण त्या दिवशीं विज्ञानशास्त्रांतलें जगप्रसिद्ध नोबेल प्राइझ सर चंद्रशेखर व्यंकटरामन् यांना मिळाल्याची सुवार्ता प्रसिद्ध झाली. पूर्वेकडील लोक आध्यात्म-वादी, त्यांनीं ध्येयाच्या तंद्रींतच गुंगावें, भौतिकशास्त्रांत त्यांची गति वेताबाताचीच होणार अशा तऱ्हेचे प्रलाप ज्यांनीं आजवर काढले त्यांना रामन् यांचें भौतिकशास्त्रांतलें हें अद्वितीय यश पाहून खात्रीनें लज्जा उत्पन्न झाली असेल. हिंदी लोकांनीं अतींद्रिय व अव्यक्त गोष्टींचा साक्षात्कार करून घेण्याचे कामीं आघाडी मारली आहे. परंतु जर व्यक्त सृष्टीच्या व्यापारांचें रहस्य उकलावयाचें असेल तर त्याहि बाबतींत त्यांची प्रतिभा माघार घेणार नाहीं हें सिद्ध झालें.



सर चंद्रशेखर आज ७० वर्षांचे आहेत. तथापि त्यांची बुद्धि व उत्साहशक्ति इतकी दांडगी आहे आणि दीर्घोद्योगाची त्यांची आवड इतकी विलक्षण आहे कीं, अद्यापि एकादें तप किंबहुना जास्तच काल त्यांची प्रतिभा काम करूं शकेल आणि कदाचित् विज्ञानशास्त्राचें नोबेल प्राइझ पुनः एकवार सुएझच्या पूर्वेकडे येईल.

रामन् यांचा जन्म १८८८ सालीं झाला. हे मूळचे मद्रासचे रहिवासी. फायनान्स-खात्यांतील परीक्षा पास झाल्यानंतर अल्पवयांतच वड्या पगाराच्या सरकारी नोकरीवर त्यांची नेमणूक झाली. सरकारी नोकरींतलें काम दक्षतेनें करून फावल्या वेळांत प्रयोगशाळेंत आपल्या

आवडत्या विज्ञानशास्त्रासंबंधींचे प्रयोग करीत बसावें असा रामन्‌चा क्रम असे. कलकत्ता येथें डॉ. महेंद्रलाल सरकार यांनीं शास्त्रीय विषयांतल्या संशोधनाला मदत व्हावी म्हणून ज्ञानसंवर्धिनी सभा स्थापन केली होती. सुप्रसिद्ध सर आशुतोष मुकर्जी हेहि या संस्थेच्या चालकांपैकीं होते. हिंदी विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्रांत संशोधन करण्याची गोडी लागावी हा या संस्थेचा मुख्य हेतु होता. परंतु विद्यार्थ्यांत या कामाबद्दल विशेष उत्साह दिसेना. म्हणून संस्था मंदतेज झाली. १९०८ मध्यें सर चंद्रशेखर कलकत्त्यास आले आणि त्यांनीं या संस्थेंत राहून प्रयोगांना सुरुवात केली. सरकारी कचेरीचें काम संभाळून सकाळीं, दुपारीं, रात्रीं ते प्रयोगशाळेंतच असत. त्यांनीं संशोधन करून पुष्कळ निबंध लिहिले आणि ते जगांत चोहींकडे प्रसिद्धि पावून या लहानशा संस्थेकडे जगाचें लक्ष वेधलें.

विज्ञानशास्त्रांतलें आपलें वाढतें प्रयोगकार्य आणि सरकारी नोकरी हे दोनहि बाजूंचे तोल संभाळतां येतील असें रामन्‌ना वाटलें नाहीं. अखेर पैशांची लयलूट करून देणारी सरकारी नोकरी सोडून १९२७ सालीं ते कलकत्ता युनिव्हर्सिटींत अल्पवेतनावर अध्यापक म्हणून राहिले; धनसंचयाचा हव्यास सोडून आपलें ज्ञानमय कर्तव्य त्यांनीं आरंभिलें आणि नंतरच्या १६–१७ वर्षांचे अवधींत ते आपल्या अविश्रांत उद्योगानें व प्रतिभातेजानें जगांत महत्पदाला चढले.

रामन् यांच्या शोधांचें वर्णन करावयाचें झाल्यास एक मोठा ग्रंथच होईल. ‘आंदोलनशास्त्रां’तल्या त्यांच्या शोधांनीं प्रथम जगाचें लक्ष त्यांच्याकडें वेधलें. त्यांनीं हिंदी तंतुवाद्यांची शास्त्रशुद्धता प्रकाशलेखांच्या साह्यानें सिद्ध केली. मृदंगाला निरनिराळीं कातडीं लावून व पिठाचीं पुटें चढवून त्यांतून वेगवेगळीं सप्तकें कशीं काढतां येतात हें त्यांनीं दाखविलें. लय आणि प्रमाणबद्धता हें हिंदी वाद्यांचें वैशिष्ट्य त्यांनीं पाश्चात्यांना सप्रमाण पटवून दिलें.

तथापि ज्या योगें विज्ञानशास्त्रांत त्यांचें नांव अजरामर झालें आहे, तो शोध 'रामन् इफेक्ट' हा होय. एकाद्या शास्त्रज्ञाचें नांव त्याच्या शोधाला मिळणें हा जगांतील सर्वोच्च बहुमान होय. त्याचें मोल कशानेंहि होणें शक्य नाहीं. परावर्तित प्रकाशांत कांहीं नवीन लहरी निर्माण होतात. या लहरी कोठून येतात हें आजपर्यंत गूढ होतें. रामन्‌नीं तें सिद्ध केल्यापासून शास्त्रीय जगांत मोठी खळबळ उडाली. या शोधानें कित्येक मूल्यवान् वस्तूंच्या घटकांची रचना कळणें शक्य झालें आहे. या शोधानें रामन् यांचाच नव्हे तर अखिल भारतवर्षाचा बहुमान झाला आहे.

ऐहिकदृष्ट्या रामन् यांच्या श्रमांचें पूर्णपणें चीज झालें आहे. १९२५ सालीं लंडन येथील रॉयल सोसायटीनें रामनूना आपले सदस्य निवडले. हा मान फारच थोड्या शास्त्रज्ञांना मिळतो. १९२९ सालीं बादशहांनीं त्यांना 'सर' हा किताब दिला. १९३० सालीं ह्यूजेस पदक देऊन रॉयल सोसायटीनें त्यांचा गौरव केला. त्याच वर्षी त्यांना नोबेल प्राईझ मिळून सर्व गौरवांवर कळस चढला. जगांतील अनेक विद्यापीठांनीं सन्माननीय पदव्यांचीं पुष्पें रामन् यांच्यावर उधळलीं. पुढें सर चंद्रशेखर बंगलोर येथील सायन्स इस्टिट्यूटच्या मुख्य सूत्रचालकाच्या पदावर अधिष्ठित झाले. नंतर ती जागा त्यांनीं सोडून दिली व साधे प्राध्यापक म्हणून ते आतां काम करीत आहेत. 'हिरा' हा या विज्ञान पंडिताचा संशोधनाचा आतां विषय असून त्यांतील त्यांचे शोध क्रांतिकारक ठरणार आहेत.

अलौकिक कीर्ति संपादन करूनहि रामन् यांचा साधेपणा व सौजन्य अढळ आहे. त्यांचा वर्ण काळासावळा, चेहरा अत्यंत तजेलदार व अंगकाठी मजबूत दिसते. भौतिकशास्त्रासारख्या अत्यंत अवघड व रूक्ष विषयांत रमणारी त्यांची बुद्धि विनोदपराङ्मुख असेल असें कोणास वाटेल; पण तसें मुळींच नाहीं. खाजगी संभाषणांत व जाहीर व्याख्या-

नांत त्यांचें भाषण अत्यंत आकर्षक व विनोदपूर्ण असतें. आवाजाला उंची भरपूर असल्यानें बऱ्याच मोठ्या सभेंत देखील यांचें भाषण स्पष्टपणें ऐकूं येतें. त्यांचा पोषाख अत्यंत साधा, कित्येकदां तर मद्रासी पद्धतीचें धोतर, सदरा व उपरणें एवढाच असतो. प्रयोगशाळेंत आपल्या कार्यांत तन्मय असतां क्षुधातृषांचा देखील त्यांना विसर पडतो. ते इतके निगर्वी आहेत कीं, एकाद्या लहान मुलानें देखील त्यांना वाटेल त्या शंका विचाराव्या; ते मोकळ्या मनानें उत्तर देतील. रामन् यांचा शिष्यपरिवार फार मोठा आहे व त्यांत प्रखर बुद्धीचे लोकहि बरेच आहेत. रामन् यांनीं आपल्या दिव्य प्रतिभेनें हिंदुस्थानांत भौतिक शास्त्राच्या अध्ययनाला मोठेंच चैतन्य दिलें आहे हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं.

****

## सुभाषचंद्र : ६



कार्तिकेयाच्या गर्भाची गोष्ट अशी सांगतात कीं तो ज्या ज्या ठिकाणीं ठेवला तेथें तेथें त्याच्या असह्य तेजानें ज्वाला उत्पन्न होऊं लागल्या. नगाधिराज हिमालयाच्या अत्यंत शीतल प्रदेशांत तो टाकला तरी तेथेंहि दाहकता निर्माण होऊं लागली ! देवांच्या सेनापतीविषयीं ही जी अद्‌भुत कथा आपण ऐकतों तीच आपल्या नेताजी सुभाषचंद्रांची हकीकत आहे. ते जिथें जिथें गेले त्या त्या ठायीं ते आपल्या ज्वलंत देशभक्तीनें भोवतालचें वातावरण प्रज्ज्वलित करीत व प्रतिस्पर्ध्यांना असह्य होतच राहिले ! २३ जानेवारी १९५२ रोजीं नेताजींना ५७ वें

वर्षं लागलें. ह्या अर्धशतकांतला बाळपणचा कांहीं काळ वगळला तर उरलेलें त्यांचें वीरजीवन म्हणजे त्याग, विरोध, झुंज, संघटना अशा खळबळींनीं भरलेलें आहे.

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म मोठ्या संपन्न व इभ्रतदार घराण्यांत झाला. त्यांचे वडील जानकीनाथ हे आपल्या व्यवसायांत नाणावलेले गृहस्थ होते. आपल्या आठ पुत्रांचें संगोपन व शिक्षण जानकीनाथांनीं मोठ्या आस्थेनें केलें. नेताजींचें नांव आज जगविख्यात झालेलें असलें तरी त्यांचे इतर बंधूहि चांगले कर्तृत्ववान् आहेत. त्यांपैकीं हिंदुस्थानांत शरच्चंद्रांचें नांव कुणाला माहीत नाहीं असें नाहीं. लक्ष्मी व सरस्वती यांच्या अंकांवर सुभाषचंद्रांचें लालनपालन झालें आणि त्यांच्या नैसर्गिक प्रतिभातेजाला पूर्ण फुलायला वाव मिळाला.

गूढवादाकडे सुभाषबाबूंचा लहानपणापासून ओढा असे. विद्यार्थिदशेंत एकदां विरक्तीचा झटका येऊन ते घरांतून बाहेर पडले! हिमालय, मथुरावृंदावन इ. पवित्र ठिकाणीं सद्गुरूच्या शोधासाठीं ते हिंडले. पण त्यांना ज्या 'सद्गुरूं'चा सहवास लाभला, ते गुरु दांभिक, ढोंगी निघाले! त्यामुळें सुभाषचंद्र ताळ्यावर आले आणि परत स्वगृहीं येऊन पुनः अध्ययनाचा मार्ग त्यांनीं चोखाळला! पुढें कॉलेजांत कोणा परदेशी प्राध्यापकानें हिंदुस्थानबद्दल अनुदारपणाचे उद्गार काढले तेव्हां तेजस्वी सुभाषनीं त्याच्या तोंडांत दिली! सुभाषना या औद्धत्याबद्दल कॉलेजमधून काढून टाकण्यांत आलें! पुनः शिक्षणक्रम खंडित झाला. अशा कुशाग्र बुद्धीच्या विद्यार्थ्याचें जन्माचें नुकसान होऊं नये म्हणून सर आशुतोष मुकर्जी ( कै. डॉ. शामाप्रसाद यांचे पिताजी ) यांनीं आपलें वजन खर्चून सुभाषना परत कॉलेजांत प्रवेश मिळवून दिला. पुढें मात्र कुठलाहि व्यत्यय न येतां अभ्यासक्रमांत सुभाष यशस्वी होत गेले व विलायतेंतून आय्. सी. एस्. होऊन

स्वदेशीं येतांच उच्च अधिकाराची सरकारी नोकरी त्यांना मिळाली. यावेळीं ते ऐन पंचविशींत होते. आय्. सी. एस्. च्या परीक्षेंत तत्त्वज्ञान हा त्यांचा मुख्य विषय होता. त्या विषयांतील त्यांचें प्रावीण्य पाहून त्यांचे गुरुजन चकित होऊन गेले !

हिंदुस्थानांत गांधीजींनीं स्वातंत्र्यासाठीं सत्याग्रह करण्याची जी देशव्यापी चळवळ १९२० मध्यें सुरू केली, त्या सुमारासच विद्याविभूषित झालेले सुभाषचंद्र आपल्या जीवनाला आरंभ करीत होते. सरकारी उच्च पदाचा मान त्यांना लायकीप्रमाणेंच मिळाला असल्यामुळें गजान्त लक्ष्मीचें वैभव त्यांच्यापुढें चालून येणार होतें. लॉर्ड सिंह यांच्याप्रमाणें बंगालचे गव्हर्नरहि ते झाले असते किंवा त्याहूनहि कांहीं थोर ऐश्वर्याच्या जागा त्यांना मिळणें अगदीं शक्य होतें. परंतु समोर भौतिक सुखाचें ताट वाढून ठेविलें असतां तें दूर सारून आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं कांट्याकुट्यांचा खडतर मार्ग पत्करला ! हेंच सुभाषचंद्रांचें महानुभावित्व होय. ते आपल्या देशाचे कंठमणि होऊन राहिले ते याच कारणानें.

म. गांधींच्या स्फूर्तीनें देशबंधु दास यांनीं देशासाठीं फकिरी पत्करली. सुभाषचंद्र हे दासांचे पट्टशिष्य. तेहि आपल्या उदारधी गुरूंप्रमाणें स्वातंत्र्यसंग्रामांत पडले. दासांच्या अकाल मृत्यूनें बंगालचें नेतृत्व सुभाषचंद्रांकडे आलें. देशबंधूंप्रमाणेंच कलकत्त्याचे नगराध्यक्ष, बंगाल प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष, आणि बंगाल प्रांतिक कायदेमंडळांतले विरोधी लोकनेते असा तिहेरी मुकुट सुभाषचंद्रांचे शिरावर झळकूं लागला. पण हा मुकुट कांट्यांचा होता. या मुकुटाबरोबर शिर गमावण्याची पाळी येणें शक्य होतें ! पण सुभाषचंद्रांनीं सनदशीर व क्रांतिकारक अशा दोनहि आघाड्यांवर प्रचंड संघटना चालविली. सरकारला हें प्रस्थ डोईजड होऊं लागलें आणि या महापुरुषाचा कांटा कायमचा कसा काढतां येईल याचा सरकार विचार करूं लागलें.

यावेळीं देशांत तरुण वर्ग जागृत होत होता. ठिकठिकाणीं युवक-संघ स्थापन होऊं लागले होते. पं. जवाहरलाल नेहरू या नव्या युगाचे प्रणेते होते. सुभाषचंद्रहि यांत अग्रभागीं आले आणि देशांतल्या जागृत तरुणांची संघटना मोठ्या उत्साहानें त्यांनीं आरंभिली. युवक व मजूरवर्ग यांचें भक्कम पाठबळ काँग्रेसच्या मागें उभें करून काँग्रेसच्या नेतृत्वांत येणारें शैथिल्य व सनदशीरपण नष्ट करायचें हा सुभाषचंद्र यांचा मुख्य जीवितहेतु होता. १९२८ सालीं कलकत्ता काँग्रेस भरली. पं. मोतीलाल अध्यक्ष होते. चांदीच्या रथांतून त्यांची भव्य मिरवणूक निघालेली व स्वयंसेवकांचे नेते म्हणून सुभाषचंद्रांची भव्य मूर्ति अश्वारूढ होऊन पुढें चाललेली ! जुनें व नवें तेज एकत्र झालेलें पाहण्याचा तो सोहळा दृष्ट लागण्यासारखा लोकांना वाटला. पण याच काँग्रेसमध्यें सुभाषचंद्रांनीं जुन्या पुढाऱ्यांना कसून विरोध केला. आणि दुसऱ्या वर्षी लाहोरच्या काँग्रेसमध्यें तर 'प्रति—सरकार' स्थापण्याची भाषा काढून खळबळ उडवून दिली. पूर्ण स्वातंत्र्याहून कमी अशी कोठलीहि मागणी काँग्रेसनें करतां कामां नये असा सुभाषचंद्रांचा आग्रह होता.

पुढें कायदेभंगाची चळवळ सुरू झाली आणि ती संधि साधून सुभाषचंद्रांवर सरकारनें शस्त्र धरलें. अनेकदां सुभाषचंद्रांना तुरुंगवास घडला. प्रकृति खंगून गेली. क्षयानें शरिरांत ठाणें दिलें. पण अशा स्थितींतहि, 'तुरुंगांत मरण पत्करीन पण अटी लादून घेऊन मुक्त होणार नाहीं.' असें बाणेदार उत्तर सुभाषचंद्रांनीं दिलें. नंतर सरकारनें त्यांची मुक्तता केली व अस्थिपंजर झालेले सुभाषचंद्र युरोपांत प्रकृतिस्वास्थ्यासाठीं निघून गेले.

युरोपांतील वास्तव्यांतहि आपल्या देहाची निगा राखणें एवढाच सुभाषचंद्रांचा उद्योग नव्हता. आपल्या स्वातंत्र्योन्मुख मायदेशाची त्यांना अहर्निश आठवण होती. युरोपीय राजकारणाचे पोटीं चाललेलीं

वादळें ते सूक्ष्म दृष्टीनें न्याहाळीत होते. आराम पडल्यानंतर ते स्वदेशीं परतले. या पहिल्या श्रेणीच्या देशभक्तासाठीं देशांतील सर्वोच्च बहुमान वाटच पहात होता. १९३८ सालीं हरिपुरा येथें राष्ट्रसभेचें अधिवेशन होतें. या अधिवेशनाचे अध्यक्षपदावर सुभाषचंद्रांची निवड झाली. ७-८ प्रांतांत कॉंग्रेस मंत्रिमंडळें स्थापन झालीं असल्यामुळें वातावरणांत भरपूर उत्साह होता. या लोकप्रिय राष्ट्रपतीचा देशभर प्रचंड प्रमाणावर सत्कार झाला.

पण संघर्षाचा काळ संपला तर सुभाषचंद्रांचें वैशिष्ट्य तें काय? पुढील वर्षीं त्रिपुरी येथें राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरणार होतें. राष्ट्रीय सभेचे प्रतिष्ठित नेते ‘नको, नको!’ म्हणत असतां सुभाषचंद्रांनीं अध्यक्षीय निवडणूक लढविण्याचें ठरविलें. आणि त्यांनीं निवडणूक मोठ्या शर्तीनें जिंकली! डाव्या गटांनीं त्यांना पाठिंबा दिला. पण सुभाषचंद्रांचें हें साहस न आवडल्यामुळें जुन्या कॉंग्रेस नेत्यांनीं सुभाषचंद्रांशीं असहकार पुकारला! या नेत्यांचें वजन एवढें होतें कीं त्यांच्या सहकार्याखेरीज कॉंग्रेसचा ‘जगन्नाथाचा रथ’ पुढें ओढणें सुभाषचंद्रांना शक्य नव्हतें! सुभाषचंद्रांनीं नाइलाजानें राजिनामा दिला! ते पुन: एकाकी पडले! या सुमारासच युरोपांत युद्धाचा वणवा पेटून तो जग व्यापणार असें स्पष्ट दिसूं लागलें होतें.

१९४१ चे अखेर जपान युद्धांत पडलें! या दरम्यान स्थानबद्धतेंतून सुभाषचंद्र निसटून गेल्याचें आश्चर्यकारक वृत्त प्रसिद्ध झालें!! सुभाषचंद्रांच्या साहसाचा अनुभव जगाला नवा नव्हता. पण हें साहस कांहीं विलक्षणच होतें! आतां जो वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे त्यावरून पेशावर-काबूल मार्गें सुभाषचंद्र युरोपच्या मार्गाला लागले असें स्पष्ट होतें. सर्व जग युद्धाच्या हादऱ्यानें कांपत आहे, आपल्या देशावरील परकी सत्ता अनेक युद्ध-आघाड्यांवर गुंतली आहे, अशा वेळीं त्या सत्तेच्या शत्रूंशीं संधान बांधून आपला देश पारतंत्र्यांतून मुक्त करायचा

अद्भुत डाव सुभाषचंद्रांनीं रचिला ! या मार्गाबद्दल राष्ट्रवादी नेत्यांचे व सुभाषचे तीव्र मतभेद होते. पण सुभाषचंद्रांची कल्पकता, देशभक्ति व शौर्य कुणींच नाकारलें नाहीं.

आपल्या कार्याला युरोपांत अनुकूल क्षेत्र मिळेलसें दिसेना तेव्हां सुभाषचंद्र पूर्व आशियाकडे वळले. त्यांच्या प्रतिभेचा संपूर्ण विकास येथेंच व्हावयाचा होता. सिंगापूर पडल्यानंतर ५०-६० हजार हिंदी सैनिक उघडे पडले. जपानचे युद्धकैदी व्हावें किंवा उपासमारीनें देहत्याग करावा याखेरीज त्यांना गत्यंतर उरलें नव्हतें. सुभाषचंद्रांनीं यांचीच 'आझाद हिंद सेना' बनविली. पूर्व आशियांतील हिंदी लोकांना नवी स्फूर्ति देऊन उदंड द्रव्य जमविलें. 'मला तुमचें रक्त द्या. तुम्हांला मी स्वातंत्र्य देतों.' हा मंत्र उच्चारून सर्वांचीं अंतःकरणें त्यांनीं भारून टाकलीं. 'चलो दिल्ली' हा रणघोष करीत हें सैन्य हिंदुस्थान स्वतंत्र करायला दिल्लीकडे निघालें. या सैन्यांत हिंदु, मुसलमान हा भेद नव्हता. स्त्रिया पुरुषांप्रमाणें जबाबदारीचीं कामें उचलीत होत्या ! मरेपर्यंत न वांकण्याचा सर्वांचा निर्धार होता.

पुढें जपानचा पराभव झाला आणि युद्धाचें सर्व गाडें फिरडें ! ! तथापि सुभाषचंद्रांनीं निर्मिलेलें हें 'आझाद हिंद सेने' चें पर्व वाया गेलेलें नाहीं. राजकीय जागृतीचें लोण सैन्यापर्यंत पोंचायला फार काळ लागतो. पण तेथपर्यंत तें पोंचले म्हणजे मग प्रस्थापित सत्ता कोलमडून क्रांति होण्यास वेळ लागत नाहीं. सुभाषचंद्रांनीं हेंच ओळखून 'आझाद-हिंद-सैन्या' चा अपूर्व डाव टाकिला. सुभाषचंद्रांच्या या राजनैतिक कौशल्यामुळें हिंदी स्वातंत्र्य अनेक वर्षें जवळ आलें. सुभाषचंद्रांनीं परराष्ट्राची मदत घेतली. पण परराष्ट्राचे मिंधे ते कधींच नव्हते. एकदां एका जाहीर सभेंत जपानचे मुख्य प्रधान टोजो म्हणाले कीं, "स्वतंत्र भारताचे अध्यक्ष नेताजी सुभाषचंद्र हे होतील." त्याबरोबर नेताजी त्याच क्षणीं उठून म्हणाले, "मी हिंदुस्थानचा सेवक आहें.

स्वतंत्र हिंदुस्थानचा अध्यक्ष कोण होईल हें हिंदी जनता ठरवील. टोजोंनीं तें ठरविण्याची तसदी घेऊं नये." या उत्तरांत सुभाषचंद्रांचा बाणेदारपणा जसा व्यक्त होतो तसेंच त्यांचें लोकसत्ताप्रेमहि दिसून येतें. हिंदी राजकारण जेणेंकरून क्रांतिप्रवण राहील असा सतत अविश्रांत प्रयत्न करून त्यापायीं हवे ते कष्ट, आली ती अप्रियता ज्यांनीं सोसली, अशा शूर पुरोगामी नेत्यांमध्यें सुभाषचंद्रांना नेहमीं अग्रभागीं स्थान मिळेल. १८ ऑगस्ट १९४५ रोजीं अपघातांत सुभाषचंद्र स्वर्गस्थ झाल्याची शोकवार्ता आली, यावेळीं हिंदुस्थानांतलें प्रत्येक घर शोकमग्न झालें. बाबूजींच्या अपार लोकप्रियतेचा प्रत्यय त्या वेळीं आला! (ते जिवंत आहेत असें वृत्त पुनः पुनः प्रसिद्ध झालें होतें. देव करो आणि तें खरें ठरो.)

व्यक्तिशः सुभाषचंद्र केवळ सौजन्यमूर्ति होते. ज्वलज्जहाल म्हणून गाजलेल्या या तुफानी नेत्याचें खाजगी संभाषण मृदु असे. अहंकाराचा भपकारा त्याला कधींहि येत नसे. त्यांच्या मनाचा कल पूर्णपणें अध्यात्मवादी होता. मागें महाराष्ट्रांत ते आले असतां सिंहगडास गेले होते. गड चढून गेल्यावर एका शिलातलावर ते बुद्धाप्रमाणें स्वस्थ बसले. भोंवतालचें सृष्टिसौंदर्य पाहिल्यावर प्रसन्नतेमुळें त्यांची जवळ जवळ समाधि लागली. प्रसन्नता हा त्यांच्या चेहऱ्यावरील स्थायी भाव असे. त्यांची शरीरयष्टि भव्य होती आणि ते चालूं लागले म्हणजे '**नमवी पहा भूमि हा चालतांना**' असा दिव्य भास होई. चेहरा अत्यंत कांतिमान दिसे. एका अद्वितीय शक्तीच्या सहवासांत आपण आहों असें त्यांच्या सहवासांत असतांना प्रत्येकाला वाटे. मित्र, आप्त, अनुयायी यांचें सुख पाहण्यांत व त्यांचेसाठीं झटण्यांत सुभाषबाबूंना परम संतोष वाटे. वैयक्तिक स्वार्थ व सुख यांना त्यांनीं पूर्ण संक्षेप दिला होता. १९३१ सालीं युवकसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून आले असतां 'आनंदा' च्या संपादकांच्या विनंतीवरून 'आनंदा' च्या बालवाचकांना

त्यांनीं संदेश दिला होता. "...**कष्ट आणि सेवा यांतच खरा आनंद आहे. जे दुसऱ्यासाठीं झटतात त्यांनाच खऱ्या आनंदाचा आस्वाद घेतां येतो.** "

****

# लोकमान्य टिळक : ७

"ज्यूरीनें सांगितलेला निकाल कांहींहि असो, मी निर्दोषी आहें इतकेंच मला निर्धारपूर्वक म्हणावयाचें आहे. न्यायालयाची सत्ता श्रेष्ठ असेल; पण, वस्तुजातीच्या नियतीचें नियमन करणारी सत्ता याहूनहि श्रेष्ठ आहे. मीं ज्या पक्षाचा प्रतिनिधि तो पक्ष मी स्वतंत्र असल्यानें उत्कर्षाप्रत पोंचला असता. माझ्या हाल अपेष्टांनींच त्याचा अधिक उत्कर्ष व्हावा, अशीहि जगन्नियंत्याची इच्छा असूं शकेल."



**—टिळक**

१९०८ सालीं सहा वर्षांची शिक्षा लोकमान्य टिळकांना झाली त्यावेळीं त्यांनीं काढलेले हे तेजस्वी उद्गार आतां इतिहासांतील अक्षर वाङ्मयांत जमा झाले आहेत. 'केसरी'तील दोन जळजळीत लेखांबद्दल इंग्रज सरकारनें टिळकांवर खटला भरला होता. टिळकांना शिक्षा झाली तेव्हां सर्व भारतावर औदासीन्याची छाया पसरली. मुंबईंत मजुरांचे दंगे झाले. असें सांगतात, ही हकीकत ऐकून रशियन् राज्यक्रांतीचा जनक निकोलाय लेनिन म्हणाला कीं, " भारतांत एक हाच खरा लोकांचा नेता आहे." टिळकांना पुढें मंडालें येथील तुरुंगांत ठेवण्यांत आलें. सहा वर्षांनीं शिक्षा

संपून ते परत आले तोंवर या देशांतलें राजकारण अगदीं मंद व क्षीण-तेज झालें होतें. यावरून भारतीय राजकारणांतलें टिळकांचें अनन्य-साधारण महत्त्व लक्षांत येईल. टिळकांच्या दृष्टीनें मात्र हा काळ फुकट गेला नाहीं. याच कारावासांत त्यांनीं 'गीतारहस्य' हा आपला असामान्य ग्रंथ रचिला. केवळ मराठी भाषेंतच नव्हे तर भारतीय तात्त्विक वाङ्मयांत हा ग्रंथराज आपलें अग्रस्थान सतत संभाळील.

देशभक्त आणि विद्वान्, तत्त्वज्ञानी आणि कर्मयोगी अशा टिळकांच्या विविध भूमिका आहेत. ते स्वतः स्थितप्रज्ञ होते. ज्येष्ठ पुत्राच्या मृत्यूनंतर 'केसरी'चा एक महत्त्वाचा अग्रलेख त्यांनीं पुरा केला. पण त्यांच्या एका परदेशी टीकाकारानें म्हटल्याप्रमाणें 'भारतीय असंतोषाचे जनक (Father of Indian unrest)' तेच होते. परकीयांच्या जोखडा-खालीं निमूटपणें राबणाऱ्या व लत्ताप्रहर सोसणाऱ्या हिंदी जनतेंत स्वाभिमान जागृत करून आपल्या दलित स्थितीविषयीं टिळकांनीं लोकांना असंतुष्ट केलें. आपली दुरवस्था परकीय सत्तेनें आली आहे. तेव्हां ती सत्ता नाहींशी केल्याशिवाय सद्गति नाहीं ही जाणीव प्रथम टिळकांनीं दिली. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच" हा मंत्र टिळकांनीं घरोघर पोंचवला. या मंत्राला स्वतः हालअपेष्टा सोसून त्यांनीं तेज आणलें. चंद्राची एक एक कला पिऊन पितर पुष्ट होतात असें म्हटलें जातें. थोर विभूतींचा जीवनरस पिऊनच मोठमोठ्या तत्त्वांना असें बाळसें येतें. टिळकांनीं सतत ४० वर्षें झटून व झिजून देशाला जागृत केलें. याच पायावर गांधींजींना भारतीय स्वातंत्र्याची इमारत रचतां आली.

आपलीं साधनें, लोकांचा वकूब आणि प्रतिपक्षाचा जोर याचा अचूक अंदाज घेऊन चळवळ करण्यांत टिळक निष्णात होते. १८५६ सालीं रत्नागिरीस त्यांचा जन्म झाला आणि १९२० सालीं मुंबईस त्यांचें देहावसान झालें. पण त्यांची कर्मभूमि आमरण पुणें हीच होती.येथील

डेक्कन कॉलेजांतून पदवी घेऊन ते बाहेर पडले. वकील झाले पण देश-सेवेच्या अत्युच्च भावनेनें प्रेरित होऊन त्यांनीं स्वार्थाकडे पाठ फिरविली. आणि ऐन पंचविशींत असिधाराव्रत पत्करलें. विष्णुशास्त्री चिपळूण-करांना येऊन ते मिळाले. अध्यापन आणि पत्रपांडित्य या दोन साध-नांनीं देशसेवा करण्याची दीक्षा चिपळूणकरांनीं त्यांना दिली. 'केसरी' हें वृत्तपत्र आणि 'न्यू इंग्लिश स्कूल' हें विद्यालय चालविण्यांत आपलें सर्वस्व ओतण्याचें टिळकांनीं ठरविलें. अगदीं आरंभींच डोंगरीच्या तुरुं-गांत १०१ दिवस त्यांना काढावे लागले. पण त्यांनीं आपलें ध्येय सोडलें नाहीं. वयाच्या पंचविसाव्या वर्षीं एकदां त्यांनीं सार्वजनिक जीवनांत उडी घेतली आणि पुढें ४० वर्षें म्हणजे आपल्या अंतापर्यंत स्वदेशहितचिंतन हें एकच एक ध्येय त्यांनीं चालविलें.

उद्बोधन, जागृति, चळवळ हा टिळकांचा कार्यक्रम होता. लोकांना संघटित होऊन विचार करण्यास अवसर मिळावा म्हणून गणेशोत्सव व शिवजयंत्युत्सव टिळकांनीं काढले. यांत प्राचीन इतिहास–पुराणांतून स्फूर्ति मिळून लोकांमध्यें राष्ट्रनिष्ठा निर्माण व्हावी व धर्मश्रद्धा वाढावी हा हेतु होताच. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार या चतुः-सूत्रांचे पाठ टिळकांनीं दिले. पुण्यांत प्लेगचा कहर झाला तेव्हां गोऱ्या लोकांनीं केलेले अत्याचार असोत किंवा वंगभंगासारखा अन्याय असो, सरकारवर तुटून पडायचें व अन्यायाविरुद्ध झगडायचें हा टिळकांचा बाणा असे. त्यामुळें टिळक हे इंग्रज सरकारला जहांबाज प्रतिस्पर्धी, आणि लोकांना भरवशाचे नेते वाटत. कॉंग्रेस, होमरूल लीग, सार्वजनिक सभा या जुन्यानव्या संस्थांचा उपयोग करून टिळकांनीं प्रचारकार्य केलें. हिंदी राष्ट्रवादाची गंगा अगदीं वरच्या लोकांच्या स्वर्गांत होती. तिला सामान्य लोकांच्या उद्धारासाठीं खालीं आणण्याचा भगीरथ प्रयत्न टिळकांनीं केला.

परंतु केवळ स्वातंत्र्यसंग्रामांतील एक अग्रणी एवढेंच टिळकांचें चरित्र

नाहीं. राजकारण हा जरी त्यांच्या जीवनाचा मुख्य भाग असला तरी तो वगळूनहि त्यांचें फार मोठें अवतारकार्य शिल्लक उरतें आणि तें फार श्रेष्ठ दर्जाचें असून त्याचा आदर्श ‘ यावच्चंद्रदिवाकरौ ’ जगाला स्फूर्तिदायक होईल. टिळकांनीं ज्ञानाच्या सागरांत अगदीं तळापर्यंत निमज्जन केलें होतें. कायद्याचा अभ्यास करतांना इतर विद्यार्थी इंग्रजी पुस्तकें व टिपणें वाचीत, तर टिळक वेद, भारत, रोमन इतिहास व वाङ्मय असे कायद्याचे मूलाधार अभ्यासत. त्यांनीं आर्यांचें वसतिस्थान उत्तरध्रुवावर असावें असा शोध ज्या इंग्रजी ग्रंथांत प्रसिद्ध केला, तो ग्रंथ वाचून मॅक्स्‌मुल्लरसारखे जगविख्यात पंडित मोहित होऊन गेले. गणितांत त्यांची गति अप्रतिम होती. ज्योतिषशास्त्र त्यांना अवगत होतें आणि पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञान त्यांनीं तळापासून ढवळून काढलें होतें. टिळक वृत्तीनें विद्याव्यासंगीच होते. एक अवश्य कर्तव्य म्हणून ते राजकारण करीत इतकेंच. ‘स्वातंत्र्य मिळालें म्हणजे मी एखाद्या कॉलेजांत प्रोफेसर होऊन राहीन ’ असें ते म्हणत. दररोज राजकारणाच्या धवडग्यांतसुद्धां शेंकडों पानें वाचण्याचा त्यांचा क्रम असे.

टिळकांचें शौर्य असामान्य होतें. जुलमी परसत्ता किंवा जबरदस्त प्रतिस्पर्धी यांना ते भीत नसत. सहा वर्षांची शिक्षा ऐकून आल्यावर तुरुंगाच्या कोठडींत त्यांना झोप लागली हें त्यांच्या निश्चल वृत्तीचें मोठें उदाहरण होय. भावनांवर त्यांचा विलक्षण संयम होता. ज्येष्ठ पुत्राच्या निधनानंतर लगेच महत्त्वाचा अग्रलेख त्यांनीं सांगितला. मंडालेसारख्या दूर शहरीं एकांतवासांत शिक्षा भोगीत असतांनासुद्धां अध्ययन व लेखन यांवर त्यांची बुद्धि स्थिर होऊं शकली. टिळक मध्यम उंचीचे, सतेज श्यामल वर्णाचे व भक्कम बांध्याचे होते. राहणींत डौल मुळींच नसे. ते मुद्रेवरून सिंहासारखे उग्र वाटत. परंतु मनानें ते सहृदय होते. त्यांच्यापर्यंत कोणीहि दुःखीकष्टी देशबांधव जाऊन पोंचत असे. ध्येयाच्या मार्गावर शरीरप्रकृति हें आद्य साधन आहे हें ओळखून त्यांनीं काळजी-

पूर्वक शरीर कणखर बनविलें होतें. प्रतिपक्षाला कर्दनकाळ वाटणारा हा पुरुष देशकार्याकरितां अगदीं सामान्य माणसाचेहि उंबरठे झिजवण्यास मागेंपुढें पहात नसे. रानडे, मेथा, गोखले इ० त्यावेळच्या अतिरथी-महारथींवर टिळकांनीं निर्दयपणें टीकास्त्र सोडलें. परंतु त्यांच्या निधना-नंतर अत्यंत गुणग्राहक असे मृत्युलेख लिहिले. ना. गोखल्यांच्यावर त्यांनीं अत्यंत कठोर असा लेख लिहून पंधरा दिवस झाले नसतील तों गोखले कालवश झाले. टिळकांनीं स्मशानभूमींत त्यांच्या गुणवर्णनपर इतकें उत्कृष्ट भाषण केलें कीं, तें अनंतकाळ लोकांच्या स्मरणांत राहील.

साधेपणा हा टिळकांच्या रोमरोमांत भरलेला होता. त्यांचें लेखन, भाषणहि अत्यंत साधें व वेधक असे. त्यांच्या साधेपणाचें एक वैशिष्ट्य असें कीं, त्या साधेपणाचें त्यांनीं कौतुक केलें नाहीं किंवा त्याचा धर्महि बनविला नाहीं. अंगकांति ही जशी अंगापासून वेगळी काढतां येत नाहीं तसें टिळकांचें साधेपण होतें. एवढा त्रिखंडकीर्ति पंडित सामान्य माणसांत सहज मिसळे. म्हणून त्यांचे मवाळ विरोधक त्यांना ‘ तेल्यातांबोळ्यांचे पुढारी ’ म्हणत; पण या निंदेंतच टिळकांचें खरें मोठेपण आहे. एखाद्या सह्याद्रीच्या कड्याप्रमाणें त्यांचें व्यक्तित्व भव्य व उग्र होतें. समाजसुधारणेबद्दल त्यांना आस्था नव्हती असें एक मत आहे. पण तें चुकीचें आहे. ते मनानें सुधारकच होते. पण राजकीय सत्ता काबीज केल्यानंतर सावकाश समाजसुधारणा करतां येईल असें ते म्हणत. महाराष्ट्राच्या इतिहासांत एवढा अष्टपैलू पुरुष छत्रपती शिवाजीमहाराजांनंतर हाच झाला असें म्हटल्यास अतिशयोक्ति नाहीं. अगाध पांडित्य, सात्त्विक शौर्य, गाढ देशभक्ति, विलक्षण समयज्ञता, लोकहिताची उत्कट कळकळ आणि या सर्वांवर किरण फेकणारें लोको-त्तर चारित्र्य यांमुळें हा महापुरुष म्हणजे भारतीय मानव्याचाच नव्हे तर एकंदर मानवतेचा एक उत्कृष्ट नमुना झालेला आहे. गोविंद शाहीरांच्या शब्दांत लक्षावधि लोकांनीं म्हटलें तेंच आपण म्हणूं या:—

मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचे बुडबुडे
तुझे पवाडे गातिल पुढती इतिहासीं चौघडे !

****

# विनोबा : ८



सबंध भारतांत एक तापसी सध्यां आपल्या दहापांच शिष्यांसह पायीं एक महायात्रा करीत आहे. गांवोगांव तो जातो. त्याची मुद्रा तेजस्वी आहे. अंगयष्टि तपश्चर्येनें सडसडीत व कांतिमान् झाली आहे. तो फक्त कौपीन परिधान करतो. दाढीमिशांनीं व्यापलेल्या त्याच्या चेहऱ्या-वर अथांग शांति आहे. ज्या गांवास मुक्काम पडेल तेथें लोक गोळा होतात. मग सभा होते. हा तापसी आपला संदेश त्या सभेंत देतो. " भारतांतील दारिद्र्य नाहींसें करण्यासाठीं ज्यांच्याजवळ जास्त जमीन आहे त्यांनीं ती आपल्या कंगाल बांधवांच्या उपयोगाकरितां दिली पाहिजे. भारतांत रक्तपातमय क्रांति नको असेल तर आपल्याजवळ जें अधिक आहे तें दुसऱ्याला द्या. 'सब भूमि गोपाल की' आहे. श्रीमंतांनीं स्वयंस्फूर्तीनें हा भूदान यज्ञ केला तर देशांतल्या अनेक समस्या हां हां म्हणतां सुटतील." अशा आशयाचें भाषण झाल्यावर तेथें सद्गदित झालेले कित्येक जमीनदार जमीन दिल्याचें जाहीर करतात. अशी महायात्रा करीत या साधुवर्यानें ५ लाख एकरांवर जमीन मिळविली आहे. या क्रांतिकारक पुरुषाचें नांव विनोबा.

समाजांत मूठभर लोकांपाशीं अवाढव्य संचय असतो म्हणून

बहुसंख्य लोक दरिद्री राहतात. हे दरिद्री, असंतुष्ट व चिडलेले असतात. सारा समाज त्यामुळें अस्वस्थ राहतो. कारण हे असंतुष्ट कधीं खवळतील याचा नेम काय? एका बाजूस घनघोर स्वार्थ व संचय आणि दुसऱ्या बाजूस अफाट दारिद्य व असंतोष यामुळें जगांत सतत कलह चाललेले आहेत. जबरदस्तीनें संचय हिसकावून घ्यायचा म्हणजे हिंसा आली. पण तीमुळें माणसाचा सात्त्विकपणा नष्ट होतो. म्हणून जगांतील विषमता, द्वेष, अशांति, युद्धें इ. नष्ट करण्याचा एकच उपाय म्हणजे ज्यांच्यापाशीं जास्त आहे तें त्यांनीं आपल्या दरिद्री बांधवांना देणें हा होय. विनोबांनीं भूदान-यज्ञाची अपूर्व चळवळ याचसाठीं सुरू केली.

हे मूळचे कुलाबा जिल्ह्यांतील पेण गांवचे. यांचें नांव विनायकराव भावे. पण आज 'विनोबा' या नांवानें जग त्यांना ओळखतें. हें नांव गांधीजींनींच त्यांना दिलें. पांडोबा म्हणून एक गृहस्थ आश्रमांत होते. त्या नांवाच्या धर्तीवर गांधीजी विनायकरावांना 'विनोबा' म्हणूं लागले. तेंच नांव विख्यात झालें.

विनोबांचें इंग्रजी शिक्षण बडोद्यास झालें. ते १९१३ सालीं मॅट्रिक झाले. शाळेंत असतांना वाचण्याचा विलक्षण नाद त्यांना होता. 'दासबोध,' 'आर्याभारत,' 'केकावली' हीं त्यांचीं आवडतीं पुस्तकें होत. फिरणें, चर्चा, वाचन हे त्यांचे मुख्य छंद. या छंदांपुढें त्यांना खाणेंपिणेंसुद्धां सुचत नसे. विनोबांनीं विद्यार्थीदशेपासूनच अनेक भाषांचा अभ्यास सुरू केला होता. आज त्यांना अनेक भाषा आणि त्याहि उत्तम तऱ्हेनें येतात. इकडे संस्कृतांतील उपनिषदें ते अधिकार-वाणीनें विशद करतात, तर तिकडे अरबींतलें कुराणहि तितक्याच तन्मयतेनें ते वाचूं शकतात. गांधीजींच्या सांगण्यावरून १९२४ सालीं वर्ध्याचा आश्रम स्थापण्यास ते वर्धा येथें आले. १९३६ सालीं जेव्हां गांधीजींनीं आपला मुक्काम वर्ध्याच्या आश्रमांत करायचें ठरविलें त्यावेळीं विनोबांनीं आपला तळ वर्ध्यापासून १॥ मैलावर असलेल्या नालवाडींत

हलविला. नालवाडी आश्रमाचा व्याप फार वाढला तेव्हां त्यांनीं आपली वस्ती तेथून तीन मैलांवर पवनार येथें धाम नदीच्या कांठीं नेली. विनोबांच्या आश्रमाचें नांव 'पवनार परंधाम' असें आहे. या ठिकाणीं हा महान् ऋषि अध्ययन, अध्यापन, चिंतन, लेखन करीत असतो.

पवनारला आल्यापासून विनोबांनीं ग्रामसफाईकडे विशेष लक्ष दिलें. ग्रामसफाईचें कार्यच ते आजही मोठ्या तळमळीनें करीत आहेत म्हणा ना! पवनारपासून जवळच असलेल्या सुरगांवीं त्यांची आठवड्यांतून दोनदां फेरी झाल्याशिवाय राहात नाहीं. स्पृश्यास्पृश्य हा भेद नसावा ही त्यांची आंतरिक तळमळ आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते पंडित नेहरूंच्या निमंत्रणावरून दिल्लीला गेले होते. निर्वासितांच्या छावणीस भेट देणें, दंगलपीडित निर्वासित लोकांना दिलासा देणें व दंगलग्रस्त भागास भेटी देणें हा त्यांचा कार्यक्रम होता. अजमीरला उरुसाच्या वेळीं दंगा होऊं नये म्हणून खुद्द ते स्वतः तेथें गेले होते.

विनोबांच्या आयुष्यांतील अविस्मरणीय प्रसंगांत खालील प्रसंगाची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. तो प्रसंग म्हणजे वर्ध्याचें 'लक्ष्मी नारायण' मंदिर ज्या दिवशीं अस्पृश्यांना खुलें झालें, त्या दिवशींचा. त्या दिवशीं त्यांनीं दिलेलें व्याख्यान किती विचारणीय होतें म्हणून सांगतात! 'दीनानाथ' 'दीनबंधु' याचा अर्थ त्यांनीं त्या दिवशीं विशद करून सांगितला. साऱ्या श्रोत्यांना त्यांनीं त्या दिवशीं मुग्ध करून सोडलें म्हणतात. विनोबांचें वक्तृत्व फारच दांडगें आहे. मोजक्या शब्दांत श्रोत्यांचीं अंतःकरणें आकर्षून घेणें त्यांना सहजच साधतें. त्यांनीं लिहिलेलीं 'जीवन दृष्टि', 'गीता प्रवचनें,' 'मधुकर' हीं पुस्तकें फारच विचारणीय व अभ्यसनीय आहेत. भाषेंत प्रतिभेची चमक असते. भाषा सोपी व ठाशीव. गोळीबंद वाक्यें एकामागून एक यायचीं विचार अगदीं स्वतंत्र व तर्कशुद्ध. त्यांनीं मराठींत लिहिलेली 'गीताई' बहुतेकांनीं वाचली असेलच. पूर्वी ते 'महाराष्ट्र धर्म' मासिक चालवीत.

ग्रा. क्र. ६९९८ नों. दि.
वि.

सध्यां नालवाडींतून निघत असलेल्या 'सेवक' मासिकांतून त्यांचें लिखाण प्रसिद्ध होतें.

सत्याचें, अहिंसेचें आणि अपरिग्रहाचें जीवन पूज्य विनोबा आश्रमांत आल्यापासून तों आजपर्यंत कडकडीतपणें पाळीत आहेत. महात्माजींनीं पुकारलेल्या प्रत्येक सत्याग्रहांत त्यांनीं भाग घेतला आहे. ते तुरुंगाची वारी करून आले आहेत. १९४० सालीं पुकारलेल्या वैयक्तिक सत्याग्रहांत विनोबांना पहिला मान होता. उपोषणें वगैरेहि त्यांनीं आजपर्यंत पुष्कळ केलीं आहेत.

विनोबा विरक्त आहेत तसे रसिक आहेत. सुवाङ्मय, गीत, कला-विकास यांचा रस त्यांना चाखतां येतो. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे ते वारस आहेत. तेव्हां गांधीजींप्रमाणेंच सतत नवे नवे प्रयोग ते करीत असतात. महाराष्ट्रांतील साहित्यसेवक संतांच्या उज्ज्वल मालिकेंत त्यांना स्थान आहे. या दृष्टीनें 'ज्ञानोबा ते विनोबा' अशी एका नेत्यानें रचलेली शब्दसंहति सार्थ म्हणावी लागेल. लिपीपासून अर्थव्यवस्थेपर्यंत आणि शिक्षणपद्धतीपासून व्रतवैकल्यापर्यंत विनोबांना कांहीं तरी नवें सांगा-वयाचें आहे. विनोबा ध्येयवादी असले तरी व्यवहारापासून त्यांनीं फारकत करून घेतलेली नाहीं. आहारशास्त्राचा, समाजरचनेचा, तत्त्व-ज्ञानाचा त्यांचा व्यासंग फार मोठा आहे. शिवाय उच्च दर्जाची प्रतिभाहि त्यांना लाभलेली आहे. साथी जयप्रकाश नारायणांसारखे आधुनिक दृष्टीचे युवकनेते विनोबांकडे आकर्षित झाले ते यामुळेंच. विनोबांनीं आजवर गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचाच अर्थ विशद करून व आचरून दाखविला. गांधीजींचे ते आध्यात्मिक दत्तकपुत्र व अन्तेवासी आहेत. पण भूदानयज्ञ ही भारतालाच नव्हे तर जगाला फार मोठी देणगी होय. शांततामय समाजक्रांतीचा हा राजमार्ग विनोबांनीं जगाला दाख-विला हें त्यांचें मानवजातीवरील ऋण इतिहासांत नमूद केलें जाईल.

****

# ॲनी बेझंट : ९

‘ शुभ्र वर्ण व शुभ्र ’वस्त्रें हा देवदूतांचा विशेष आहे ’ असा युरोपीय पुराणांचा संकेत आहे. डॉ. बेझंट यांची ती पांढरी शुभ्र



मूर्ति व्यासपीठावरून अत्यंत उत्कट भावनांनीं वक्तृत्वपूर्ण भाषण करतांना ज्यांनीं पाहिली असेल, त्यांना वरील संकेताप्रमाणें बेझंट यांचे ठिकाणीं खरो-खर देवदूताचा भास झाला असेल. त्यांच्या ८६ वर्षांच्या दीर्घ जीवनांत समाजकारण, राजकारण, अर्थशास्त्र, अध्यात्मविद्या इ० संस्कृतीच्या महत्त्वाच्या भिन्नभिन्न शाखांत त्यांनीं एवढें अचाट कर्तृत्व प्रगट केलें कीं खरोखरच त्यांना दैवी शक्तीचें साह्य होतें असा तर्क श्रद्धाळू अंतःकरणानें केला तर त्यांत नवल नाहीं.

प्रतिकूल परिस्थितींत सामान्य माणसें नामशेष होतात. पण तींतूनच असामान्य माणसाची प्रतिभा प्रज्वलित होते. भोंवतालीं घडणाऱ्या बऱ्या वाईट गोष्टींचा मनावर जो परिणाम होईल त्याचें सदैव पृथक्करण करीत, सत्याचा शोध घ्यावयाचा हा असामान्यांचा स्वभावधर्मच आहे. या त्यांच्या स्वभावधर्माला कोणतींहि बिकट संकटें थांबवूं शकत नाहींत. थोर माणसांच्या मोठेपणाचें हें रहस्य महात्माजींनीं आपल्या आत्मचरित्राला सत्याचे प्रयोग ( My Experiments with Truth ) असें जें यथार्थ नांव दिलें आहे त्यांत उत्तम रीतीनें प्रकट झालें आहे. डॉ. ॲनी बेझंट यांचें जीवन असेंच सत्यशोधनात्मक आहे. थिऑसॉफिकल सोसायटींत नांव

दाखल केल्यानंतर आपल्या नास्तिक मित्रांचा निरोप घेतांना त्या म्हणाल्या, " सर्व स्नेह्यांनीं माझा त्याग केला तरी सत्याची कास मीं सोडणार नाहीं. ' या स्त्रीनें सत्याची कास धरण्याचा प्रयत्न केला ' एवढेंच वाक्य माझ्या समाधीवर लिहिलें जावें अशी माझी इच्छा आहे. " सर्व जगभर त्यांचेबद्दल वाटणारा आदर, तसेंच त्यांच्याविरुद्ध उठलेलीं टीकेचीं वादळें यांचें कारण म्हणजे त्यांची ही सत्यप्रीति होय.

१ ऑक्टोबर १८४७ सालीं लंडन येथील वूड नांवाच्या एका आयरिश घराण्यांत डॉ. ॲनी बेझंट यांनीं जन्म घेतला. ॲनीचीं मातापितरें सज्जन, साधीं आणि प्रेमळ होतीं; परंतु दुर्दैवानें मि. वूड हे लौकर निवर्तले आणि त्यांची बायको व पोरेंबाळें उघडीं पडलीं. पण ॲनीचें भाग्य थोर म्हणून मॅरिएट नांवाच्या एका श्रीमान् बाईनें तिला आपलेकडे नेलें आणि तिचें शिक्षण व संगोपन मोठ्या दक्षतेनें केलें. मॅरिएट बाईच्या शिकवणीनें ॲनी अत्यंत दक्ष, सुसंस्कृत व भाविक बनली. पुढें आईकडे आल्यानंतर देखील शिक्षण, खेळ, करमणूक यांत ॲनीचा काळ मोठ्या आनंदांत गेला. तिला दुःखाची झळ थोडीहि लागूं नये याविषयीं आई काळजी घेई. कांचेच्या घरांत एखादें रोप जितक्या दक्षतेनें वाढविण्यांत येतें तितक्या दक्षतेनें ॲनीचें संगोपन झालें.

पण हा ' बाळपणाणीचा काळ सुखाचा ' लौकरच संपला. १८६७ सालीं रेव्ह० फ्रँक बेझंट यांच्याशीं ॲनीचा विवाह झाला संसाराचा भार अंगावर पडला. दुःखांनीं भरलेल्या जगाची ओळख होऊं लागली. तेवढ्यांतच विवाहाचें पहिलेंच गोड फळ जो त्यांचा आवडता मुलगा तो मृत्युमुखीं पडला. आजवर श्रद्धामय अंतःकरणानें जीवनाकडे पाहात असतां हा आकस्मिक धक्का बसतांच मिसेस बेझंट यांची बुद्धि चक्रावून

उठली. देव दयाळु आणि पुण्यवानांचा पाठीराखा असतां आपलें लाडकें बाळ असें अचानक कालवश व्हावें याचा त्यांना विस्मय वाटला आणि त्याचें पर्यवसान त्या नास्तिक होण्यांत झालें !

मिसेस बेझंट यांचें बुद्धिस्वातंत्र्य आणि नास्तिकवाद त्यांच्या परंपरागत सनातनी पतींना सहन होणें शक्य नव्हतें. घरांत धुसफूस सुरू झाली आणि अखेर त्यांना पतिसदनाला मुकावें लागलें.

त्यानंतर कांहीं काळ, बेझंटबाईंना अत्यंत हलाखीचा गेला. लोकांची शुश्रूषा करणें, हलकीं मोलाचीं कामें नुसत्या जेवणाच्या मोलानें करण, लेख लिहिणें इ० नाना प्रकारचे व्यवसाय करून त्यांनीं चरितार्थ चालविला. मानसिक क्लेश आणि शारीरिक कष्ट यांची तर परमावधीच झाली होती. त्यांत नवऱ्यानें दूर केलेली व खिस्ती धर्माच्या विरुद्ध असलेली बाई म्हणून समाज त्यांच्यावर दांतओठ खात होता. याच सुमारास चार्लस ब्रॅडला या उदारचरित व विद्वान् नास्तिकवाद्याशीं त्यांची ओळख झाली आणि त्या ब्रॅडलाच्या शिष्य बनल्या. पुढें ब्रॅडला व बेझंट या जोडीनें वक्तृत्व आणि लेखन या दोन शस्त्रांनीं अज्ञानावर हल्ले चढविले, लोकसेवेचें व्रत अंगिकारलें आणि संततिनियमनासारख्या धर्माविरुद्ध पण गरीब जनतेला हितकर असलेल्या तत्त्वाचें मंडन केलें. या बाबतींत सामाजिक बहिष्कारापासून फौजदारी खटल्यापर्यंत सर्व हाल त्यांना सोसावे लागले. पण आपल्या ध्येयापायीं त्यांनीं ते मोठ्या आनंदानें व धैर्यानें सोसले.

त्यावेळींच 'फेबियन्' सोसायटी ही समाजसत्तावादाचा प्रचार करणारी संस्था अस्तित्वांत आली होती. बर्नार्ड शॉसारखी विख्यात मंडळी तिची सदस्य होती. डॉ. बेझंटनीं या संस्थेंत नांव दाखल केलें आणि समाजसत्तावादाचा जारीनें पुरस्कार चालविला. मोहक लेखणी व आकर्षक वाणी या दोन गुणांना उत्कृष्ट श्रद्धेची जोड मिळाल्यामुळें ~. बेझंटचें सार्वजनिक जीवन प्रभावशाली ठरलें.

वयाला चाळीस वर्षें झालीं. त्यानंतर दैवयोगानें मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांचा व डॉ. बेझंटचा परिचय झाला. जडवादांत लुप्त होत चाललेल्या त्यांच्या अंतःकरणांत प्रकाश पडला. अध्यात्मविद्येची प्रभा फाकूं लागणार, अशीं चिन्हें दिसूं लागलीं. त्या पुनः आस्तिक बनल्या आणि थिऑसफिकल सोसायटींत दाखल झाल्या. लहानपणीं त्यांची श्रद्धा जाज्वल्य होती. पण ती बुद्धीच्या कसोटीला उतरली नव्हती. मध्यंतरीं नास्तिकवादाच्या भट्टींत सांपडून ती सज्ञान, सतेज व सुसंस्कृत बनली आणि ब्रह्मानंदाची ओळख त्यांना पटली. तेव्हांपासून ४५ वर्षें त्यांनीं थिऑसफिकल सोसायटीच्या ध्येयाचा व कार्याचा प्रचार जगभर अनन्य निष्ठेनें केला.

कांहीं वर्षांनीं त्या हिंदुस्थानांत आल्या. तेव्हांपासून त्या हिंदी आकांक्षांशीं व ध्येयाशीं अगदीं समरस झाल्या. होमरूललीगच्या चळवळींत त्यांनीं सक्रिय पुढाकार घेतला आणि त्यापायीं कारावासहि भोगला. १९१७ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अध्यक्ष-पदाची माळ त्यांच्या गळ्यांत पडली आणि आपल्या राष्ट्रभक्तीला पूर्ण उद्गार देण्याची संधि त्यांना मिळाली. हिंदुस्थान हें त्यांनीं आपलें कायमचें निवासस्थान केलें. हिंदी संस्कृति, हिंदुधर्म, हिंदी ध्येयें यांविषयीं त्यांना पराकाष्ठेचा आदर असून तो त्यांनीं वेळोवेळीं व्यक्त केला.

बुद्धीच्या कसोटीला पटेल तें श्रद्धायुक्त अंतःकरणानें आचरावयाचें असा डॉ. बेझंटचा दृढ संकल्प असे. राष्ट्रीयतेपेक्षां अंतःराष्ट्रीयतेकडे त्यांचा कल अधिक. सर्व धर्मांतील उदात्त तत्त्वज्ञानाकडे त्या सारख्याच जिव्हाळ्यानें पहात. सर्व मानवतेचा विकास करणारा जगद्धर्म हें त्यांचें ध्येय होतें. त्यांना हिंदुस्थानचा उद्धार पाहिजे होता. पण त्याकरितां इंग्लंडशीं शत्रुत्व नको होतें. पौर्वात्य आणि पाश्चात्य संस्कृतींतला उत्तम उत्तम तेवढा भाग एकत्र यावा याकरितां दोनहि देशांचें सख्य त्यांना अगत्याचें वाटे. अध्यात्म ही त्यांची प्रेरकशक्ति असल्यानें राजकारणाकडे

व समाजकारणाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन इतरांपेक्षां वेगळा पडे. तसेंच भौतिक शास्त्रांशीं वैर जोडून अध्यात्मविद्या यश पावेल असें त्यांना वाटत नसे. सामान्य जनता इतका सूक्ष्म विवेक करीत नाहीं; त्यामुळें डॉ. बेझंट यांचेबद्दल पुष्कळदां भयंकर गैरसमज माजले व अद्यापिहि त्याचे पडसाद कोठें कोठें ऐकूं येतात.

सार्वजनिक हिताकरितां वैयक्तिक थोरवी बाजूला ठेवायची ही स्वार्थ-त्यागी वृत्ति डॉ. बेझंट यांचेमध्यें फार उत्कर्षाला गेली होती. स्वतः नांवारूपाला आणलेलें काशी येथील हिंदु सेंट्रल कॉलेज त्यांनीं पंडित मदनमोहन मालवीयांचे स्वाधीन केलें. पंडितजींचें नेतृत्व लाभल्यानें कॉलेजचें अधिक कल्याण होईल, तेव्हां आपल्या स्वामित्वाचा नसता अभिमान कशाला, असा थोर विचार त्यांनीं केला. तसेंच हिंदी स्वराज्याचा नमुना म्हणून ‘ कॉमनवेल्थ ऑफ इंडिया बिल ’ मोठ्या परिश्रमानें बेझंट यांनीं तयार केलें होतें. परंतु ‘ नेहरू रिपोर्ट ’ ची प्रसिद्ध योजना पुढें येतांच त्यांनीं आपलें बिल मागें घेतलें, या उदाहरणा-वरून त्यांची निरहंकारी वृत्ति दिसून येईल. १९३३ सालीं बेझंटनीं आपल्या नश्वर देहाचा त्याग केला.

चौफेर विद्वत्ता, उदंड अनुभव, असामान्य दीर्घोद्योग, सात्त्विक रहाणी आणि प्रतिभाबल यांयोगें डॉ. बेझंटना उच्च दर्जाचें स्थान प्राप्त झालें नास्तिक व जडवादी सुशिक्षितांना आस्तिकवादाकडे आकर्षून सश्रद्ध. करण्याच्या प्रयत्नांत डॉ. बेझंटनीं मोठीच कामगिरी बजाविली आहे. त्यांच्या परिणत प्रज्ञेचा लाभ हिंदुस्थानला मिळाला हें या देशाचें सुदैव होय. उद्यां राजकारणांतले तंटे मिटले, आंतर्राष्ट्रीय प्रेमभावनेचा विकास झाला, आणि श्रद्धा व बुद्धि यांच्या पायावर उभारलेला व्यापक नवयुगधर्म तयार झाला, म्हणजे भूतकाळाकडे वळून पाहतांना डॉ. बेझंट यांचें अलौकिक जीवन वंदनीय वाटेल यांत शंका नाहीं.

****

# अँड्रयूज

१ १०

हिंदुस्थानच्या परदेशी मित्रांत दीनबंधु अँड्रयूज यांची प्रामुख्यानें गणना करतां येईल. अँड्रयूज आपणांस येशू ख्रिस्ताचे शिष्य म्हणवीत.



महात्मा गांधी व कविसम्राट टागोर यांचे ते स्नेही होते. टागोरांच्या शांतिनिकेतनांत ते अध्यापक होते आणि कविसम्राटांबरोबर त्यांनीं पौर्वात्य देशांत दौरेहि काढले. महात्माजींच्या एका उपवासाचे वेळीं अँड्रयूज त्यांच्या अगदीं उशापायथ्याशीं बसून होते. इतकेंच काय, पण गांधीजींच्या मुक्ततेसाठीं त्यांनीं जिवाचें रान केलें. मुंबई सरकारपासून साम्राज्यसरकारपर्यंत आपलें प्रचंड वजन पोंचवून गांधीजींची मुक्तता केली, आणि अखेर अंगांत ताप असतां गांधीजींना आपल्या निवासस्थानापर्यंत सुरक्षित रीतीनें पोंचविलें, तेव्हां त्यांना विश्रांति घेणें सुचलें" ख्रिस्त, गांधी व टागोर यांचा शिष्य व मित्र असलेला हा पवित्र ख्रिस्ती शांति, अहिंसा व विश्वबंधुत्व यांचा उपासक असावा हें साहजिकच आहे.

अँड्रयूज यांचा जन्म १८७१ च्या फेब्रुवारींत झाला. त्यांना १३ भावंडें होतीं. सुदैवानें त्यांपैकीं ८ अजूनपर्यंत जिवंत होतीं. त्यांचे वडील व आजोबा चर्चचे उपाध्याय होते; आणि त्यांची माताहि फार श्रद्धाळू होती. उभय वंशांतल्या या धर्मपरायणतेचा परिणाम अँड्रयूजवर झाल्यावांचून कसा राहणार? आपल्या मातेच्या उदाहरणावरूनच ईश्वराविषयींची श्रद्धा आपल्या मनांत निर्माण झाली आणि आयुष्यांत अनेक स्थित्यंतरें झालीं तरी ती श्रद्धा अढळ राहिली असें अँड्रयूज म्हणत.

मुलानें आपल्याच चर्चमध्यें उपाध्याय व्हावें अशी अँड्रयूजच्या

वडिलांची इच्छा होती. पण अँड्रूजनीं तें नम्रपणें नाकारून 'माझ्या जीवनांत अपवित्रपणा आला आहे' असें त्यांना सांगितलें. पुढें पश्चात्ताप होऊन प्रार्थनेच्या वेळीं ते परमेश्वराची करुणा भाकीत असतां अपूर्व असा अनुभव येऊन ते बेशुद्ध पडण्याचे बेतांत आले. याच वेळीं ईश्वर हा आपला त्राता आहे, अशी खूण त्यांना पटली. नंतर त्यांनीं चर्चमध्यें शिरण्याचा प्रयत्न केला; परंतु आपण ज्या ख्रिस्ताच्या शोधार्थ तळमळत आहोंत तो ख्रिस्त चर्चमध्यें मिळणार नाहीं, तर दीनांच्या व पतितांच्या सेवेंतच त्याचें दर्शन आपणांला होईल असें त्यांना वाटूं लागलें. म्हणून त्यांनीं प्रथम डरहॅमच्या मजुरांत जाऊन कार्यास आरंभ केला.

१९०४ सालीं दिल्ली येथें अँड्रूजचे एक ख्रिस्ती स्नेही गृहस्थ आजारी पडले. त्यांची शुश्रूषा करण्याकरितां अँड्रूज हिंदुस्थानांत आले. दलितोद्धाराची कळकळ अँड्रूजना पूर्वींपासूनच असल्यामुळें हिंदुस्थानांतील दलितवर्गाची प्रचंड लोकसंख्या पाहून त्यांचें मन द्रवलें आणि हिंदुस्थान हेंहि आपल्या चळवळीचें एक क्षेत्र त्यांनीं ठरविलें. १९१३ सालीं कै. ना. गोखले यांच्या आज्ञेवरून अँड्रूज आफ्रिकेस गेले. आफ्रिकेंतल्या दीन हिंदी लोकांच्या वतीनें म. गांधींनीं आपला लढा सुरू केला होता. अँड्रूजनीं त्यांत मनोभावें साह्य केलें आणि अखेर वसाहत सरकारनें म. गांधींशीं जो सन्माननीय समेट केला त्याला कै. गोखल्यांप्रमाणें अँड्रूज यांचेंहि महत्त्व व परिश्रम कारण झाले. असो.

आफ्रिकेप्रमाणें फिजी बेटांतहि हिंदी मजुरांचे हाल होत असत. मुदतबंदीच्या चक्रांत त्या बिचाऱ्यांचें जीवन पिळून निघे. अँड्रूज जातीनें तिकडे गेले आणि तेथें व ऑस्ट्रेलियांत प्रचंड चळवळ करून तेथल्या सरकारला हिंदुस्थान सरकारशीं करार करण्यास त्यांनीं भाग पाडलें. एवढ्यानें संपलें नाहीं. त्या करारांत राहिलेल्या अपुरेपणाच

फायदा घेऊन जुनी जुलमी पद्धति पुनः सुरू करण्याचा प्रयत्न जेव्हां फिजी नोकरशाही करूं लागली, तेव्हां अँड्रयूजनीं पुनः त्या बेटांत दौरा काढला. अखेर १९२० सालीं ती जुलमी पद्धति कायमची बंद करण्यांत आली.

झांजीबार सरकारनें तेथें जाऊन राहिलेल्या हिंदी लोकांविरुद्ध जें फर्मान काढलें, त्यासंबंधांत हिंदी लोकांच्या वतीनें झगडण्यांत अँड्रयूजनीं फार मेहनत घेतली.

दीनबंधु अँड्रयूज हे खरे ख्रिस्तशिष्य होते. अन्याय दिसला, दलितांचा धांवा ऐकूं आला, कीं अँड्रयूज धांवून जात. त्यांची रहाणी, त्यांचा वेष व रुबाब पाहिला म्हणजे धर्मग्रंथांतल्या प्रेषिताची आठवण होते. त्यांनीं जें उद्दिष्ट ठेवलें होतें तें फार उच्च होतें. बेझंट, हॉर्निमन् यांच्यासारख्या हिंदुस्थानच्या ख्रिस्ती मित्रांना सरकारच्या रोषाला पात्र व्हावें लागलें, तसा प्रसंग अँड्रयूजवर आला नाहीं. हिंदुस्थानांत काय आणि विलायतेंत काय सत्ताधाऱ्यांचे प्रासाद त्यांना खुले होते. याचें कारण अँड्रयूजनीं राजकारणापासून स्वतःला अलिप्त ठेवलें होतें. ब्रिटिश मालावरील बहिष्काराच्या चळवळीसंबंधीं ते प्रतिकूल होते. हिंदुस्थाननें साम्राज्यांतून फुटून निघावें असें ते कधीं प्रतिपादन करीत नसत. लोकसेवा आणि दलितोद्धार हेंच त्यांचें कार्य. यासाठींच त्यांनीं आपली काया चंदनासारखी झिजविली होती. ब्रिटिश लोकांशीं त्यांचे खटके उडाले ते हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां नव्हते; तर साम्राज्यांतील दलितवर्गाच्या उद्धाराकरितां होते.


ख्रिस्तानें आपल्या जीवनावर केवढी छाप बसविली याचें वर्णन अँड्रयूज यांनीं एक सुरस पुस्तक लिहून केलें आहे. हें पुस्तक ( What I Owe to Christ ) म्हणजे त्यांचें आत्मचरित्र होय. अशा तऱ्हेचा विद्वान् ख्रिस्ती संत उदयोन्मुख हिंदी राष्ट्राला मित्र म्हणून लाभावा हें आपलें भाग्यच म्हटलें पाहिजे. बारा वर्षांमागें ते जेव्हां ख्रिस्तवासी

झाले तेव्हां आपला प्रेमळ बांधव गेला म्हणून जगांतील दलित समाज विशेषतः हिंदी लोक हळहळले !

****

# केमाल पाशा : ११

महायुद्धाच्या धुमश्चक्रींत तुर्क आणि दोस्त राष्ट्रांचें सैन्य यांची अनाफार्टा येथें झुंज लागली होती. दोस्तांनीं मारा केला आणि तुर्कांचे सर सेनापति भांबावून गेले. अखेर त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक ! ते टेलिफोनवर गेले आणि एका कर्नलशीं बोलूं लागले. **सेनापतिः**— " केमाल, तुर्कस्थानची कंबख्ती आहे. यांतून आतां कसें सुटायचें ? " **केमालः** —" त्यांत काय अवघड आहे ? " **सेनापतिः**—" तुम्ही कांहीं करूं शकाल ? " **केमालः**—" हो हो. फक्त मला ब्रिगेडिअरचे अधिकार द्या म्हणजे दाखवितो माझा प्रभाव. " सेनापतींनीं केमालला टेलिफोननें कळविलें कीं तुम्हांला ब्रिगेडिअर नेमलें आहे. झालें, आपल्या अधिकारांत केमालनें असे कांहीं अचूक हल्ले चढविले कीं, दोस्तांना पळतां भुई थोडी झाली. रणशूर केमालचें नांव युरोपात ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें.



" माझा सन्मान करावयाचा असेल तर मला ' तुर्कस्थानचा केमाल ' असें म्हणा. " असें केमाल पाशा नेहमीं सांगत. आणि त्यांचा राष्ट्राभिमान खरोखरच शंभर नंबरी होता. युरोपीय राष्ट्रांच्या बंधनांतून आपला देश सोडवून त्यांनीं त्याला जगांत स्वतंत्र स्थान मिळवून

दिल्यानें तुर्कांना 'केमाल' म्हणजे आपला देवच वाटे. नवजवान तुर्कांच्या पुढें जर कोणतें ध्येय असेल तर तें 'केमाल!' कारण केमालपाशांनीं तुर्कस्थानांत अंतर्बाह्य क्रांति करून टाकली.

मध्यम उंची, तांबूस गोरापान वर्ण, गहिरे सतेज डोळे, उंच गालांचीं हाडें, आणि एकंदर चेहऱ्यावर व बोलण्याचालण्यांत वीरश्रीचा रुबाब असें थोडक्यांत केमालचें वर्णन देतां येईल. हसतांना किंवा बोलतांना त्यांच्या खालच्या दांतांत भरलेलं सोनें चमकूं लागे. पोशाख अगदीं इंग्लिश पद्धतीचा; त्यामुळें शिरोभूषण नसलें म्हणजे पाशा हुबेहूब युरोपियन थाटाचे दिसत. लष्करी व कर्तृत्वशाली माणसांत जो करडेपणा येतो तो त्यांच्यांत पूर्ण उतरला होता; पण अगदीं खाजगी जीवनांत केमाल मनमोकळेपणानें बोलत. धूम्रपान करीत, सोबत्यांशीं गप्पागोष्टी करीत ते कित्येक वेळ बसत. अर्थातच असे प्रसंग फारच थोडे.

मॅसिडोनच्या प्रांतांत १८८१ सालीं केमालचा जन्म झाला. त्यांचा पिता त्यांच्या लहानपणीं वारला, तेव्हां त्यांचें संगोपन चुलत्यानें केलें. चुलता आपल्या शेतीवाडीवर राहात असे. लिहिण्यावाचण्याचें कांहींसें शिक्षण घ्यावें आणि शेतांची राखण करावी, असा छोट्या केमालचा उद्योग असे. वाऱ्यावर डोलणाऱ्या पिकांवर धाड घालूं पाहणाऱ्या पक्ष्यांचे थवे छोटा केमाल आपल्या गोफणीनें गोलंदाजी करून उडवून देत असे. आपल्या देशाचें वैभव लुटीत राहिलेल्या परकीय उपटसुंभांना हा असाच पळवून लावील आणि—

**" तुझी कमाल मुस्तफा – कमाल शूरसैनिका ।**
**पिटून् काढिलें ग्रिका – अघोर देशतस्करा ॥**
**जुनाट राष्ट्रतारवा – सुधीर तूंचि नाखवा ।**
**बळें अचाट फोडिला – भुकेल शत्रुभोवरा ॥ "**

अशी प्रशंसा परकीय कवींनाहि गायला लावील असें त्यावेळीं

कोणाच्या स्वप्नांत तरी असेल काय?

शेतावरच्या कामांत केमालचें मन रमेना. जात्याच त्याला लष्करी शिक्षणाची आवड होती. गुप्त रीतीनें त्यानें परीक्षा देऊन लष्करी शाळेंत प्रवेश मिळविला आणि स्वारी तडक तिकडे गेली. जगांतील नामांकित रणधुरंधरांत दिसून येणारी गणित विषयाची आवड केमाल-मध्येंहि होती.

लष्करांत पहिल्यापासून केमाल चमकूं लागला. पुढें महायुद्धाचा वणवा पेटल्यावर तर त्याचे गुण चांगलेच निदर्शनास आले. वास्तविक तुर्कस्थाननें जर्मनीच्या बाजूनें दोस्त राष्ट्रांशीं लढावें ही कल्पना त्याला नापसंत होती. कारण जर्मनी काय आणि इंग्लंड काय दोघेहि परकेच. तुर्कस्थानच्या हिताची त्यांना कळकळ कोठून असणार? तेव्हां या परक्यांच्या वादांत आपण भाडोत्री म्हणून लढावयाचें आणि अखेर आपली हानि आणि दुसऱ्यांचें कल्याण! पण शिस्त आणि आपलें मत बाजूला ठेवून लढाईंत त्यानें भाग घेतला. वर वर्णिलेल्या अनाफार्टाच्या विजयानें त्याची कीर्ति चोंहोकडे पसरली. पुढें एकदां जर्मन बादशहा, हिंडेनबुर्ग, लुडेंडार्फ वगैरे जर्मन वीरमंडळाच्या भेटीला गेला असतां 'अनाफार्टाचा वीर केमाल' म्हणून जर्मनांनीं त्याचें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें. पण परकीयांकडून मिळणाऱ्या पुष्पमालांनीं केमालला मुळींच समाधान नव्हतें. युरोपियन लोकांचें आपल्या देशावर जें सावट पडलें आहे तें दूर झाल्याशिवाय तरणोपाय नाहीं हें केमालनें पूर्ण जाणलें होतें.

महायुद्ध झाल्यानंतर केमालची युद्धनीति व चातुर्य चांगलेंच कसोटीला लागलें. तुर्कस्थानच्या मुसलमान राज्याचा कलंक अखिल ख्रिस्ती युरोपाला नको असें सर्व गोऱ्या राष्ट्रांना मनापासून वाटत होतें. ग्रीस तुर्कस्थानावर प्रभुत्व मिळविण्याकरितां हपापलेला, तर इंग्लंडप्रभृति राष्ट्रांना काळ्या समुद्रांत मुक्तद्वार पाहिजे होतें. ग्रीसनें तुर्कस्थानावर

चढाई केली. इतरहि राष्ट्रांना आंतून बरेंच वाटलें. केमालनें सर्व सैन्यानिशीं आपल्या मातृभूमीचें संरक्षण करण्याचें ठरविलें. त्यानें ग्रीकांना अनेक बाजूंनीं गांठून असा बेदम चोप दिला कीं, त्यांना पळतां भुई थोडी झाली. सकेरीया येथें १९२१ च्या ऑगस्ट महिन्यांत ग्रीकांचा प्रचंड पराभव झाला. तुर्कांचा हर्ष गगनांत मावेना. केमाल तुर्कस्थानचा गाझी (विजयशाली) झाला. ग्रीकांनीं समुद्रमार्गानें पलायन केलें. **यश हारविलें तेथें किति शस्त्रें हार, कुंडलें, कटकें** ' अशी ग्रीकांची दुर्दशा झाली. युरोपियन राष्ट्रांना चांगला धडा मिळाला.

गाझी मुस्तफा केमाल पाशा मोठ्या विजयानंदानें परतले. पण बाहेरील शत्रूंपेक्षां अंतस्थ शत्रूंचा बंदोबस्त करण्याचें काम कठीण होतें. तुर्कस्थानांत राष्ट्रीय तेज व नवचैतन्य निर्माण करण्याकरितां त्यांनीं प्रचंड चळवळ सुरू केली होती. जुन्यापुराण्या खुळचट समजुती, अज्ञान, आळस, गुलामगिरीची वृत्ति इ० दुर्गुणांचा बीमोड केल्यावांचून तुर्कस्थानची प्राणप्रतिष्ठा होणें शक्य नाहीं हें केमालनीं जाणलें. ही गोष्ट होणें सुलतानशाही जाऊन लोकशाही आल्याशिवाय शक्य नव्हतें. केमाल म्हणजे तुर्कस्थानला देवस्वरूपच वाटे. त्यामुळें केमालच्या तोंडांतून निघणाऱ्या सामर्थ्यवान् विचारांनीं तुर्क लोक भारले गेले.

अखेर २८ ऑगस्ट १९२३ रोजीं पहाटे धुडुम् धुडुम् असे तोफांचे आवाज अंगोरा शहरीं ऐकूं येऊं लागले. अनेक शतकें खिळखिळी व टाकाऊ झालेली राजसत्ता लुप्त होऊन तुर्कस्थानांत लोकशाहीची द्वाही उत्साहानें फिरविली गेली. तुर्कस्थानाकडे तुच्छतेनें पहाणाऱ्या युरोपियन् राष्ट्रांनीं औपचारिकपणानें कां होईना, पण या नव्या प्रजासत्ताक तुर्की राज्याचें अभिनंदन केलें. या नव्या युगाचे सूत्रधार केमालपाशा बनले. तुर्कस्थानचा भाग्योदय म्हणजे आशिया खंडाच्या भाग्योदयाचें पूर्वचिन्ह होय. तुर्कस्थानांतली क्रांति आशियांतल्या राष्ट्रांना शुभ आणि स्फूर्तिदायक अशीच वाटली.

उत्कृष्ट व कीर्तिमान् सेनानी आणि प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष या नात्यानें केमालपाशांच्या हातांत अनिर्यंत्रित सत्ता आली; पण तिचा दुरुपयोग त्यांच्या हातून झाला नाहीं. नुसत्या कागदी ठरावांनीं वर्षानुवर्षें खितपत पडणारीं तत्त्वें त्यांनीं आपल्या हुकमतीनें थोड्याच अवधींत व्यवहारांत उतरून दाखविलीं. लोकशिक्षणाचा प्रसार, बहुपत्नीकत्वाला बंदी, सुधारलेल्या कायदेकानूंची अंमलबजावणी, राष्ट्रीय संस्थांतून भिक्षुकशाहीचें उच्चाटन इ० अनेक उत्तम गोष्टी त्यांनीं घडवून आणिल्या. त्यांनीं परदेशी स्वार्थसाधूंचें आणि जुन्या धर्मवेड्या लोकांचें शत्रुत्व संपादन केलें असलें तरी तुर्की लोकांची केमालवर अत्यंत श्रद्धा होती. नुकत्याच संपलेल्या महायुद्धाच्या आरंभींच केमाल इहलोक सोडून गेले. पण त्यांनीं आखून दिलेल्या शिस्तीमुळें तुर्कस्थान दोस्त व शत्रु यांच्या माऱ्यांतून बचावला. केमाल तुर्कांचा देव होता. तुर्कांच्या या पूजनाबद्दल उलट त्यांचे आभार मानतांना केमालपाशा नेहमीं सांगत—

**" माझ्या देशबांधवांनो, निश्चळ माझ्या मूर्तीकडे पाहून आनंद व्यक्त करूं नका. माझ्या ध्येयाशीं व कल्पनांशीं समरस होण्याचा प्रयत्न करा. माझें तुमच्यावरील प्रेम अढळ आहे. आपल्या परस्पर प्रेमांतच खरें सामर्थ्य आहे. नव्या युगांत आपला देश सर्वांत श्रेष्ठ आणि उन्नत झाला आहे. "**

****

# टोयोहिको कागावा : १२

जपानमध्यें गरिबांचा हितकर्ता म्हणून कोणतें नांव जर विचारलें, तर टोयोहिको कागावा हेंच नांव तुम्हांला कोणींहि सांगेल. जगाच्या



कल्याणासाठीं झटणारे महंत म्हणून त्यांची ख्याति आहे. पण साधुत्व हें एकांतिक वैशिष्ट्यच त्यांच्यांत आहे असें नाहीं, तर ते जपानचे अत्यंत आवडते लेखक आहेत. त्यांनीं रचलेल्या कवितांचीं पारायणें काव्यलोलुप आवडीनें करतात, त्यांच्या कादंबऱ्या लोक तन्मयतेनें वाचतात, आणि त्यांच्या निबंधांवर सुज्ञ सावधानपणें विचार करतात. सरकारवर त्यांचें वजन फार आहे. त्यांच्या शब्दाला मान देऊन जपान सरकारनें गरिबांकरितां चाळी बांधण्यास २० लाख रुपयांची मंजुरी दिली आहे! उच्च ध्येय ठेवून परंतु व्यवहारी दृष्टीनें विचार करून गरिबांकरितां झटणारा पुरुष म्हणून जपान आज त्यांना जें पूज्य मानतें तें सर्वथैव योग्य आहे.

टोयोहिको कागावा यांचा जन्म १८८८ सालीं झाला. त्यांचें घराणें खाऊनपिऊन सुखी असणाऱ्यांपैकीं होतें. त्यांच्या श्रीमंत चुलत्याच्या मनांतून त्यांना राजकारणाचें शिक्षण देऊन मुत्सद्दी बनवावयाचें होतें. नवव्या वर्षीं कागावा बौद्ध मठांत गेले आणि लौकरच भगवान् गौतमबुद्धाच्या थोर उपदेशांत ते तल्लीन झाले. नंतर इंग्रजी शिक्षणाकरितां त्यांनीं बायबलच्या वर्गांत नांव घातलें. या ठिकाणीं त्यांनीं ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा मनःपूर्वक अभ्यास केला. कागावा पुढें भूतदयाशील संत म्हणून प्रसिद्धीस आले, याचीं बीजें त्यांना मिळालेल्या बुद्ध व ख्रिस्त यांच्या शिकवणुकींत सांपडतील.

पुढें कागावा यांचें घराणें फारच खालावलें. त्यांच्या वडील भावाच्या दुर्वर्तनामुळें त्यांना वाईट दिवस आले. एका मिशनरी गृहस्थांनीं कागावा यांचा संभाळ करण्याचें ठरवून त्यांना आपल्या घरीं आणलें.

यामुळें तर कागावांना ख्रिस्ताच्या तत्त्वज्ञानाचा अगदीं दृढ परिचय झाला. आणि कागावा ख्रिस्ताची शिकवण निव्वळ पांडित्याकरितांच शिकले असें नाहीं, तर त्यांनीं ती प्रत्यक्ष आचरणांत आणली. मजुरांच्या झोपड्यांत प्रत्यक्ष जाऊन त्यांची स्थिति सुधारण्याकरितां त्यांनीं पडतील ते कष्ट सोसले. कांहीं दिवसांनीं ते अमेरिकेस गेले. तेथील विद्यालयांत त्यांचें तेज चांगलें पडूं लागलें होतें; परंतु अमेरिकेंतील सुखी व मान्यतेचें जीवन सोडून जपानी मजुरांची सेवा करण्याकरितां कागावा परत जपानला आले. गेलीं २०–२१ वर्षें याच कामीं ते देह झिजवीत आहेत. मजुरांच्या वस्तींत काम करून तेथें झालेल्या क्षयरोगाच्या संसर्गानें कागावांचें शरीर खंगलें आहे. एका मजुराच्या टीचभर झोपडींत अनेक दिवस काढीत असतां कागावांना खुपऱ्याची बाधा झाली आहे. त्यांचे डोळे कायमचेच अधू झाले आहेत. कित्येकदां तर सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साह्यावांचून त्यांना लिहितांवाचतां येणें अशक्य होतें. अशा स्थितींतहि त्यांचें वाचन जबर आहे. राजकारण, धर्म, अर्थशास्त्र या विषयांतील त्यांची विद्वत्ता दांडगी आहे; आणि ४०–५० पुस्तकें लिहून त्यांनीं जपानच्या आवडत्या लेखकांत अग्रस्थान मिळविलें आहे.

१९१० सालीं, कागावा यांनीं 'वासंतिका' नांवाच्या कामकरी मुलीशीं लग्न केलें. सौ. कागावा या आपल्या पतीप्रमाणेंच सार्वजनिक कामांत तत्पर असतात. ५० वर्षांपूर्वीं जपानांत स्त्रीसुधारणा मुळींच नव्हती. स्त्रियांचें जीवन गुलामासारखें असे, घटस्फोट पुष्कळ होत. अनेक वाईट चाली रूढ होत्या; पण सौ. कागावा यांनीं या कामीं बराच पुढाकार घेऊन आज स्त्रीजीवनांत पुष्कळच सुधारणा घडवून आणली आहे.

कागावांनीं शेतकऱ्यांची संघटना करण्यांत पुढाकार घेतला आहे. 'राष्ट्रीय किसान मंडळ' निर्माण होण्यास त्यांचेच श्रम कारणीभूत

झाले. मजूरपक्ष स्थापून निवडणुकी लढविण्यांत कागावांनीं त्यांना बहुमोल मदत केली. परंतु ते स्वतः मात्र 'उपकारापुरते' च उरले आहेत. कारण कोणत्याही पक्षांत अथवा सरकारदरबारीं मानाची जागा घेण्याची त्यांची इच्छा नाहीं.

कागावा हे शांतिदूत आहेत. समाजसत्तावादांतलें समतेचें तत्त्व त्यांना पूर्ण मान्य आहे. परंतु ते क्रांति व अत्याचार यांचे कट्टे विरोधक आहेत. दया, शुचिता, युद्धविनाश आणि सेवा हीं चार तत्त्वें त्यांना बुद्धख्रिस्तादिकांच्या चरित्रांपासून मिळालीं. आणि तीं शिकवून भौतिकवादी होत चाललेल्या जपानचें आत्मिक जीवन उच्च करण्याचा कागावांनीं प्रयत्न केला. त्याकामीं आपली सर्व प्रतिभा त्यांनीं खर्च केली आहे. कागावांना 'जपानचे टॉलस्टॉय' असें म्हणण्यांत येतें तें उचित नाहीं असें कोण म्हणेल ?

****

# जॉर्ज बर्नार्ड शॉ : १२

" चंचलते तुझें नांव स्त्री आहे, " असें शेक्सपीअरनें म्हटलें आहे. त्याचेंच अनुकरण करून " विक्षिप्त वर्तना, तुझें नांव बर्नार्ड शॉ आहे. " असें म्हणतां येईल. शॉ म्हटलें कीं स्पष्टवक्तेपणा, तऱ्हेवाईक वृत्ति, आणि जगावेगळी अजब वागणूक ह्या गोष्टी डोळ्यांसमोर उभ्या राहतात. ता. ८ जानेवारी १९३३ रोजीं पृथ्वीप्रदक्षिणेस निघालेली 'एम्प्रेस ऑफ ब्रिटन' बोट शॉना घेऊन मुंबई बंदरांत आली. तेथें तिचा मुक्काम ८ दिवस होता. इतर उतारू हिंदुस्थानांतील नामांकित स्थळें पाहण्यास निघून गेले. पण शॉची स्वारी बोटीवरच बसली. वर्तमानपत्रांना मुलाखती दिल्या त्या चमत्कारिकच. " तुमचा जाच

संपला म्हणजे तुमच्यावद्दल कोणी काळजी करणार नाहीं." "शस्त्रसंन्यास वगैरे बाबी झूट आहेत. तुम्हीं लोकांच्या हातांतलीं शस्त्रें काढून घेतलीं तर ते मुष्टियुद्ध खेळतील." "जे लोक अधिक प्राण-संहार करतात त्यांनाच तुम्ही मानतां." शॉंचीं उत्तरें अशीं बेछूट होतीं. त्यांनीं कोणाचीं आमंत्रणें बहुधा स्वीकारलीं नाहींत. फक्त ते एकदोन ठिकाणीं गेले. त्यांतहि एका ठिकाणीं त्यांच्या सन्मानार्थ नाचगाणें चालल असतां स्वारीनें आपली वेळ होतांच मोटार गांठली. "बरें येतों, नमस्कार." म्हणून कोणाचा निरोप घेतला नाहीं कीं कांहीं नाहीं !



शॉंच्या विक्षिप्तपणाच्या अनेक मजेदार गोष्टी युरोपभर प्रसिद्ध आहेत.

अशा या अजब व्यक्तीचा जन्म आयर्लंडमध्यें डब्लिन येथें सन १८५६ सालीं झाला. घरची स्थिति हलाखीची होती. शॉंची बुद्धि अत्यंत प्रखर असल्यानें शाळेच्या चार भिंतींत स्वस्थ बसून राहणें त्यांना आवडेना. शाळेंत त्यांचें शिक्षण विशेष झालेंच नाहीं. प्रसिद्ध इंग्रजी नाटककार शेक्सपीयर यालाहि शिक्षणाचा फारसा लाभ झाला नव्हता. म्हणून "शाळेच्या बाबतींत मी दुसरा शेक्सपीयर आहें." असें शॉंनीं म्हटलें आहे. असो. वयाच्या १५ व्या वर्षीं एका कंत्राट-दाराकडे नोकरी करण्याची शॉंवर पाळी आली. तेथें त्यांचें जमलें नाहीं. मग पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याकरितां ते लंडनला आले. तेथें त्यांच्या आईनें एक गायनशाळा काढली होती. तथापि तेवढ्यावर सर्व कुटुंबाचा निर्वाह होत नसे. म्हणून शॉंनीं एका विजेच्या कंपनींत नोकरी धरली. पण लौकरच तीहि सोडावी लागली. आज जगद्विख्यात

झालेला हा नाटककार ऐन तारुण्याच्या तोंडीं बेकार स्थितींत लंडनभर भटकत होता. पैशाच्या अपेक्षेनें त्यांनीं वर्तमानपत्रांकडे अनेक लेख पाठविले. पंण ते सर्व परत आले. एक नाटक लिहिलें तेंहि अपेशी ठरलें. नाहीं म्हणायला एका औषधाची जाहिरात तयार करून देण्या-बद्दल शॉंना पांच पौंड मुशाहिरा मिळाला. तोंपर्यंत वाङ्मयावर एवढी कमाई आपण कधींच केली नव्हती असें शॉ सांगत !

पुढें इंग्लंडमध्यें नवीन विचारांची लाट उत्पन्न झाली. समाजांत समता असावी, उच्चनीच, श्रीमंत–गरीब हा भेद नसावा असें सांगणारा ' सोशॅलिझम् ' चा पंथ निर्माण झाला. या विषयावर शॉंचा अभ्यास होता. त्यांनीं त्यासंबंधीं दोन लेख प्रसिद्ध केले. त्याबरोबर विचारवंत लेखक म्हणून त्यांची प्रसिद्धी झाली. याचवेळीं डॉ. ॲनी बेझंट यांनीं एक वर्तमानपत्र काढलें होतें. त्यांत शॉ लिहूं लागले आणि त्या लेखनाचा त्यांना भरपूर मोबदलाहि मिळाला. समाजसत्तावादाला एवढा तेजस्वी प्रचारक लाभल्याबद्दल त्यावेळच्या समाजसत्तावाद्यांना आनंद झाला व त्यांनीं शॉंना आपल्या " फेबियन् " सोसायटींत घेतलें.

यानंतरच्या काळांत म्हणजे गेल्या ३५–४० वर्षांत शॉ प्रामुख्यानें जगापुढें होते. स्वीडन देशांतील नामांकित नाट्याचार्य इब्सेन यावर प्रसंशापर टीकाग्रंथ प्रसिद्ध करून ते नाट्यवाङ्मयाकडे वळले आणि १८९३ सालीं ' वुइडोअर्स हाऊसेस ' हें आपलें पहिलें नाटक त्यांनीं प्रसिद्ध केलें. एकादा बॉंब गोळा पडावा तद्वत् ह्या नाटकानें समाजांत प्रलय मांडला. तेव्हांपासून त्यांनीं अनेक नाटकें लिहिलीं. विकासवाद ( मॅन अँड सुपरमॅन ), शिक्षण ( मिस्‌अलायन्स ), धंद्यांतील दांभिकपणा ( डॉक्टर्स डायलेमा ), खिस्ती धर्म ( अँड्रोक्लीस अँड दी लायन ), राजसत्ता व लोकसत्ता ( ॲपल कार्ट ) इ० समाजाच्या व राष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या अनेक प्रश्नांवर त्यांनीं नाट्यरचना केली. कित्येक

नाटकांना दीडदीडशें पानांच्या विस्तृत, भरीव आणि मूलग्राही प्रस्तावना लिहून आपल्या प्रतिभातेजानें त्यांनीं कित्येक संदिग्ध गोष्टींवर प्रकाश पाडला आहे. इतक्या तेजस्वी ( Brilliant ) विचाराचा लेखक पृथ्वीवर दुसरा कोणी अलीकडे झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. कांहीं वर्षांपूर्वीं अद्वितीय असें 'नोबेल' पारितोषिक त्यांना मिळालें. २ नोव्हें. १९५० रोजीं हा महापुरुष स्वर्गस्थ झाला.

मृत्युसमयीं शॉ ९४ वर्षांचे होते. पण त्यांची तडफ एखाद्या जवानाप्रमाणें होता. त्यांच्या बुद्धीचें तेज यत्किंचितहि कमी झालेलें नव्हतें. एकादा कुशल धनुर्धारी प्रतिस्पर्ध्याच्या बाणांचे वरचेवर तुकडे करतो तसे शॉ प्रतिपक्षाच्या टीकेची व प्रतिनिधींच्या खोचदार प्रश्नांची दशा करून टाकीत. ते फार कर्मठ होते. मादक पेयें व मांस यांना ते स्पर्श करीत नसत. त्यांच्या वागणुकींत नखरा नसे, ढोंगीपणा नसे, कीं शिष्टपणा नसे. अत्यंत विशाल कपाळ, पांढरी शुभ्र दाढी, चमकदार डोळे, प्रतिभेनें विलसणारें मुखमंडळ यायोगें ते एकाद्या साधूसारखे दिसत आणि साधी राहाणी, निःस्पृहता, निर्भयता, विद्वत्ता, आणि तपस्या या दृष्टींनीं विचार केला तर त्यांची गणना साधुकोटींत करण्यास कांहींच हरकत नाहीं.

बुद्धि ही शॉंची प्रेरक शक्ति होती. एका इंग्लिश चित्रकारानें 'शॉ डोक्यानें चालतात' असें त्यांचें हास्यचित्र काढलें आहे तें याच दृष्टीनें. सामान्य माणसांना शॉंचे विचार म्हणजे एक कोडें वाटतें. साम्राज्य-वादी लोकांना शॉ आपले शत्रु वाटत, शिष्टांना त्यांच्या लेखनाचा दर्प असह्य होई आणि रूढीचे दास शॉंना 'मूर्तिभंजक' समजत आणि यांतच शॉंचें मोठेंपण आहे. जगांत भरलेलें दुःख व दारिद्र्य यांचें निदान करून शॉंनीं जनतेच्या एकंदर ढोंगीपणावर व दोषांवर कोरडे उडविले आहेत. पण हे कोरडे उडवितांना देखील जनतेला आनंदित

करण्याचें पुण्य त्यांनीं संपादिलें आहे. [ ..he has made us merry in spite of our stripes–A. G. Gardiner ] कारण त्यांच्या टीकेंत निस्वार्थीपणा व कळकळ भरपूर आहे. लोकशाहीचे ते चाहते होते. पण आज जी नामधारी लोकशाही दिसते तिचे मात्र नव्हते. मग वेळेस मुसोलिनीची सोटेशाही बरी असेंहि ते प्रतिपादीत. " दारिद्र्य हें पापाचें मूळ आहे. " असें शॉ म्हणत; म्हणजे ते श्रीमंतांचे चहाते होते असें नाहीं. ' मेजर बार्बारा ' हें हृदयद्रावक नाटक लिहून दारिद्र्याची कहाणी त्यांनीं जगापुढें मांडली आहे. त्यांचें म्हणणें एवढेंच कीं, अनीति जगांत आहे, म्हणून नीतीचीं प्रवचनें झोडूं नका; तर दारिद्र्य नाहींसें करा. सारांश, त्यांच्या लेखनाचें सूक्ष्म अध्ययन केलें तर विरोधाभास, मग्रूरी, विक्षिप्तपणा इ. दोष दूर होऊन आंत वहात असलेले सहानुभूतीचे व धर्मशीलतेचे निर्मळ निर्झर वाचकांना दिसतील.

शॉंना स्वत:बद्दल मोठी घमेंड होती असा एक गैरसमज आहे. आणि वेळीं अवेळीं साऱ्या जगाला व शेक्सपीयरसारख्या जगवंद्य नाटककाराला त्यांनीं तुच्छ लेखल्यामुळें हा गैरसमज चांगलाच बळावला आहे. पण शॉंच्या विश्वासांतलीं माणसें अगदीं उलट म्हणतात. आपली वास्तविक योग्यता किती आहे याचें यथार्थ ज्ञान शॉंना होतें. फक्त दांभिक विनयाचें पांघरून घेऊन आपणांला हीन गणण्याचा शिष्टाचार शॉ पाळीत नव्हते. थोर व्यक्तीबद्दल शॉ नेहमींच आदर दाखवीत. आपला स्फूर्तिदाता ' इब्सेन ' याबद्दल त्यांना फार आदर होता. रशियानें चालविलेल्या प्रचंड प्रयोगाची मनमुराद स्तुति शॉंनीं केली होती. वड्या लोकांचा संपर्क टाळणारे शॉ महात्मा गांधींना लंडनमध्यें आपण होऊन भेटावयास गेले आणि मागें मुंबईस 'युगकर्ता' म्हणून महात्माजींचा त्यांनीं गौरव केला.

शॉंच्याइतकीं तेजस्वी व क्रांतिकारक माणसें आपल्या काळांत अप्रिय होणें अपरिहार्य असतें. परंतु तत्कालीन वादाचा धुरळा खालीं बसला

म्हणजे शॉंचें लेखन आणि विशेषतः त्यांचें तेजस्वी व्यक्तित्व हा जगाच्या चिरकालीन आदराचा विषय होऊन बसेल.

****

# रॉबर्ट बेडन पॉवेल : १४

समरांगणांतले वीर आणि शांतीचे प्रेषित यांच्या भूमिकाच भिन्न आहेत. बुद्ध, येशू, महावीर, टॉलस्टॉय किंवा महात्मा गांधी हा दयानिधींचा वर्ग आणि शिकंदर, नेपोलियन्, कैसर इ० रणगार्जीचा वर्ग या दोन वर्गांत कोणतें समानधर्मत्व आहे? कोणतेंच नाहीं. तथापि रणांतील बहादुरीबरोबर शांततावादाची कामगिरी करणारे महात्मे या जगांत वेळोवेळीं उत्पन्न झाले आहेत, नाहींत असें नाहीं. आज जगांत लोकप्रिय झालेल्या बालवीर संस्थेचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल हे अशा महात्म्यांपैकीं एक होत.



बेडन पॉवेल यांचा जन्म १८५७ च्या फेब्रुवारींत लंडन येथें झाला. त्यांची माता फार सुशील होती. त्यांचे वडील हे एक धार्मिक वृत्तीचे नामांकित अध्यापक गणले जात. तथापि वडिलांप्रमाणें ग्रंथपरिशीलनांत अथवा विश्वविद्यालयीन कार्यांत बेडन पॉवेल नांव मिळवितील असा अंदाज कोणी बांधला असता तर तो मात्र चुकला असता. आणि याचीं चिन्हेंहि त्यावेळीं स्पष्ट दिसत होतीं. 'चार्टर' शाळेंत असतांना खेळ, अभिनय, चित्रकला, गप्पागोष्टी अशा चौफेर जीवनांत नांवाजला

जाणारा बेडन पॉवेल अभ्यासांत यथातथाच होता. इतकेंच काय, पण प्रवेशपरीक्षेंतील कच्च्या तयारीवरून ऑक्सफोर्ड येथील प्रख्यात कॉलेजांत त्याला प्रवेश मिळणें अशक्य झालें आणि प्रसिद्ध विद्वान् होऊं पहाणाऱ्या बेडन पॉवेलला खांद्यावर बंदूक टाकून नोकरीकरितां हिंदुस्तानचा रस्ता धरावा लागला. बाकी हें अपेश म्हणजे भावि यशाचें प्रसादचिन्हच होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण कॉलेजमध्यें प्रवेश मिळाला असता तर बेडन पॉवेलचें कर्तृत्व ऑक्सफोर्डच्या विश्वविद्यालयापुरतें मर्यादित होऊन आजपर्यंत आंतरराष्ट्रीय उपयुक्ततेचें जें भरीव काम त्यांच्या हातून झालें तें झालें नसतें. असो. पुढें १९२३ सालीं ऑक्सफोर्ड विद्यामंदिरानें एका कालीं उच्च शिक्षणास अपात्र ठरविलेल्या या विद्यार्थ्याला सन्मानाची पदवी देऊन आपण केलेल्या चुकीचें परिमार्जन केलें.

हिंदुस्थानांतील सैन्यांत बेडन पॉवेल फारच लोकप्रिय झाले. ते अत्यंत काटकसरीनें राहत. चैन करणें त्यांना माहीत नव्हतें. पण त्यांचा भिडस्त स्वभाव आणि लोकप्रियता यांयोगें त्यांना इच्छा नसतां खर्च करावा लागे. पुढें हिंदुस्थानची हवा त्यांना मानवेना. कामाच्या दगदगीनें त्यांची तब्येत ढासळली, म्हणून ते रजा घेऊन विलायतेला आले.

पुढें त्यांना आफ्रिकेंत जावें लागलें. तेथें स्वाऱ्या-शिकारींत त्यांनीं धडाडीनें भाग घेतला. एकदां एक झुलू आपल्या जखमी मुलीला रात्रीचा घेऊन चालला होता. बेडन पॉवेलना त्या मुलीची स्थिति पाहवेना. त्यांनीं तिला खोलींत आणलें, तिची शुश्रूषा केली; इतकेंच नव्हें तर कडक थंडींत आपल्या अंगावरचा बहुमोल झगा तिच्या अंगावर घातला. काळागोरा हा वर्णभेद आफ्रिकेंत किती सूक्ष्मपणें पाळतात हें ज्यांना ठाऊक आहे, त्यांना बेडन पॉवेलच्या या कृत्याचें सादर कौतुक वाटेल! माल्टा व पूर्व आफ्रिका येथील बेडन पॉवेलची कामगिरी ब्रिटिश सरकारला फार पसंत पडली. त्यामुळें एकामागून एक

वढतीचे हुद्दे त्यांना मिळत गेले.

पण बोअर युद्धांत १८९९ सालीं मेफकिंग नामक ठाण्याचा वेढा उठविण्यांत बेडन पॉवेलनीं जी मर्दुमकी गाजविली ती अगदीं बिनतोड होती. हें मेफकिंगचें रणकंदन सात महिने चाललें होतें. यांत बेडन पॉवेलनीं प्रचंड विजय मिळविला. ब्रिटिश लोकांचे ते कंठमणि झाले. आपल्या नूतन अपत्यास बेडन पॉवेलचें नांव देण्यापर्यंत कित्येक ब्रिटिश कुटुंबांच्या विभूतिपूजेची मजल गेली.

तथापि बेडन पॉवेल यांचें खरें जीवनकार्य त्यांच्या जीवनाला अर्धशतक पुरें झाल्यावर म्हणजे १९०७ सालीं सुरू झालें. निरनिराळ्या युद्धांचे प्रसंगीं लोकोपयोगी कामाची व शिस्तीची एक विशिष्ट पद्धति वसवून अशा तऱ्हेचें शिक्षण ते हाताखालच्या सैनिकांना देत. ही पद्धति मुलांनाहि उपयुक्त होईल असें वाटून त्यांनीं ब्राऊनसी परगण्यांत डॉरसेट या गांवीं पहिल्या बालवीर पथकाची स्थापना केली. त्यानंतर युरोप, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, हिंदुस्थान, इजिप्त इ. जगांतील बहुतेक प्रमुख देशांत हिंडून बेडन पॉवेलनीं व्याख्यानें दिलीं, स्काऊटचीं पथकें स्थापलीं, तसेंच त्या विषयावरील पुस्तकें प्रसिद्ध करून सर्व जनतेला त्या चळवळीचें रहस्य समजावून दिलें.

बालवीरांचें पहिलें आंतर्राष्ट्रीय संमेलन १९२७ सालीं भरलें. त्यांत २७ राष्ट्रांनीं भाग घेतला होता. बालवीरांच्या चळवळीची व्याप्ति अधिकाधिक वाढविण्याकरितां बालकवीर ( Wolf-cubs ), वीरबाला ( Girl-guides ), प्रौढवीर ( Rver-Sceouts ), अशा तीन शाखा काढल्या. शैशवापासून यौवनापर्यंत सारी पिढी जोमदार, लोकहिततत्पर, कार्यक्षम व ध्येयवादी निपजावी याकरितां अंतर्राष्ट्रीय भूमिकेवरून एवढा मोठा प्रयत्न केल्याचें उदाहरण इतिहासांत दुसरें नाहीं !

लॉर्ड बेडन पॉवेलचा उत्साह अखेरपर्यंत कायम होता. ध्येयवादी माणसांना आपलें ध्येय सिद्धीस गेलेलें पाहण्याचें भाग्य दुर्मिळच असतें.

पण तें दुर्मिळ भाग्य लॉर्ड साहेबांना लाभलें. लोकसेवा हीच ईश्वरसेवा असा संदेश जगाच्या आरंभापासून आजवर अनेक महात्मे सांगत आले आहेत. ह्या ईश्वरसेवेचीं बीजें भावी नागरिकांच्या म्हणजेच आजच्या बालकांच्या संस्कारक्षम अंतःकरणांत पेरलीं गेलीं तर केवढें तरी कार्य होईल. लोकहिताची धूळधाण करणारे युद्धप्रसंग टळतील आणि शांततेचें साम्राज्य सुरू होईल. या दृष्टीनेंच १९२७ सालीं भरलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय–बालवीर–संमेलनाचे प्रसंगीं लॉर्ड रिडेल म्हणाले कीं, " आजवर मीं पाहिलेल्या जागतिक शांतता-परिषदेंत ही शांततापरिषद् मला सर्वांत अधिक आशादायक वाटते." बालवीर चळवळीच्या मुळाशीं असलेल्या ह्या उदात्त हेतूमुळेंच तिला राजाश्रय व लोकाश्रय मिळाला आणि राजकीय बाबतींत परस्परविरुद्ध असलेल्या या राष्ट्रांनीं चळवळीचे कामीं सहकार्य करण्याची तयारी दाखविली. हिंदुस्थानसंबंधीं कांहीं अनुदार उद्गार काढल्यामुळें लॉर्ड पॉवेल हिंदुस्थानांत अखेर अप्रिय झाले. आणि हिंदुस्थानांतील स्वाभिमानी बालवीर संस्थांनीं पॉवेलच्या मूळ संस्थांचा संबंध तोडला. पण एवढा कलंक सोडला, तर, युद्धांतील महारथी व शांततेचा प्रणेता या दोनहि भूमिका बेडन पॉवेलनीं उत्कृष्ट रीतीनें पार पाडल्या याबद्दल इतिहास त्यांचा सदैव गौरव करील. त्यांचा मृत्यु १९४१ सालांत झाला.

****

# इमान डी व्हॅलेरा : १५

जगांत आपण ध्येयें कितीहि उच्च ठेविलीं तरी व्यवहारांत तडजोड करण्याची पाळी येतेच, किंबहुना आपलीं ध्येयें साध्य होण्याचें साधन



म्हणूनच तडजोडीचा उपयोग करावा लागतो. पण याचा अर्थ तडजोड हेंच उच्च ध्येय आहे असा मुळींच नाहीं. मानस-सरोवराकडे जाणारे हंस विसाव्यासाठीं लहान लहान डोंगरांच्या शिखरांवर बसतात. पण त्यांच्या डोळ्यांपुढें हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें असतात. तिकडे जाण्याचा प्रयत्न त्यांचा सारखा सुरू असतो. म्हणूनच त्यांचें माहात्म्य कवींनीं गाइलेलें आहे. उच्च ध्येय गांठण्याची महत्त्वाकांक्षा चित्तांत बाळगून त्यासाठीं सदैव झगडत, कधीं विरोध तर कधीं तडजोड करीत जे राष्ट्रपुरुष परोपकारार्थ खपत आले त्यांत आयर्लंडच्या प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष इमान डी व्हॅलेरा हे एक होत.

इमान यांचा जन्म १८८२ सालीं झाला, म्हणजे ते आज ७६ वर्षांचे आहेत. पाश्चात्य देशांतील परिस्थितीप्रमाणें ते अद्यापि तरुणच आहेत. परंतु देशासाठीं अनेक आपत्ति, शारीरिक व मानसिक त्रास आणि खडतर वनवास सहन केल्यानें त्यांचा अत्यंत सुंदर चेहरा पीडित दिसतो. तथापि सहा फुटांवर उंची, भक्कम बांधा, विशेषतः शौर्याचें, करारीपणाचें व बुद्धिमत्तेचें तेज त्यांच्या चेहऱ्यावर झळकत असल्यानें त्यांच्या दर्शनाचा माणसाच्या मनावर फार परिणाम होतो. त्यांच्या रुबाबदार व्यक्तित्वावर मोहित झालेला एक अमेरिकन गृहस्थ म्हणाला कीं, "असे अवर्णनीय डोळे मीं कधींच पाहिले नाहींत. साधेपणा, प्रेमळपणा आणि अंतःकरणाचा मोकळेपणा यांचा तो मूर्तिमंत पुतळा आहे."

डी व्हॅलेरा यांचा जन्म अमेरिकेंत झाला, परंतु त्यांचे वडील वारल्यामुळें त्यांच्या आईनें आपल्या भावाबरोबर व्हॅलेरांना आयर्लंडांत पाठविलें. व्हॅलेरांचा मामा प्रेमळ व जाणता पुरुष होता. छोटा इमान

हा थोर पुरुष होणार आहे असें त्याला वाटे. आणि म्हणून आपली सांपत्तिक स्थिति फारशी चांगली नसतांनाहि इमानला उच्च शिक्षण द्यावयाचा त्यानें निश्चय केला. इमाननेंहि मामांच्या खार्थत्यागाचें चीज केलें. बी. ए., बी. एस्‌सी. होऊन व्हॅलेरा हे प्रोफेसर झाले. गणित हा जरी त्यांचा मुख्य विषय असला तरी अनेक भाषांचें ज्ञान त्यांनीं संपादन केलें होतें. साहसाचीं वर्णनें असलेल्या फ्रेंच कादंबऱ्या त्यांना फार आवडत. आपणाला एखादें पुस्तक आवडलें कीं, त्यावरील विचार ते निबंधरूपानें लिहून काढीत. धार्मिक प्रवचनें श्रद्धेनें ऐकण्याची त्यांना फार आवड असे. अशा रीतीनें आपली मूळची सुंदर मनोभूमिका नांगरून व तिची योग्य मशागत करून इमान डी व्हॅलेरा यांनीं तींत सुविचारबीजांची पेरणी केली; आणि लवकरच तीं बीजें वाढीस लागून, त्यांचा सुंदर मळा व्हॅलेरांच्या पुढील उदात्त जीवनाच्या रूपानें डोलूं लागला.

व्हॅलेरांना राजकारणाची स्फूर्ति रॉजर केसमेंट या आयरिश हुतात्म्यापासून मिळाली. ‘ गॅलिक लीग ’ ही वाङ्मयसंस्था त्या वेळीं आयर्लंडांत उदयास आली होती. आयर्लंडची मातृभाषा लोकप्रिय व्हावी याकरितां ह्या संस्थेचा उदय झाला होता. डी व्हॅलेरा हे या संस्थेचे उत्साही सभासद होते. जन्मभूमीप्रमाणेंच मातृभाषेबद्दल व्हॅलेरांचें प्रेम उत्कट होतें. एके प्रसंगीं त्यांनीं म्हटलें आहे--

“ स्वभाषा किंवा स्वातंत्र्य यांपैकीं एकच गोष्ट मला उचलण्यास सांगितली तर मी स्वभाषाच उचलीन. आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य आज ना उद्यां परत मिळेल. पण स्वभाषेची गोष्ट तशी नाहीं. तिचें संरक्षण आज आपणच केलें पाहिजे. ”

‘ गॅलिक लीग ’ या वाङ्मयसंस्थेंतून आयरिश स्वातंत्र्याची चळवळ निघाली. डी व्हॅलेरा यांनीं अमेरिकेंत जाऊन आयरिश स्वातंत्र्याबद्दल प्रचंड सहानुभूति उत्पन्न केली व चळवळीकरितां लाखों रुपये मिळविले.

महायुद्धानंतर इंग्लंडनें आयर्लंडला देऊं केलेलें वसाहतीचें स्वराज्य डी व्हॅलेरा यांना मुळींच मान्य नव्हतें. त्यांना इंग्लंडचा समान दर्जा पाहिजे होता. त्याकरितां त्यांनीं आटोकाट प्रयत्न केला. ग्रिफिथ, कॉलिन्स इ. आयरिश देशभक्तांनीं इंग्लंडशीं समेट केला; पण व्हॅलेरा हे मात्र तत्त्व-निष्ठेस सोडीनात. आपलें ध्येय साध्य होण्यासाठीं त्यांनीं लोकमत तयार करण्याची शिकस्त केली. कारागृहवास, वनवास, अज्ञातवास आणि परदेशवास हे सर्व प्रसंग त्यांच्यावर आले. यांनीं जर्मनीशीं कट केला, कॉलिन्ससारख्या नररत्नाच्या खुनास हेच कारण झाले, इ० हिडीस अपवादहि त्यांच्याबद्दल पसरले. पण या सर्व अग्निदिव्यांतून सीते-प्रमाणें त्यांची जीवनमूर्ति शुद्धतर व अधिक तेजस्वी होऊन बाहेर पडली आहे.

आपल्या विघातक मार्गाची निष्फलता पटल्यानंतर डी व्हॅलेरांनीं तो सोडून दिला आणि ते विधायक कार्याला लागले. असें सांगतात कीं, कै. दे. भ. विठ्ठलभाई यांनीं डी व्हॅलेरांना विधायक कार्यक्रम स्वीकारून देशाचीं सूत्रें हातीं घ्यावीं असा उपदेश केला होता. ही गोष्ट खरी असेल, तर ती हिंदुस्थानला अभिमानास्पद वाटेल. असो. कोणाच्याहि उपदेशानें कां होईना, डी व्हॅलेरांनीं आपला अज्ञातवास सोडला आणि ते प्रकट होऊन देशाच्या राजकारणांत पुढाकार घेऊं लागले. आयरिश जनतेनें त्यांचें उत्साहानें स्वागत केलें. आयर्लंडच्या प्रजासत्ताक राज्याचे ते सर्वाधिकारी झाले. लवकरच राष्ट्रसंघाचें अध्यक्षपदहि त्यांना एक वर्षभर मिळालें.

आयरिश फ्री स्टेटचे अध्यक्ष झाल्यापासून देखील ब्रिटिश सरकारशीं डी व्हॅलेरांचे खटके कमी झाले असें नाहीं. स्वदेशांतील इंग्लिश लोक यांना परकी लेखणार, ब्रिटिश साम्राज्याला हें प्रस्त डोईजडच वाटायचें. स्वाभिमानानें वागतांना देशाला जी झीज सोसावी लागते तिच्या जोडीला जागतिक मंदीहि आल्यानें देशांत हलाखी व लोक थोडेसें

नाराज अशा स्थितींत डी व्हॅलेरांचें सर्वाधिकारित्व किती कंटकमय होतें याची सहज कल्पना होईल. जागतिक युद्धांत आपल्या देशावर भयंकर अन्याय झाला आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांनीं तटस्थता स्वीकारली व त्यासाठीं सामर्थ्यवान दोस्तराष्ट्रांच्या नाराजीस धैर्यानें तोंड दिलें. पण ते खंबीर आहेत. ते सरकार-प्रमुख म्हणून लोकसभेंत नसले तरी आयरिश जनतेच्या हृदयांत तेच अभिषिक्त नेते आहेत. ध्येयाच्या ध्रुवताऱ्याकडे लक्ष देऊन ते आपली राष्ट्रनौका प्रचंड वादळांतून हाकारीत आहेत. श्रद्धा, बुद्धि, विद्वत्ता, शौर्य, आत्मविश्वास, त्याग यांपैकीं कशाचीच उणीव त्यांच्यापाशीं नाहीं. त्यांना केव्हांहि यश येवो असेंच जगांतील बहुजनसमाज चिंतील.

****

## रोमां रोलां : १६

" महर्षि टॉलस्टॉयनंतर युरोपखंडांतील सर्वांत श्रेष्ठ ख्रिस्ती गृहस्थ " असें म. गांधीजींनीं ज्यांचें वर्णन केलें ते फ्रेंच तत्त्वज्ञानी मॉशर रोमां रोलां हे खरोखर आधुनिक काळांतील एक मुनि होत. जगांतील श्रेष्ठ पुरुषांत त्यांची गणना होत असली आणि त्यांच्या सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें अनेक भाषांतून झालेलीं तरी असलीं त्यांचें एकंदर जीवन अत्यंत शांत व एकांतवासांतलें होतें. युरोपखंडांत १९१४ सालीं लढाई सुरू झाली, त्यावेळीं ह्या कोमलहृदयी शांततावाद्याला मनस्वी वाईट वाटलें. निरनिराळ्या देशांच्या रक्तांत भिनलेला साम्राज्यमद आणि राष्ट्राभिमान



हा असा अघोररूपी व्हावा आणि युरोपची व पर्यायानें जगाची त्यांत दुर्दशा व्हावी हें सर्वथैव अनिष्ट आहे; म्हणून रोमां रोलांनीं युद्धविरोधी पत्रकें प्रसिद्ध करून मोठी खळबळ उडवून दिली. त्याकाळीं युद्धाच्या विरुद्ध बोलावयाचें म्हणजे साऱ्या युरोपियन जनतेचे शिव्याशाप आपणांवर ओढवून घेण्यासारखें होतें; आणि तसें झालेंहि. पण हा जनतेचा रोष सहन करून रोमां रोलांनीं आपला शांतिपाठ अखंड चालू ठेविला. जर्मन–द्वेषानें सारें फ्रान्स भारावून गेलें असतां जर्मन संस्कृति व जर्मनांचें श्रेष्ठत्व याबद्दलचे आपले विचार रोमां रोलांनीं उघड बोलून दाखविले. व्हर्सेलिसच्या तहाचे वेळीं रोमां रोलांनीं उच्चरवानें बजाविलें कीं, " जयाच्या मदानें धुंद होऊन भलभलते करार जित राष्ट्रावर लादूं नका. ते परिणामीं जगाच्या शांततेस विघातक ठरतील. " आज त्यानंतर दोन तपें उलटलीं आहेत. रोमां रोलांनीं दिलेला इषारा ज्या चढेल मुत्सद्यांनीं झुगारून दिला त्यांना आज पश्चात्ताप करण्याची पाळी आली आहे.

तथापि युद्धाच्या काळीं शांततावादी म्हणून प्रचारकार्य करण्यांत आणि नंतर रेडक्रॉस सोसायटीच्या चळवळींत जें कार्य रोमां रोलांनीं केलें, तेवढेंच जगाच्या डोळ्यांत भरेल असें त्यांचें सार्वजनिक जीवन. उन्हाळ्यांत स्वित्सर्लंडमधील प्रशांत व रमणीय सरोवराच्या कांठीं जाऊन राहणें आणि बाकी सर्व वर्षभर फ्रान्समध्यें लेखन, वाचन, चिंतन, निदिध्यास इ. तपस्येंत घालविणें हाच कार्यक्रम बहुधा रोमां रोलांनीं जन्मभर आचरिला.

२० जानेवारी १८६६ या सालीं रोमां रोलां यांचा जन्म एका घरंदाज मध्यम स्थितीच्या घराण्यांत झाला. त्यांच्या आईनें त्यांना पेटी वाजविण्यास शिकविलें होतें. प्रकृतीनें अशक्त असूनहि ते आनंदी असत. गाण्यावजावण्याचा शोक त्यांना लहानपणींच लागला. सुप्रसिद्ध संगीतसम्राट बेथोव्हिन व महाकवि शेक्सपीअर हे त्यांचे जिवलग होऊन

वसले. बेथोव्हिनच्या संगीतांत तल्लीन व्हावें आणि शेक्सपीयरचीं नाटकें पुनः पुनः वाचावींत हा त्यांचा नित्यक्रम असे. प्राथमिक शिक्षण घेऊं लागल्यानंतर त्यांचें काव्य व संगीत अखंड चालू होतें. इतक्यांत "आपण पुढें काय करावें ?" हें महर्षि टॉलस्टॉय यांचें पुस्तक प्रसिद्ध झालें. "ललितकलांत रंगून जाणें याहून उच्चतर ध्येय मनुष्यापुढें पाहिजे. सौंदर्योपासनेपेक्षां कर्तव्याचरण हेंच ध्येय अधिक उन्नतिकारक आहे." इ. विचार टॉलस्टॉयनीं मोठ्या आवेशानें त्या पुस्तकांत मांडले होते. हें पुस्तक प्रसिद्ध होतांच साऱ्या युरोपांत खळबळ उडाली. भावनाप्रधान तरुण रोमां रोलां तर कावरेबावरे झाले. आजपर्यंत मोलाचें आयुष्य आपण फुकट तर घालविलें नाहीं असा संशय त्यांना आला. त्यांनीं टॉलस्टॉयना 'एक अज्ञात विद्यार्थी' या सहीनें एक पत्र पाठविलें. त्यांत आपल्या मस्तकांत माजलेलें सर्व काहूर त्यांनीं वर्णन केलें होतें. टॉलस्टॉयनीं देखील त्या पत्राला समाधानकारक उत्तर दिलें. तेव्हां रोमां रोलांना थोडीफार शांतता मिळावी.

टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानाचा रोमां रोलांच्या मनावर फारच परिणाम झाला. त्यांना टॉलस्टॉयचा उपदेश न मिळता तर उत्तम कवि आणि संगीतशास्त्रज्ञ एवढीच काय ती त्यांची प्रगति झाली असती. पण टॉलस्टॉयच्या उपदेशानें त्यांना थोर तत्त्वज्ञानी बनविलें. असो. या कालानंतर रोमां रोलांच्या जीवनक्रमाला निराळी दिशा लागली. सत्य-संशोधन हें त्यांच्या आयुष्याचें ध्येय झालें.

त्यानंतर जागतिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास त्यांनीं भरपूर केला आणि लेखनाचा प्रचंड उद्योग आरंभिला. नाटकें, कादंबऱ्या, राजकारणी व तात्त्विक लेख इ. त्यांचें वाङ्मय इतकें स्वतंत्र, विपुल आणि भरगच्च आहे कीं त्यायोगें त्यांची कीर्ति शाश्वतस्वरूपिणी झाली आहे. त्यांच्या वाङ्मयांत नुसता फ्रान्स देश किंवा नुसतें युरोपखंडच नाहीं, तर सर्वच खंडें आहेत. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद इ० हिंदी महापुरुषांचीं त्यांनीं

लिहिलेलीं सरस चरित्रें वाचलीं म्हणजे त्यांच्या सूक्ष्म अध्ययनाची, मार्मिक बुद्धीची, आणि पल्लेदार प्रतिभेची साक्ष पटते. ‘ जाँ ख्रिस्तोप ’ ही प्रचंड कादंबरी म्हणजे त्यांच्या वाङ्मयाचा गाभा होय. त्यांत एका कलावंत माणसाचें चित्र रेखाटलें आहे. आपल्या अंतःकरणांत लहानपणापासून जीं विचारांचीं आंदोलनें झालीं तीं त्यांनीं त्या कादंबरींतल्या पात्रांचे चरित्रांत दिलीं आहेत. त्यामुळें निव्वळ कथा म्हणून नव्हे तर तत्त्वज्ञान म्हणूनहि ही कादंबरी फार श्रेष्ठ दर्जाची समजली जाते. अलीकडे साम्यवादी ( कम्युनिझम् ) विचारसरणीशीं रोमां रोलां हे विशेष समरस झाले. दलित समाजाच्या उद्धारासाठीं झटण्यांतूनच आत्मोन्नति मिळविली पाहिजे हें त्यांचें आवडतें सूत्रवाक्य होतें. ‘ मी थांबणार नाहीं ’ ( I will not rest ) हें त्यांचें नवीन पुस्तक म्हणजे त्यांच्या तात्त्विक दृष्टिकोनांतून झालेल्या क्रांतिकारक स्थित्यंतराचें उत्कृष्ट प्रतिबिंब होय.

असा हा तत्त्वज्ञ लेखक अत्यंत निरलस व सुस्वभावी होता. पॅरिसमध्यें पुस्तकांच्या व कागदपत्रांच्या ढिगाऱ्यांत रोमां रोलां आपलें काम अखंड करीत असत. सडपातळ, फिकट आणि विचारमग्न अशी त्यांची मूर्ति असे. त्यांचे डोळे गर्द निळे असून भेटीला गेलेल्या माणसावर ते तत्काळ छाप पाडूं शकत. त्यांना फक्त पांच तास झोंप पुरे होई. त्यांची विश्रांति म्हणजे स्वस्थ बसणें नव्हे. कामांत पालट करावयाचा एवढेंच. तत्त्वज्ञानाचा कंटाळा आला कीं काव्य वाचावें, काव्याचा कंटाळा आला कीं राजकारण चाळावें असा त्यांचा क्रम असे. जगांत दूरदूरच्या देशांत त्यांचे चहाते व ऋणानुबंधी लोक होते. त्यामुळें त्यांना पत्रव्यवहारहि बराच ठेवावा लागे.


रोमां रोलांची प्रकृति अखेर फार ढासळत जाऊन ते अनेक दिवस रुग्णावस्थेंत होते. स्वित्झर्लंडमध्यें हवेच्या ठिकाणीं ते शेवटीं राहत असत. तथापि ते कोणत्याहि अज्ञात ठिकाणीं राहत असले तरी सर्व

जगाला आपलेसे भासत आणि त्यांच्या प्रकृतीला आराम पडण्यासंबंधीं दूरदूरचे लोक प्रार्थना करीत. नाझींनीं फ्रान्स व्यापल्यावर तर त्यांना एका दृष्टीनें कारावासांतच दिवस काढावे लागले. त्यांच्या मृत्यूची वार्ता एक दोन वेळीं उठली होती. अखेर दुर्दैवानें १९४५ सालीं ती खरी ठरली ! सारें पुरोगामी व सौंदर्यवादी जग मनानें या युरोपियन महर्षींच्या अंत्यविधींत सादर सामील झालें. स्वबांधवांचें वैर पत्करून आणि कीर्तीवर पाणी सोडून सर्व जगाची, परतंत्र राष्ट्रांची आणि न्यायाची बाजू त्यांनीं उचलली. " यशःप्राप्ति नव्हे तर श्रद्धा " हें त्यांचें ध्येय होतें; हें रोमां रोलांनीं केलेलें आपल्याच एका पात्राचें वर्णन त्यांनाहि लागूं पडत नाहीं काय ?

****

# अलबर्ट इन्स्टिन् : १७

पहिलें महायुद्ध संपून एकच वर्ष झालें होतें. इंग्लंड आणि जर्मनी या दोन राष्ट्रांना एकमेकांविषयीं भयंकर अप्रीति वाटत होती. जर्मन मनुष्य 'इंग्लिश' हा शब्द ऐकतांच चवताळून उठे, तर इंग्लडांत 'जर्मन' म्हणून जें जें कांहीं असेल तें तें विषासारखें मानलें जाई. याच वेळीं जर्मनीचे विख्यात शास्त्रज्ञ प्रो. अलबर्ट इन्स्टिन् हे लंडन शहरीं आले होते. त्यांच्या आगमनप्रसंगीं इंग्लिश जनतेचा जर्मनद्वेष कोठल्या कोठें मावळला. प्रो. इन्स्टिन् यांचें प्रचंड प्रमाणावर स्वागत झालें. किंग्ज कॉलेज-



मध्यें इंग्लिश सभासदांना इन्स्टिन् यांची ओळख करून देतांना, इंग्लंडचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ व राजनीतिपटु प्रो. हॉल्डेन म्हणाले, "आज तुमच्यापुढें विसाव्या शतकांतील 'न्यूटन' आला आहे. कोपर्निकस, गॅलिलियो किंवा न्यूटन यांनींहि केली नाहीं अशी प्रचंड क्रांति या गृहस्थानें वास्तवशास्त्रांत घडवून आणली आहे." या आद्वितीय मनुष्याकडे जो तो अत्यंत आदरानें पाहूं लागला. 'विद्वान् सर्वत्र पूज्यते' हेंच सर्वस्वीं खरें आहे, असें म्हणावें लागतें.

प्रो. इन्स्टिन् यांचा जन्म एका ज्यू घराण्यांत ता. १४ मार्च १८७९ त झाला. यांच्या जन्मानंतर एकाच वर्षानें त्यांचीं मातापितरें म्युनिच (व्हेरिया) येथें राहावयास गेलीं. अलबर्टला लहानपणापासून धर्माचें फार वेड होतें. धार्मिक विधींचें लक्षपूर्वक अवलोकन करावें, पौराणिक कथा वाचाव्या, आणि जाणत्या माणसास धर्मासंबंधीं अनेक शंका विचाराव्या असा त्याचा क्रम असे. अलबर्टचा पिता व्यापारी होता. तरी पण वाङ्मय व कला यांचा त्याला षोक होता. अलबर्टची माता पॉलिन ही अतिशय उल्हासी वृत्तीची सुशील गृहिणी होती. ती नेहमीं म्हणे कीं, "माझा अलबर्ट विख्यात प्रोफेसर होणार आहे." आणि माउलीचें भविष्य खरेंच झालें.

अलबर्ट लाजाळू, अबोल आणि एकांतप्रिय होता. आपली धर्म-भावना व्यक्त करण्यांत त्याला आनंद होई. संगीताचा त्याला अतोनात नाद होता. लहान लहान प्रार्थनागीतें तयार करावीं आणि तीं ताला-सुरावर म्हणावीं हा त्याचा आवडता उद्योग. निसर्ग आणि ईश्वर हीं एकच आहेत असा सिद्धांत त्याला इतक्या अल्पवयांतच पटला होता. त्याचें अंतःकरण तर इतकें मृदु होतें कीं, रस्त्यावरून चाललेल्या भिकाऱ्यांची दीन स्थिति पाहून त्याच्या डोळ्यांना पाणी येई आणि आपण या मानानें किती तरी ऐषारामांत राहतों याची त्याला लाज वाटे.

म्युनिच येथें अलबर्टनें विद्याभ्यासास सुरुवात केली. ग्रीक, लॅटिन,

गणितशास्त्र, युरोपियन वाङ्मय इ० चा अभ्यास त्यानें येथेंच केला. पण घराण्याची स्थिति अगदींच खालावली. बापाला म्युनिच येथील मुक्काम हलवावा लागला. इन्स्टिन् कुटुंब इटालींतील मिलन शहरीं नवा कामधंदा पाहण्यास गेलें. अलवर्ट म्युनिच येथें शिकतच होता. पण अखेर त्यालाहि विद्याभ्यास सोडून मिलनला जावें लागलें.

तथापि कुटुंबाच्या विवंचनेंत फार दिवस न राहतां अलबर्टनें झुरिच (स्वित्झर्लंड) विश्वविद्यालयांत नांव दाखल केलें आणि स्वतःच्या श्रमावर द्रव्यार्जन करून १९०० सालापर्यंत तेथील सर्व अभ्यासक्रम पुरा केला. तेवढ्या अवधींत निरनिराळ्या शास्त्रीय विषयांवर त्यानें संशोधनात्मक व चर्चात्मक असे अनेक निबंध लिहिले. त्यांयोगें त्याची कीर्ति अध्यापकवर्गांत पसरून त्याला प्रोफेसरशिप मिळाली.

प्रो. इन्स्टिन् यांनीं झुरिच, रादरमूर, प्रेग इ० अनेक ठिकाणीं प्रोफेसर म्हणून काम केलें. त्यांच्या प्रतिभेला अंकुर फुटून त्यांचे नवे नवे शोध जेव्हां बाहेर येऊं लागले, तेव्हां युरोपांतील नामांकित विश्वविद्यालयांनीं त्यांना आपल्या येथें काम करण्याकरितां सन्मानानें पाचारण केलें. पण त्या सर्वांना नकार देऊन अखेर १९१४ सालीं बर्लिन युनिव्हर्सिटींत ते दाखल झाले. तेव्हांपासून ते शांतपणें संशोधन व चिंतन या आपल्या आवडत्या व्यवसायांत काळ घालवीत होते. पण पुढें नाझी सरकारचा राक्षसी जाच सुरू झाला. त्याची झळ इन्स्टिन् यांनाहि लागली. कारण ते ज्यू होते. ज्यूंवर नाझी सरकारचा कटाक्ष फार. इन्स्टिन् जर्मनी सोडून व मालमत्ता टाकून बाहेर पडले. इतर राष्ट्रांनीं त्यांना योग्य संरक्षण देऊन त्यांचा सन्मान केला.

लहानपणापासून प्रो. अलबर्ट यांना कीर्तीची अथवा पैशाची मुळींच लालसा नाहीं. "सुखालागीं आरण्य सेवीत जावें" अशा वृत्तीचे ते आहेत. व्याख्यानें, मुलाखती, मेजवान्या, नाचरंग यांचा त्यांना मना-

पासून कंटाळा आहे. परंतु कीर्ति त्यांच्या मागें हात धुऊन लागली असल्यामुळें त्यांना एकांतवासाचा आनंद पूर्णपणें मिळत नाहीं. " सापेक्षतासिद्धांत " ( Theory of Relativity ) हा त्यांचा क्रांतिकारक शोध प्रसिद्ध होतांच जग स्तिमित होऊन त्यांच्याकडे पाहूं लागलें. या सिद्धांतानें आज अनेक शतकें मान्य झालेल्या शास्त्र-कल्पना खोट्या ठरविल्या आहेत. या नवीन सिद्धान्ताबद्दल जगांतल्या अनेक युनिव्हर्सिट्यांनीं बहुमानाच्या पदव्या प्रो. इन्स्टिन् यांना दिल्या. कित्येक प्रख्यात शिक्षणसंस्थांनीं त्यांना आपले सभासद करून घेतलें, आणि व्याख्यानाकरितां निमंत्रणें तर अगणित आलीं. अखेर १९२१ सालीं जगद्विख्यात ' नोबेल प्राइझ ' इन्स्टिनना देण्यांत आलें. प्रो. इन्स्टिन् यांनीं जगाचा प्रवास केलेला आहे. ते जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांचा बहुमान झाला. प्रवासांतील आपले अनुभव त्यांनीं लिहून ठेविले आहेत. हिंदुस्थानांतहि ते आले होते. कलकत्ता येथें माणसांनीं ओढल्या जाणाऱ्या रिक्षांचा देखावा त्यांना अत्यंत दुःखकारक वाटला. माणसांना जनावरांचें जिणें कंठावें लागतें याचें त्यांना वाईट वाटलें. अमेरिकेला ते गेले असतां त्यांच्याकरितां उत्कृष्ट व हवाशीर खोली आगबोटीवर शृंगारून ठेवण्यांत आली होती. पण तेथें थाटामाटानें राहाण्याचें साफ नाकारून ते साध्या उतारूंच्या खोलींत गेले.

त्यांच्यासारखा गरिबांचा कनवाळू विरळा. ' नोबेल प्राइझ ' चे सर्व पैसे त्यांनीं धर्मादाय म्हणून दिले. प्रतिभाशाली शास्त्रज्ञ म्हणून जगाला अत्यंत वंद्य असलेला हा मनुष्य जर्मन मजुरांना व शेतकऱ्यांना आपला साह्यकर्ता व मित्र म्हणून परिचित आहे! तुम्ही त्यांच्या 'पूज्य अलबर्ट' ची थोरवी शास्त्रज्ञ म्हणून सांगूं लागला तर त्या भोळ्याभावड्या शेतकऱ्यांना आश्चर्यच वाटेल. इन्स्टिनचा ५० वा वाढदिवस साजरा झाला, तेव्हां त्यांना जगांतील नामांकित संस्थांकडून, राजेरजवाड्यांकडून आणि थोर लोकांकडून अनेक नजराणे आले. पण त्यांना जर कोणता

नजराणा मनापासून प्रिय झाला असेल तर तो एका गरीब मजुराचा. बिचाऱ्यानें कवडी कवडी जमवून अलबर्टना भेट म्हणून एक सिगारेट केस पाठविली होती !

प्रो. अलबर्ट राजकारणापासून अलिप्त असले तरी राजकारणाचें एकंदर स्वरूप ते बारकाईनें जाणूं शकतात. शस्त्रसंन्यास, आंतर्राष्ट्रीय हितसंबंध इ. विषयांवरील त्यांचे विचार फार उदात्त व मननीय आहेत. हिंदी लोकांना तर प्रोफेसर अलबर्ट फारच जवळचे. त्यांच्या संशोधनाचें पूर्ण रहस्य कळलेले जे पांचसात बुद्धिमंत जगांत आहेत त्यांत अलाहाबादचे डॉ. मेघनाद सहा हे अलबर्ट यांचे प्रिय शिष्य आहेत. हिंदी संस्कृति आणि गांधी–रवीन्द्रनाथांसारखे असामान्य हिंदी पुरुष प्रो. अलबर्टना वंदनीय वाटतात. **अनेक ध्येयें, शास्त्रें, कला या सर्वांच्या मूलतत्वांत एक प्रकारची संगति आहे. म्हणूनच त्यांच्यांत अंतिम एकत्व असणें अगदीं शक्य आहे** असें प्रो. इन्स्टिन् समजतात.

यामुळेंच त्यांच्या व्यक्तिमत्वाला पूर्णपणा आलेला आहे. तुम्ही त्यांच्या राहात्या घरीं जा. स्वारी एका जुनाट आरामखुर्चीवर बसलेली तुम्हांस आढळेल. गुडघ्यावर एक कागदांचें पॅड असून त्यावर गणित आणि टिपणें चाललेलीं असावयाचीं. वेष साधाच, अर्धवट शुभ्र झालेले केस इतस्ततः विखुरलेले आणि गोल व सुंदर चेहऱ्यावर प्रेमळपणा आणि गांभीर्य यांचा गोड संगम झालेला ! पण ते गणितांतच गढून जातील असें नाहीं. गणिताचा कंटाळा आला कीं, व्हायोलिन काढून एक दोन गाणींहि ते छेडतील. आणि तींहि अशा कौशल्यानें कीं एखादा पट्टीचा तंतुकार खुष होऊन जावा. एखाद वेळ गटे, शेले वा शेक्सपिअर यांच्यापैकीं एकाद्याचें सर्वोत्कृष्ट पुस्तक घेऊन तें वाचण्यांतच प्रोफेसर-साहेब तल्लीन होतील. त्यांना समाजांत मिसळण्याची विशेषशी आवड नसली तरी त्यांच्यांत तुसडेपणा नांवालाहि नाहीं. एकाद्या शेतकऱ्या-पासून तों थेट सम्राटापर्यंत कोणाशींहि त्यांचें वर्तन मोकळें, आनंदी

आणि विनम्र असतें. बुद्धि आणि अंतःकरण या दोहोंचाहि पूर्ण विकास झालेला त्यांच्या ठिकाणीं दृष्टीस पडतो.

—आणि अलबर्ट यांच्या अद्वितीय संशोधनापेक्षां त्यांच्या सद्‌गुणांनींच ते जगाचें चित्त आकर्षून घेतात. नाझी जर्मनीनें ज्यूंवरील आपला द्वेष व्यक्त करण्याकरितां या स्थितप्रज्ञ विद्वानाला हद्दपार केलें. पण त्यायोगें इन्स्टिनची महती वाढलीच! धर्म, शास्त्रें आणि कला हीं एकरूप आहेत असा संदेश देणारा हा लोकोत्तर प्रतिभेचा विद्वान् मागें इंग्लंडमध्यें गेला असतांना, प्रसिद्ध लेखक मि. जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनीं "**अत्यंत दुर्मिळांतला दुर्मिळ**" ( Rare among the rarest ) असा त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला तो योग्य नाहीं असें कोण म्हणेल?

****

# व्हॉन हिंडेनबुर्ग : १८

जर्मनींतील हॅनोव्हर शहरीं एक असामान्य वृद्ध व्यक्ति होती. उंची साडेसहा सात फूट, मिशा रुबाबदार, छाती व बाहु अत्यंत विशाल, हनुवटी करारी, तोंडावर गांभीर्य, करडेपणा व शांतपणा यांचें सुंदर मिश्रण, आणि या सर्व भव्यपणाला उठाव देणारा लष्करी पोषाख असें त्या व्यक्तीचें थोडक्यांत वर्णन देतां येईल. या गृहस्थाला पाहतांच तुम्हांला भीति वाटली असती; पण लौकरच त्याचा सरळपणा आणि वात्सल्य पटून तुम्हांला त्याच्याबद्दल आदर वाटूं लागला असता. हा प्रचंड मनुष्य म्हणजेच जर्मनीचे वृद्ध सेनानी हिंडेनबुर्ग होत.

हिंडेनबुर्ग अध्यक्षाच्या निवडणुकीकरितां उभे राहिले तेव्हां त्यांची लोकप्रियता कळून आली. ते स्वतः प्रॉटेस्टंट असून रोमन कॅथोलिक



लोकांनीं त्यांना मतें दिलीं; इतकेंच नव्हे तर ते निवडून यावेत म्हणून देवळांतून सामुदायिक प्रार्थना चालविल्या. हॉस्पिटलमध्यें अंथरुणाशीं खिळलेल्या रोग्यांनीं त्यांना मतें दिलीं; आणि शेकडों लोकांनीं त्यांना मतें मिळण्याकरितां स्वयंस्फूर्तीनें खटपट केली. कांहीं वर्षांपूर्वी ते प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष झाले, तेव्हां तर अकल्पित प्रकार झाला. स्वारी लिंडन गांवीं आपल्या आयुष्याचे अखेरचे दिवस शांतपणें घालवीत होती. बीअरचे घुटके घेत घेत बुद्धिबळें खेळावीं आणि आळसांत काळ काढावा हा त्यांचा कार्यक्रम होता. सार्वजनिक सभेंत भाषणें नाहींत, वर्तमानपत्रांना मुलाखती नाहींत किंवा आपल्या योग्यतेविषयींची जाहिरात नाहीं. निवडणुकीला उभें राहावें ठरविलें, तेव्हां जर्मन राष्ट्राला हिंडेनबुर्गनीं एवढेंच सांगितलें कीं, "**परमेश्वर, पितृभूमि,* आणि प्रजासत्ताक राज्य यांच्याशीं इमानानें वागून त्यांची कायावाचामनानें सेवा करीन.**" पण त्यांच्या शब्दावर जर्मन लोकांचा एवढा गाढ विश्वास कीं फारशी तयारी करण्यास सवड नसतां ते प्रचंड बहुमतानें निवडून आले आणि प्रजासत्ताक राज्याच्या अध्यक्षपदावर ते आरूढ झाले.

जर्मन लोकांची हिंडेनबुर्गवर एवढी श्रद्धा होती याचें कारण काय? याचें थोडक्यांत उत्तर म्हणजे त्यांचें शंभर नंबरी शील व कर्तृत्व. गेल्या महायुद्धानंतर जर्मनीचा चोहोबाजूंनीं धुव्वा उडाला. दोस्तराष्ट्रांनीं

---

* जर्मन लोक आपल्या देशाला पितृभूमि "Fatherland" म्हणतात.

त्यावर जबर खंडणी लादून त्याला निःसत्त्व केलें आणि त्याचीं शस्त्रास्त्रें व सैन्य खच्ची करून त्याला पंगु करून टाकलें. अशा असहाय स्थितींतून डोकें वर काढणें महामुष्किल होतें. पण असल्या वादळी समुद्रांतून हिंडेनबुर्ग यांनीं राष्ट्राचें तारू कौशल्यानें चालविलें. जर्मन लोकांच्या अंगीं बुद्धिमत्ता, कल्पकता, धैर्य व धिमेपणा हीं तर भरपूर आहेतच. पण राष्ट्राभिमान हा गुण त्यांच्या रक्तांत अगदीं भिनून गेला आहे. या गुणांचा उपयोग करून घेण्यास सच्चा व धडाडीचा पुढारी पाहिजे. हें काम हिंडेनबुर्ग यांनीं उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें. जर्मनीची पत परदेशांत कायम ठेऊन त्यांनीं इतर राष्ट्रांचा आदर व सहानुभूति संपादन केली. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स इ. प्रमुख राष्ट्रांतील विचारी लोक हिंडेनबुर्ग यांना चाहत ते यामुळेंच.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत पोसेन गांवीं हिंडेनबुर्गचा जन्म झाला. या गांवचे लोक नेपोलियननें केलेल्या हल्ल्यांच्या आठवणी विसरले नव्हते. मातृवंशाकडून त्यांना लष्करी शिस्तीची दीक्षा मिळाली. पहिले वुइल्यम्, प्रिन्स बिस्मार्क, व्हॉन मोल्टके इ. जर्मन साम्राज्य कमवणारे महापुरुष हिंडेनबुर्गच्या जाणतेपणीं उत्कर्षाला पोचले. यांचीं उदाहरणें डोळ्यांसमोर असल्यानें हिंडेनबुर्गच्या अंगीं जन्मतःच वाणलेली क्षात्रवृत्ति विशेष प्रखर व्हावी यांत काय नवल! "लहानपणापासून मीं असें एकहि पुस्तक वाचलें नाहीं कीं, ज्यांत लष्कर, लढाई इ. संबंधीं माहिती नव्हती." असें हिंडेनबुर्ग कधीं कधीं सांगत. यावरून त्यांच्या लढाऊ वृत्तीची कल्पना येईल.

महायुद्धापूर्वीं कांहीं वर्षांची गोष्ट. कैसर वुइल्हेल्म (जर्मनीचे पदच्युत बादशहा) आणि हिंडेनबुर्ग हे दोघे लटुपटीची लढाई खेळले. प्रत्यक्ष बादशहा विरुद्ध बाजूचे खेळाडू असल्यानें त्यांनाच डाव जिंकूं द्यावा अशा धोरणानें हिंडेनबुर्ग खेळत होते. अर्थातच त्यांचा पराभव झाला आणि कैसर विजयी झाले. आतां खेळांतला विजय आणि तो दुसऱ्य

पक्षाच्या मेहेरबानगीमुळें मिळालेला; तेव्हां त्याची बढाई कशाची? पण कैसरना एवढा विचार राहिला नाहीं. ते हिंडेनबुर्गना थोड्या ताठ्यानें हंसत हंसत म्हणाले, "कायहो! तुमच्या पराभवाबद्दल तुम्हांला काय वाटतें?" हिंडेनबुर्ग म्हणजे लष्करी माणूस! लागलीच त्यांनीं उत्तर केलें, "महाराज, हा सारा लटुपटीचा खेळ. आपण खरो-खरचा सामना द्यायला आलां असतां तर आपले बहुतेक सैनिक मी रणांगणावर जमीनदोस्त केले असते; आणि राहिलेले बाल्टिक समुद्रांत ढकलून दिले असते." हें उत्तर कैसरना झोंबलें आणि त्यांची हिंडेन-बुर्गवर गैरमर्जी झाली. हिंडेनबुर्गनीं हें जाणलें आणि ते आपल्या हॅनोव्हर गांवीं निघून गेले.

पुढें महायुद्ध सुरू झालें. हिंडेनबुर्गना सैन्यांत जागा मिळाली नव्हती. इतक्यांत रशियन अस्वल पूर्वेकडच्या बाजूनें जर्मनींत घुसलें. लोकांच्या तोंडचें पाणी पळालें. 'हिंडेनबुर्गना आणा' अशी एकच आरोळी उठली. तेव्हां त्यांना पाचारण केल्याखेरीज कैसरना गत्यंतरच नव्हतें! मग हॅनोव्हरचें शांत जीवन सोडून हा खंदा वीर युरोपच्या रणभूमीवर आला. त्याचा शंखनाद ऐकतांच दोस्त राष्ट्रांचीं धाबीं दणाणलीं. जर्मनीवर चढाई करूं पाहणाऱ्या रशियाला हिंडेनबुर्गनीं पार गारद केलें. जर्मनीच्या पूर्वहद्दीवर वीस हजार रशियन सैनिकांची वाताहात झाली. या एकाच विजयानें हिंडेनबुर्ग जर्मन राष्ट्राचे कंठमणि झाले. पदव्या, नजराणे, शाबासकीचीं पत्रें, तारा इ० चा त्यांच्यावर वर्षाव होऊं लागला. लवकरच ते फील्ड मार्शल झाले आणि पुढें चार वर्षें महायुद्धांतील एक प्रमुख व जबरदस्त सेनापति म्हणून ते जगाच्या डोळ्यासमोर राहिले.

युद्ध बंद झाल्यावर जर्मनीच्या राज्यकारभारांत मोठीच क्रांति झाली; आतां आपला अवतार संपला असें समजून हिंडेनबुर्ग आपल्या गांवीं निघून गेले. पण राष्ट्राची दुर्दशा त्यांच्यानें पाहवेना. जर्मनीच्या उद्धारासाठीं


आपणहि हातभार लावला पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें. म्हणूनच हा वृद्ध योद्धा कांहीं वर्षांपूर्वी पुनः राजकारणांत आला. राजसत्ताक अमदानींत वाढलेला हा गृहस्थ प्रजासत्ताक राज्याचा कारभार कसा काय करतो याविषयीं पहिल्यानें पुष्कळांना संशयच होता. पण लौकरच तो दूर झाला. हिंडेनबुर्गनीं आपल्या राष्ट्राची कामगिरी योग्य रीतीनें बजाविली व पुनरपि त्याला जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या पंक्तींत आणून बसविलें.

हिंडेनबुर्ग इतके वृद्ध झाले होते तरी त्यांचा उत्साह व सामर्थ्य वाखाणण्यासारखें होतें. अखेरपर्यंत त्यांचें सकाळचें फिरणें चालू असे. हवा वाईट असली तर ते घरांतल्या घरांतच शतपावली करून ठरलेलों व्यायाम घेत. त्यांची राहणी साधी असे. परमेश्वरावर त्यांची अतिशय निष्ठा असे. राज्यकारभाराचीं कामें दक्षतेनें करण्यांत त्यांचा हातखंडा होता. बुद्धीनें त्यांची गणना सामान्य माणसांतच झाली असती. त्यांचे-जवळ विद्वत्ताहि बेताबाताचीच होती. पण शील हा एकच अमोलिक सद्गुण त्यांना जर्मन राष्ट्रांत अढळपद देण्यास कारण झाला. " **विश्व-बंधुत्वाच्या कल्पनेंत रमण्यापेक्षां शिस्त आणि दीर्घोद्योग यायोगें राष्ट्राला वैभवसंपन्न करणें हेंच मला अधिक श्रेयस्कर वाटतें.** " असें हिंडेनबुर्ग म्हणतात. हें ध्येय सत्यसृष्टींत आणण्यासाठीं आपल्या प्रदीर्घ जीवनांत त्यांनीं पराकाष्ठा केली.

****

## रूझवेल्ट : १९

कांहीं वर्षांपूर्वी इंग्लंडचे प्रसिद्ध तत्त्वज्ञानी लेखक मि. एच्. जी. वेल्स हे रशियामध्यें गेले असतां त्यांचा स्टॅलिनशीं महत्त्वाच्या प्रश्नावर



वादविवाद झाला. यंत्रकलेमुळें जें प्रचंड उत्पादन होत आहे त्याची व्यवस्था लावून जगांतील विषमता नाहींशी केल्याशिवाय जगांतला बहुजनसमाज सुखी होणें शक्य नाहीं, याविषयीं वेल्स व स्टॅलिन यांचें एकमत होतें. परंतु हें घडून येण्यासाठीं जी पद्धति स्वीकारावयाची तीवर मात्र तीव्र मतभेद झाला. अमेरिकेंत रूझवेल्ट सामाजिक पुनर्घटनेचे जे प्रयत्न करीत होते त्यांचा निर्वाळा वेल्सनीं दिला. स्टॅलिनसारख्या क्रांतिवादी माणसास तें पटणें शक्य नव्हतें. तथापि स्टॅलिननीं वाद-विवादांत एक गोष्ट मात्र मान्य केली. " भांडवलशाही जगांत रूझवेल्ट हे सर्वांत जास्त कर्तबगार पुरुष होत यांत शंका नाहीं."

रशियाच्या सोटेशहानेंहि प्रशंसिलेला कर्तबगार पुरुष चार वेळां आपल्या देशाचा अध्यक्ष निवडून आला होता. रूझवेल्ट यांना मता-धिक्य मिळूं नये म्हणून कित्येकदां भांडवलवाल्यांनीं पाण्यासारखा पैसा ओतला. परंतु चारहि बाजूंचे ओहळ जसे समुद्राच्या रोखानें धांवत जावेत त्याप्रमाणें निवडणुकीच्या दिवशीं अमेरिकन संस्थानांच्या सर्व बाजूंनीं मतांचे लोंढे येऊन रूझवेल्ट हे यशस्वी होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागत. अमेरिका स्वतंत्र झाल्यापासून लागोपाठ चार वेळां अध्यक्ष कुणीहि निवडून आला नव्हता. तो विक्रम रूझवेल्टनीं केला.

प्रेसिडेंट रूझवेल्ट हे मोठे आनंदी आणि उत्साही वृत्तीचे गृहस्थ होते. १९२० चे सुमारास रूझवेल्टचे राजकीय गुरु प्रे. विल्सन यांच्या तत्त्वज्ञानाची पिछेहाट झाली. त्यांचा पक्ष अमेरिकेंत अत्यंत अप्रिय झाला, आणि त्याचा परिणाम साहजिकच असा झाला कीं, रूझवेल्टसारखे जे कोणी विल्सनभक्त होते त्यांना राजकीय क्षेत्रांत महत्त्व उरलें नाहीं.

उदारमतवादाच्या अशा ओहोटींत सार्वजनिक जीवनाच्या अस्तित्वावर अशा रीतीनें गदा आली आणि याच वेळीं संधिवाताचा झटका येऊन रूझवेल्ट दुबळे झाले. अशा वेळीं एकाद्याला राजकीय क्षितिजावर कायमचें नामोहरम व्हावें लागलें असतें. पण रूझवेल्ट मनानें उत्साही व खंबीर राहिले. एका गरम जलाशयांत सतत ७ वर्षे पोहून त्यांनीं आपलें शारीरिक व्यंग घालविलें. अमेरिकन बहुजनसमाजाच्या दुःखाचा भार हलका करण्याचा विश्वास त्यांनीं बाळगला. त्यांचें कर्तृत्व व सामर्थ्य लोकांना पटलें आणि ते प्रचंड बहुमतानें १९२८ सालीं व पुनः दोन वर्षांनीं न्यूयॉर्कचे गव्हर्नर म्हणून निवडून आले. नंतर १९३२ सालीं ते राष्ट्राध्यक्ष झाले व त्याच पदावर पुढें आणखी तीन वेळां स्थिर झाले.

"N. I. R. A." या आद्याक्षरांनीं प्रसिद्ध असलेल्या 'नीरा' योजनेचे जनक म्हणून रूझवेल्ट यांचें नांव जगांत सर्वश्रुत आहे. ही योजना "रूझवेल्टचें न्यू डील" (New Deal) म्हणूनहि ओळखली जाते. यांत शंभर नंबरी 'कम्युनिझम्' नाहीं म्हणून स्टॅलिन वगैरे मंडळींनीं जाहीर केलेंच आहे. उलट 'न्यू डील' मध्यें भांडवल-शाहीवर सक्ति आहे, म्हणून अमेरिकन कोट्याधिशांचाहि रूझवेल्टना विरोध आहे! पण 'न्यू डील' च्या तात्त्विक वादांत न शिरतांहि एक गोष्ट स्पष्ट दिसेल कीं, भांडवलशाहीचे दुष्परिणाम टाळून बहु-जनांना सुखी करण्याचे भगिरथ प्रयत्न रूझवेल्ट करीत होते. त्यांचे मार्ग कोणाला 'शास्त्रशुद्ध' वाटणार नाहींत. कोणाला त्यांचें ध्येय हास्यास्पद व असाध्यहि वाटेल. पण त्यांची कळकळ व कर्तृत्वशक्ति कोणालाहि नाकारतां येणार नाहीं.

१९०७ सालीं कायदेपंडित झाल्यापासून रूझवेल्ट यांनीं आपले अलौकिक गुण प्रकट केले. अमेरिकेचे माजी उदारमतवादी अध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यांचे माजी राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट हे आप्त होत. प्रे. विल्सन यांचे तर ते एकनिष्ठ छात्र होत. आपल्या या उज्ज्वल परंपरेचें

जतन व संवर्धन रूझवेल्टनीं उत्कृष्ट प्रकारें केलें होतें. ते उत्तम व परिणामकारक वक्ते असून त्यांचीं तीन–चार पुस्तकें लोकमान्यता पावलीं आहेत. पहिल्या महायुद्धकालीं ते नौकानयनसचिव होते आणि त्यांनीं तें काम उत्तम रीतीनें बजावून आपले नेते प्रे. विल्सन व सर्व राष्ट्र यांचे धन्यवाद घेतले.

दुसऱ्या महायुद्धाचे सूत्रचालक तर प्रे. रूझवेल्टच होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. अगोदर युद्ध टळावें म्हणून त्यांनीं अतोनात यत्न केले. हिटलेर, मुसोलिनी या हुकूमशहांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण तो व्यर्थ गेल्यावर त्यांनीं जगांतील लोकशाहीची फळी भक्कम करण्यास सुरुवात केली. डिसेंबर १९४१ मध्यें जपाननें अमेरिकेच्या पाठींत खंजीर खुपसला. तेव्हां तटस्थता सोडून अमेरिकेला रूझवेल्टनीं प्रत्यक्ष युद्धांतच ओढलें. "अमेरिका हें लोकशाहीचें शस्त्रागार झालें पाहिजे" ही आपली वाणी त्यांनीं खरी करून दाखविली. माणुसबळ, शस्त्रास्त्रें, अन्य सामुग्री यांची अमेरिकेकडून भरपूर आयात झाली, म्हणूनच युरोपीय व जपानी हुकूमशहांचा निःपात करणें दोस्तांना शक्य झालें. तथापि आपल्या जीवन कार्याला शंभर नंबरी यश पाहण्यास रूझवेल्ट जिवंत राहिले नाहींत. युद्धकाळीं बेसुमार पडलेल्या कामाचा शीण त्यांच्या जराजर्जर देहाला असह्य झाला आणि युद्धसमाप्तीच्या सुमारासच एके दिवशीं झोपेंत या उदार–धी पुरुषाचें देहावसान झालें. अमेरिकेच्या वॉशिंग्टन्, लिंकन, इमर्सन्, विल्सन इ० थोर मानवतावादी सत्पुरुषांत रूझवेल्टचें स्थान अढळ आहे. त्यांच्या मृत्यूनें जगांतल्या प्रगतिवादी जनतेला आपला आप्त मेल्यासारखें दुःख झालें! 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' हें कांहीं खोटें नाहीं.

****

# चर्चिल : २०

दुसऱ्या महायुद्धांत एक अनुभवी ब्रिटिश सेनानी लॉर्ड मॉंटगॉमेरी चर्चिलना म्हणाले, " मी रात्रीं ९ नंतर कधीं जागत नाहीं, तमाखू व मद्य यास स्पर्श केलेला नाहीं आणि मी या वयांत १०० टक्के सुदृढ आहें. " यावर चर्चिलसाहेब हसून म्हणाले, " अहो, मी झोपेची कधींच पर्वा करीत नाहीं. हवा तेवढा जागतों, तमाखू व मद्य मनसोक्त पितों आणि मी २०० टक्के धडधाकट आहें. " या उत्तरांत चार्चिलचें सारें व्यक्तित्त्व प्रतिबिंबित झालें आहे. हा चतुर मुत्सद्दी जितका सावध तितकाच बेफिकीर आहे. वादळं उठून लांटांचें तांडव सुरू झालें कीं ह्याच्या कर्तृत्वाला भरती येते. दुसऱ्या महायुद्धांत लंडनवर अग्निवर्षाव होत असतांना रेल्वेच्या डब्यांत शांतपणें सरकारी काम करतांना किंवा जेवण घेतांना चर्चिलना अनेकांनीं पाहिलें आहे. कल्पनेच्या वातावरणांत रमत राहण्याचा चर्चिलचा स्वभाव नाहीं; पण कल्पनेलाहि अगम्य असें साहस ते दाखवितात. पत्रपंडित, वक्ता, मुत्सद्दी, सैनिक, लोकनेता असे अनेक पैलू या वृद्ध वीराच्या जीवनास आहेत.



संकटाची अगाऊ चाहूल घेण्यांत चर्चिल फार कुशाग्रबुद्धि प्रकट करतात. पहिल्या महायुद्धाचा अंदाज त्यांनीं बरोबर घेतला होता. १९३८ सालीं जेव्हां चेंबर्लेननें हिटलेरच्या धमक्यांना भिऊन म्युनिचचा करार केला तेव्हां चर्चिल पार्लमेंटांत म्हणाले, " युद्ध किंवा मानहानि असाच तुमच्यापुढें पेंच होता. युद्धाला भिऊन तुम्ही आज मान-

हानि पत्करली; पण उद्यां पुनः युद्धहि तुमच्या बोकांडीं बसणार आहे." एका वर्षांतच हें भाकीत खरें झालें. १९४६ सालीं 'जगाचा शांतता-वादी त्राता' असा रशियाचा गौरव होत होता. यावेळीं चर्चिलनीं सांगितलें कीं, जगभर आपलें साम्राज्य व्हावें अशी राक्षसी महत्त्वा-कांक्षा रशियानें धरली आहे. असा परखड बोलण्याचा चर्चिलचा स्वभाव आहे. पण संकट आलें म्हणजे त्याला तोंड देण्यांतहि ते फार तरबेज आहेत. विशेषतः मोठमोठ्या समुदायांत धीर व विश्वास उत्पन्न करून जुलमी शत्रूंविरुद्ध अभेद्य फळी निर्माण करण्याचें अलौकिक सामर्थ्य चर्चिलनीं दाखविलें आहे.

इंग्लंडच्या इतिहासांत जे धुरंधर सेनानायक होऊन गेले त्यांत ड्यूक ऑफ मार्लबरो यांचें स्थान फार वरचें आहे. या विख्यात सरदार घराण्यांत विन्स्टन चर्चिल ३० नोव्हें. १८७४ सालीं जन्मले. चर्चिलचा आजा हा सातवा ड्यूक होय. लॉर्ड रँडाल्फ चर्चिल हे चर्चिलचे वडील मोठे मातबर मुत्सद्दी होते. चर्चिलची आई एक अमेरिकन युवती असून लावण्याबद्दल तिची फार ख्याति होती. विद्यार्थी म्हणून विन्स्टन कांहीं चमकला नाहीं. एकेका वर्गांत गोते खातच स्वारी लष्करी परीक्षा कशीतरी उत्तीर्ण झाली! लष्करांत शिरल्यावर सेनापति किचनेरच्या हाताखालीं कांहीं दिवस रणांगणावर त्यांनीं नोकरी केली. बोअर युद्धांत तरुण चर्चिलला शत्रूंनीं पकडलें; पण तुरुंगाच्या भिंतीवरून उडी टाकून या बहाद्दरानें धूम ठोकली. भोंवतीं अनोळखी प्रदेश. अखेर अनेक मैल प्रवास करून त्यांनीं एक स्टेशन गांठलें आणि लंडनपर्यंत ते सुखरूप आले. या साहसानें चर्चिलचें नांव सर्वतोमुखीं झालें. १९०० सालीं ते पार्लमेंटमध्यें निवडून आले आणि तेव्हांपासून अर्ध शतकावरचा काळ त्यांनीं लोकसभेंत सरकारी किंवा विरोधी पक्षाच्या बाजूला राहून घालविला आहे. आपल्या देशाच्या राज्यकारभारांत एवढी सेवा केलेलीं माणसें विरळा!

१९१० सालीं चर्चिल होम सेक्रेटरी झाले. सातवे एडवर्ड निधन पावल्याची वार्ता सरकारी रीतीनें चर्चिलनीं सांगितली. तेव्हांपासून ३–४ राजवटी त्यांनीं पाहिल्या आणि आज ते राणी एलिझाबेथचे पंत-प्रधान आहेत. युद्धक्षेत्राचें व युद्धशास्त्राचें त्यांचें ज्ञान फार खोल असल्यानें पहिल्या महायुद्धांत त्यांना दारूगोळ्याचे मंत्री नेमलें. पण चर्चिलचा खरा प्रभाव जगाला दिसला तो दुसऱ्या महायुद्धांत. १९३९ सालीं हिटलरनें विश्वासघात करून पोलंडवर स्वारी केली. तेव्हां चेंबर्लेनची मेणचट कारकीर्द खलास झाली आणि झुंझार चर्चिल ब्रिटिश राष्ट्राचे नेते झाले. त्यावेळीं राष्ट्राची तयारी मुळींच नव्हती. थोड्याच अवकाशांत नाझींचा अजस्र सेनासागर फ्रान्सच्या किनाऱ्यापर्यंत येऊन धडकला. हवाई हल्ले सुरू झाले; पण या प्रसंगीं मुळींच न डगमगतां चर्चिलनीं इंग्लिश राष्ट्र संघटित केलें. प्रतिकाराचा जोम व ईर्षा इंग्लिश लोकांत निर्माण केली. रूझवेल्ट आणि स्टॅलिन या दोन, अगदीं दोन टोकांवरच्या नेत्यांना एकत्र आणून नाझींविरुद्ध बळकट भिंत उभी केली. याच भिंतीवर फॅसिस्ट–नाझी हुकूमशाहीचें डोकें आपटून तिचा कपाळमोक्ष झाला. जगाच्या इतिहासांत चर्चिलची ही कामगिरी केवळ अपूर्व अशी ठरेल.

दुसरें महायुद्ध संपल्यावर या वृद्ध मुत्सद्याला आपलें मंत्रिमंडळ स्थापन करतां आलें नाहीं; पण मजूर मंत्रिमंडळाची कारकीर्द संपल्यावर पुनः चर्चिल अधिकारारूढ झाले. आज जगाच्या राजकारणांत पुनः चर्चिल यांना पूर्वींचेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. इंग्लंडची आज धुळधाण झाली असून त्याचा पूर्वींचा साम्राज्यशाहीचा डोलारा जमीनदोस्त झाला आहे; पण स्वातंत्र्यप्रिय, गुणी व शिस्तबद्ध इंग्रज लोक अजूनहि जागतिक राजकारणांत मागें पडलेले नाहींत. चर्चिलच्या नेतृत्वाखालीं आजहि ग्रेट ब्रिटनचें नेतृत्व जगाच्या भाविकाळाच्या दृष्टीनें क्रांतिकारक ठरेल असा रंग दिसतो. युरोपांत जर्मनीमधले तंटेबखेडे मोडावेत, मध्य

पूर्वेतला गोंधळ मिटवावा आणि तिसऱ्या महायुद्धाचा संभव नाहींसा करून टाकावा असा चर्चिलचा खटाटोप आहे. आणि त्यासाठीं या वयांतहि निरनिराळ्या विरोधी शक्तींची मोट बांधण्याची हिंमत ते बाळगून आहेत. परिस्थितीचे फासे चर्चिलना किती अनुकूल पडतात त्यावर यश अवलंबून आहे; पण चर्चिलची तयारी व योग्यता यांविषयीं आदर वाटल्यावांचून रहात नाहीं.

मंत्रिमंडळाची प्रमुख जागा मिळावी आणि लोकसभेंत काम करतां यावें यासाठीं 'सरदारकी'चा मोह चर्चिलनीं आजपर्यंत बाजूला ठेविला आहे; वास्तविक ' ड्यूक ' ही त्यांच्या घराण्याची पदवी. लॉर्ड त्यांना सहजच होतां आलें असतें; पण अगदीं अलीकडे ' सर ' ही साधी पदवी व ' गार्टर 'चा बहुमान एवढेच सरकारी मानसन्मान त्यांनीं पत्करले. राष्ट्राची असामान्य स्वरूपाची सेवा करणारांनाच ' गार्टर ' द्यायचा असा इंग्लंडचा शिरस्ता आहे. ग्रेट ब्रिटनच्या शिल्पकारांत चर्चिलचें स्थान मोठें आहे. साहस, उद्योग, हिशेबीपणा, वास्तवदृष्टि, चिकाटी, जीवनाविषयींचा समतोल दृष्टिकोन, हीं सर्व इंग्रज वंशाचीं वैशिष्ट्यें चर्चिलमध्यें फार मोठ्या प्रमाणांत आहेत. ते आदर्श इंग्रज गृहस्थ आहेत. आपल्या राष्ट्राचा गुणसमुच्चय प्रकर्षानें प्रकट करणारा राष्ट्रपुरुष या अभिमानाच्या व आपलेपणाच्या भावनेनें इंग्लिश जनता चर्चिलकडे पाहते. राजकारणाच्या वादळांत राष्ट्रनौका हाकण्याची कामगिरी जेव्हां नसेल तेव्हां साहित्य व चित्रकला या आपल्या आवडत्या विषयांत चर्चिल रंगून जातात. ' राजकारणी चर्चिल ' विसरले गेले तरी ' साहित्यिक चर्चिल ' अमर आहेत. आपला समरपंडित पूर्वज मार्लबरो यांचें उत्कृष्ट चरित्र त्यांनीं लिहिलें आहे. इतरहि त्यांचीं पुस्तकें नांव घेण्यासारखीं आहेत; पण ' युद्धकालीन आठवणी ' हा अनेक खंडांत प्रसिद्ध झालेला ग्रंथ त्यांच्या वाङ्मयाचा मुकुटमणि होय. युद्धाच्या पडद्याआड राहून ज्यानें महत्त्वाचीं सूत्रें हालविलीं अशा एका प्रमुख

राष्ट्रनेत्याच्या आठवणी म्हणून या ग्रंथाला ऐतिहासिक महत्त्वाचा दस्त-ऐवज म्हणून महत्त्व आहेच. पण अतिशय तरल व हृदयंगम भाषाशैलीनें मंडित असलेलें साहित्य म्हणूनहि त्याची योग्यता फार मोठी आहे. १९५३ सालीं प्रस्तुत ग्रंथाला जगविख्यात नोबेल पारितोषिक मिळालें. हा चर्चिलसाहेबांचा गौरव अयथार्थ आहे, असें कोण म्हणेल ?

****

## आयसेनहोअर : २१

आज ज्यांच्या हातीं जगाच्या राजकारणाचीं सूत्रें प्रामुख्यानें आहेत ते अमेरिकेचे अध्यक्ष ड्वाईट आयसेनहोअर हे वयाच्या ४९ व्या वर्षापर्यंत एक अज्ञात सेनानी होते हें कोणाला खरें वाटेल काय ? पण वस्तुस्थिति तशी आहे खरी. १४ ऑक्टोबर १८९० रोजीं डेनिसन या गांवीं हे जन्मले. शाळेंत यांनीं फार मोठी चमक दाखवली असें नाहीं. अमेरिकेच्या लष्करी विद्यालयांतील १६४ विद्यार्थ्यांत आयसेनहोअरनीं ६१ वा नंबर कसाबसा टिक-वला होता. १९१५ सालीं त्यांना लष्करामध्यें दुय्यम नायक म्हणून घेण्यांत आलें. पण तरीहि युरोपच्या रणांगणावर त्यांना कोणी पाठविलें नाहीं. लष्करांतील अगदीं दुय्यम कामें ( जीं शांततेच्या काळांत करावयाचीं असतात ) तींच सामान्यपणें त्यांना सांगण्यांत आलीं. असा हा विशेष चमकदार न वाटणारा शिपाईगडी दुसऱ्या महायुद्धांत एकदम नांवारूपाला आला.



... ८०१८ ... बा. गा.

रशियाच्या विजयी सैन्याचा नेता झुकाव एके प्रसंगीं म्हणाला—'आजच्या काळांतील हा सर्वश्रेष्ठ पुरुष आहे.' रशियन लोक साधारणपणें बोलतांना, विशेषतः दुसऱ्याची स्तुति करतांना, फार तोलून मापून शब्द वापरतात. हें लक्षांत घेतलें म्हणजे आयसेनहोअरची योग्यता ध्यानीं येईल.

आयसेनहोअरचें श्रेष्ठत्व कशांत आहे? त्यांच्यांत तसें पाहिलें तर जगद्विजयी सेनानायकाचें प्रखर व्यक्तित्व आहे असें नाहीं. एक सुसंस्कृत नागरिक एवढीच त्यांची लोकांवर छाप पडते. त्यांना वक्तृत्वाची देणगी बऱ्यापैकीं लाभली आहे. पण ज्ञानविज्ञानाच्या एकाद्या शाखेचा त्यांचा खोल व्यासंग आहे असेंहि नाहीं. परंतु दूरदृष्टि, लोकसंग्रहाची कुशलता, निश्चयीपणा या जोरावर ते जगन्मान्यता पावले आहेत. ज्या वेळीं नाझी सेनेचा सागर सारें जग आपल्या पोटांत घेऊं पहात होता तेव्हां एका बाजूनें त्याचा वेग रशियानें थोपवून धरला. पण दुसऱ्या बाजूनें आघाडी उघडल्याशिवाय हा सागर कायमचा आटणें शक्य नव्हतें. अमेरिकेचे अध्यक्ष मरहूम रूझवेल्ट यांनीं जून १९४२ मध्यें युरोपियन रणांगणाचें नेतृत्व आयसेनहोअरकडे सोंपवलें; त्यांची निवड योग्य होती हें जगाला कळून आलें. कारण आयसेनहोअरनीं दुसरी आघाडी प्रचंड योजना आंखून उघडली आणि नाझी—फॅसिस्ट हुकूमशाही अखेर जमीनदोस्त झाली.

यांत आयसेनहोअरच्या केवळ समरकौशल्याची कसोटी लागली असें नाहीं. युरोपीय रणक्षेत्रांत मॉंटगॉमेरीसारखे रणपंडित अगोदरच प्रतिष्ठा पावले होते. दोस्तांचीं सैन्यें हीं जवळजवळ १२।१३ राष्ट्रांचीं मिळून झालेलीं. त्यांच्यांत एकजिनसीपणा आणणें महाकर्मकठिण होतें. रूझवेल्ट, चर्चिल यांसारख्या वयोवृद्ध व अनुभवी राष्ट्रनेत्यांना पटेल अशाच तऱ्हेनें युद्धाचीं प्यादीं हलवावयाचीं होतीं. नाझींच्या अमानुष आक्रमणामुळें त्रस्त झालेल्या व खंगलेल्या लोकांना नाझींविरुद्ध उठावणी

अनुक्रम
भाग
क्रमांक
नों. दि.

कार्ययन्त्र तयार करावयाचें होतें. पण हीं सारीं कामें आयसेनहोअरनीं फार कुशलतेनें पार पाडलीं. १९४४ सालीं रणक्षेत्राच्या इतिहासांतील फार मोठ्या मोहिमेचें नेतृत्व आयसेनहोअरनीं केलें. नॉर्मंडीमध्यें जर्मनांच्या अभेद्य भिंतीला भगदाड पाडावयाचें होतें. या वेळीं आयसेनहोअरनीं दाखवलेलें चातुर्य अलौकिक म्हणतां येईल. जर्मनीचा यशस्वी रीतीनें पाडाव केल्यावर कांहीं दिवस ते जर्मनीचे लष्करी प्रशासकहि होते.

दुसरें महायुद्ध हा लोकशाहीवरचा एक प्रचंड आघात होता. परंतु इंग्लंड, अमेरिका व रशिया यांच्या संघटित प्रयत्नामुळें मानवी संस्कृतीचा मृत्यु टळला असें म्हणण्यास हरकत नाहीं. युरोपमधील युद्ध संपवून जनरल आयसेनहोअर हे अमेरिकेस गेले त्यावेळीं त्यांच्या स्वागतास सुमारें २० लाख लोक आले होते. जवळजवळ २० मैल दुतर्फा माणसें त्यांचें दर्शन घेण्यासाठीं उभीं होतीं. यावरून स्वदेशांत या थोर सेनानीला किती मान आहे हें कळून येईल. युद्धाच्या दगदगींतून मोकळे झाल्यावर अमेरिकेच्या सैन्याची पुनर्घटना करण्याची जोखीम त्यांनीं घेतली व तींतहि अपेक्षेबाहेर यश मिळवून दाखविलें. म्हणूनच रिपब्लिकन् पक्षातर्फे जेव्हां त्यांना अध्यक्षपदासाठीं उभें करण्यांत आलें तेव्हां राष्ट्रानें त्यांच्याच बाजूनें कौल दिला. दुसऱ्या महायुद्धांतले अनुभवी सेनापती आणि अमेरिकेचे अध्यक्ष या दोन्ही दृष्टींनीं जागतिक राजकारणांत आयसेनहोअर हे प्रमुख सूत्रधार आहेत. युद्धापेक्षांहि शांततेच्या काळचे विजय ते कसे मिळवतात याकडे जगाचें लक्ष लागून राहिलें आहे.

उंच आणि रुंद छातीचे आयसेनहोअर स्वभावानें अत्यंत मनमिळाऊ आहेत. रणांगणावर काय किंवा राजधानींत काय, त्यांची भेट घेणें अनुयायांना किंवा इतरांना फारसें कठीण पडत नाहीं. 'आईक' असें लाडकें टोपणनांव सैनिकांनीं त्यांना दिलें आहे. साध्या सैनिकाबरोबर बातचीत करून त्याचीं सुखदुःखें जाणून घेण्यांत आयसेनहोअरना आनंद होतो. सैन्यांनीं मुत्सद्दी आज्ञा देतील त्याप्रमाणें वागावें, सेना